# ब्रम्हसूत्रें.

## दुसरा अध्याय,

त्याची टीका व मराठी अर्थ व समजुतीच्या टिपा ह्यांसहित.

हा ग्रंथ

**व्यंकटराव रामचंद्र**

ह्यांनीं तयार केला तो,

पुणें, बुधवार पेठ येथें,

'ज्ञानचक्षु' छापखान्यांत छापिला.

शके १८२६.

[ सर्व हक्क राखून ठेविले आहेत. ]

किंमत १॥ रुपया.

# ब्रम्हसूत्राणि

## द्वितीयाध्यायः

तट्टीका प्राकृतार्थसहिता।

अयं ग्रंथः

रामचंद्रसूनुव्यंकटेशशर्मणा संस्कृतः

पुण्याख्यपत्तने

बुधवारविथ्यायां 'ज्ञानचक्षु' मुद्रणालये मुद्रितः

शाकाब्दाः १८२६

[ सर्वप्रकारकं स्वामित्वं स्वहस्ते स्थापितं ]

मौल्यं सार्धरूपकं.

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ ब नारायण
दा. नों. ६६६७

# सूत्रांचा शब्दार्थ.

## अध्याय २.

### पहिला पाद.

( श्रुतींतला अर्थ ) स्मृतींत नाहीं असा दोष येतो असें ह्मणणें बरोबर नाहीं, कारण दुसऱ्या स्मृतींत जें आहे तें ह्या स्मृतींत नाहीं असा दोष येऊं लागेल ॥ १ ॥

आणखी कारण इतरांच्या अनुभवास येत नाहीं ॥ २ ॥

येणेंकरून योगस्मृतींचें खंडन होतें ॥ ३ ॥

श्रुतीला ( अप्रामाण्य ) नाहीं, कारण ती विलक्षण आहे, व श्रुतीवरून तीस वैलक्षण्य आहे ॥ ४ ॥

( फळ मिळतें असें ) आढळतें ॥ ५ ॥

जडांतील अभिमानी देवता घ्यावी. कारण त्यांना सामर्थ्य असून व्याप्ति आहे ॥ ६ ॥

आणखी ( त्या देवता ) दिसतात ॥ ७ ॥

अभाव हें कारण आहे असें ह्मणणें बरोबर नाहीं, कारण तो नुसता निषेधरूप आहे ॥ ८ ॥

( अभाव हें जगाचें कारण ह्मणणें ) अयुक्तिक आहे, कारण प्रळयकाळीं नुसता अभाव राहील ॥ ९ ॥

परंतु ( प्रळयकाळीं नुसता अभाव ) नाहीं, कारण पदार्थ पाहाण्यांत येतो ॥ १० ॥

आणि प्रळयकाळीं कांहीं नसतें असें ह्मणण्याला दोष येतो॥ ११॥

अनुमान करण्याची व्यवस्था लागत नसल्यामुळें भलत्या रीतीनेंही

अनुमान करितां येईल असें ह्मटलें असतां मोक्ष नाहींसा होण्याची वेळ येईल ॥ १२ ॥.

ह्यायोगानें बाकी राहिलेले वेदाला न जुमानणारे अशांच्या मतांचेंही खंडन होतें ॥ १३ ॥

भोक्ता जीव ह्याला ब्रह्मपणा प्राप्त होत असल्यामुळें दोघे निराळे नाहींत असें ह्मणणें बरोबर नाहीं, कारण लोकव्यवहाराप्रमाणें होईल ॥ १४ ॥

परमात्म्याहून निराळें कारण नाहीं, कारण श्रुती व अनुमानावरून तसें होतें ॥ १५ ॥

( निराळें कारण ) असतें तर दिसलें असतें ॥ १६ ॥

आणि कारण अस्वतंत्र साधन आढळत आहे ॥ १७ ॥

श्रुतींत कांहीं नव्हतें असें सांगितल्यावरून तसें समजणें बरोबर नाहीं. कारण दुसऱ्या धर्मानें ( तसें आहे ). कारण श्रुतीच्या बाकीच्या भागावरून ( तसें होतें ) ॥ १८ ॥

आणखी अनुमानानें व श्रुतीवरून तसें सिद्ध होतें ॥ १९ ॥

आणखी कापडाप्रमाणें ( साळ्याशिवाय दुसरें साधन असलें पाहिजे ) ॥ २० ॥

प्राणादिकाप्रमाणें ॥ २१ ॥

( जीव स्वतंत्र कर्त्ता आहे ) असें श्रुतींवरून ह्मटलें तर आपल्याला हित न करणें इत्यादि दोष येतात ॥ २२ ॥

( जीवापेक्षां ) परमेश्वर अधिक आहे. कारण श्रुतींत भेद सांगितला आहे ॥ २३ ॥

दगड इत्यादिकाप्रमाणेंच जीवाला जग करण्याची शक्ति नाहीं ॥ २४ ॥

( जीव ) कृत्य संपावितो ह्मणून परमेश्वर कर्त्ता नाहीं असें ह्मणणें बरोबर नाहीं. कारण दुधाप्रमाणें आहे ॥ २५ ॥

देवादिकाप्रमाणेंच ( परमात्मा आढळत नाहीं ) जगतांत ( पिशाच्च ) दिसत नाहीं ॥ २६ ॥

( जीव हा कर्ता नाहीं ) कारण सर्व सामर्थ्यानें प्रवृत्तीचा प्रसंग येतो अथवा निरवयव श्रुतीला विरोध येतो ॥ २७ ॥ ७ ॥

परंतु ( ईश्वराविषयीं ) श्रुति आहे. कारण तो एकट्या श्रुतीनेंच जाणण्याजोगा आहे ॥ २८ ॥

परमात्म्याच्या ठिकाणीं अशा प्रकारें(अनुमानानें)विरोध येत नाहीं. कारण त्याच्यांत नानाप्रकारच्या शक्ती आहेत ॥ २९ ॥

आणखी कारण जीवाविषयीं ते दोष होतात ॥ ३० ॥

आणि ( परमात्मा ) सर्व शक्तींनीं युक्त आहे, कारण श्रुतींत तसें सांगितलें आहे ॥ ३१ ॥

( परमात्म्याला ) इंद्रियें नाहींत ह्मणून तो कर्ता नाहीं असें ह्मणणें बरोबर नाहीं. कारण त्याविषयीं (श्रुतींत सांगितलें आहे)॥३२॥

कारण ( प्रयोजन ) नाहीं. प्राप्तव्य सर्व परमात्म्यास मिळालेलें आहे ॥ ३३ ॥

जगरीतिप्रमाणें केवळ गमतीकरितां ( परमात्मा सृष्टि करतो ) । ३४ ॥ ९ ॥

कमीजास्त करणें व निर्दयपणा हे दान दोष ( ईश्वराला ) नाहींत. कारण कर्म पाहून देतो. कारण तसें श्रुतींत सांगितलें आहे ॥ ३५ ॥

स्वतंत्र निराळें कर्म नसल्यामुळें कर्म नाहीं. कारण कर्म अनादि आहे ॥ ३६ ॥

आणि ( ईश्वराला स्वतंत्रपणा ) योग्य आहे. आणि श्रुतीवरून तसें समजतें ॥ ३७ ॥ १० ॥

आणखी कारण ईश्वरामध्यें सर्व धर्म आहेत ॥ ३८ ॥

## दुसरा पाद.

अनुमानानें कल्पिलेलें ( जड हें कर्त्ता ) नाहीं कारण तें उत्पन्न करूं शकत नाहीं ॥ १ ॥

आणि कारण ( चेतनाला तशी ) प्रवृत्ति आहे ॥ २ ॥

दूध व पाणी ह्यांच्याप्रमाणें ( जडाला प्रवृत्ति आहे ) असें कोणी ह्मणेल तर तेथेंही ( ईश्वर आहे ) ॥ ३ ॥

( आणखी कारण परमेश्वरा ) वांचून ( कोणतेंही कर्म ) होत नाहीं ह्मणून अचेतनवाद्यांचें मत ग्राह्य नाहीं ॥ ४ ॥

गवत इत्यादिकाप्रमाणें नाहीं, कारण ( परमेश्वरा ) वांचून जग नसतें ॥ ५ ॥ २ ॥

( चार्वाकाचें मत ) कबूल केलें तरी विषय व फळ नसल्यामुळें ( तो सिद्धांत नव्हे ) ॥ ६ ॥ ३ ॥

जीव व दगड ह्यांच्याप्रमाणें आहे असें ह्मटलें तर तेथेंही ( परमेश्वराचा संबंध आहे ) ॥ ७ ॥

कारण अंगित्व धर्माला अडचण येते ॥ ८ ॥

आणखी दुसऱ्या प्रकारें अनुमान केलें असतां ( शरीराशीं संबंध ठेवण्याला ) जीवाला शक्ति नाहीं ॥ ९ ॥

आणखी विरुद्ध असल्यामुळें (अनीश्वरमत ) अयोग्य आहे ॥ १० ॥

नाहींतर महत् व दीर्घ ह्यांच्याप्रमाणें ऱ्हस्व परिमंडल ह्यांच्यापासून कार्य होईल ॥ ११ ॥

दोन्ही रीतीनींहीं कार्य होणार नाहीं, म्हणून त्यापासून कार्य होत नाहीं ॥ १२ ॥

आणि समवाय संबंध घेतल्याकारणानें व सारखेपणा असल्यामुळें अनवस्था दोष येतो ॥ १३ ॥

आणि ( कारणें इत्यादि नेहमीं ) असल्यामुळें ( कार्य ) नेहमीं होईल ॥ १४ ॥

आणि ( परमाणूंना ) रूप इत्यादि असल्याकारणानें ते अनित्य आहेत कारण तसें आढळतें ॥ १५ ॥

आणखी कारण दोन्ही प्रकारांनीं दोष येतो ॥ १६ ॥

आणखी ( श्रुतीनें ) कबूल केलें नसल्यामुळें अगदीं घेऊं नये ॥ १७ ॥ ६ ॥

समुदाय दोन्ही कारणांनीं घेतला असतांही प्रलय होत नाहीं॥ १८॥

परस्पर संबंधाचें ज्ञान होत असल्यामुळें ( प्रलय आहे ) असें कोणी ह्मणेल तर बरोबर नाहीं. कारण परमाणू हे समुदायाचें मात्र कारण आहेत ॥ १९ ॥

आणखी कार्य उत्पन्न झाल्यावर कारणाचा नाश होतो ॥ २० ॥

कारण नसल्यास व्यवहाराचा नाश होईल, व कारण असल्यास दोन्ही एकाच वेळीं होतील ॥ २१ ॥

प्रतिसंख्या व अप्रतिसंख्या ह्या नांवांचे नाश होत नाहींत. कारण अडचण नाहीं ॥ २२ ॥

आणखी कारण दोन्ही रीतीनीं दोष आहे ॥ २३ ॥

आणखी आकाशांत विशेष नसल्याकारणानें ( सर्व क्षणिक नाहीं असें अनुमान होतें )॥ २४ ॥

आणखी कारण पूर्वींची स्मृति होते ॥ २५ ॥

चुन्यापासून उत्पत्ति नाहीं. कारण तसें आढळत नाहीं ॥ २६ ॥

आणखी असें असल्यास ज्यापासून कार्य होण्याची किंवा न होण्याची अपेक्षा नाहीं त्यापासूनही कार्य होईल ॥ २७ ॥

( जग ) शून्य नाहीं. कारण तें आहे असें अनुभवास येतें॥ २८॥

विरुद्धधर्म असल्यामुळें स्वप्नाप्रमाणें जग नाहीं ॥ २९ ॥ ८ ॥

( जग ) ज्ञानरूप नाहीं, कारण तसा अनुभव नाहीं ॥ ३० ॥

आणखी कारण ( ज्ञान हें ) क्षणिक आहे ॥ ३१ ॥

आणखी कारण ( सर्व बौद्ध मतें ) सर्व प्रकारें सिद्ध न होणारे आहेत ॥ ३२ ॥ ९ ॥

कारण एका ठिकाणीं संभवत नाहीं ॥ ३३ ॥

आणि ह्याप्रमाणें असल्यास अपूर्णता होईल ॥ ३४ ॥

आणखी क्रम मानिला तरी विरोध येत नाहीं असें नाहीं. कारण बदल इत्यादि होतात ॥ ३५ ॥

मुक्तिकाळीं शरीर राहिल्यामुळें, ( शरीर व आत्मा हे ) दोघे नित्य झाल्या कारणानें व ( मुक्तकाळच्या शरीरांत ) ज्यास्त कांहीं नसल्याकारणानें ( शरीर नित्य होईल ) ॥ ३६ ॥

शिव ( जगाचा कारण नाहीं ). कारण तसें ह्मणणें अयुक्तिक आहे ॥ ३७ ॥

आणि ( जगाशीं त्याचा ) संबंध होऊं शकत नाहीं ॥ ३८ ॥

आणखी कारण ( शिवाला ) आश्रय नाहीं ॥ ३९ ॥

शरीराप्रमाणें ( साधनादिक आहेत ) असें कोणी ह्मणेल, तर बरोबर नाहीं, कारण सुखदुःखादिक भोगणें हा दोष येतो ॥ ४० ॥

( देह असल्यास ) नाश, अथवा ( नसल्यास ) सर्वज्ञ नसणें हा दोष येतो ॥ ४१ ॥

( नुसत्या स्त्रीपासून ) उत्पत्ति होण्याचा संभव नाहीं ॥ ४२ ॥

आणखी कृपा करणाऱ्या ( शिवा ) ला ज्ञान इत्यादि साधन नाहीं ॥ ४३ ॥

अथवा विज्ञानादि साधनें असल्यास, त्याचें ( ह्मणजे पाशुपत-मताचें ) खंडन येथें करावयाचें नाहीं ॥ ४४ ॥

आणखी ( शाक्तमत ) सर्व श्रुतिस्मृतिविरुद्ध आहे ॥ ४५ ॥

॥ दुसरा पाद संपला ॥ २ ॥

---

## तिसरा पाद.

आकाश हें उत्पन्न झालें नाहीं. कारण तशी श्रुति नाहीं ॥१॥

( तशी श्रुति ) आहेच ॥ २ ॥

( ती श्रुति ) गौण आहे. कारण तीस बाध येतो ॥ ३ ॥

आणखी कारण श्रुति आहे ॥ ४ ॥

ब्रह्म शब्दाप्रमाणेंच ( अनादि हा ) एक शब्द ( मुख्य व गौण ) अर्थाचा होईल ॥ ५ ॥

( परमेश्वरानें सर्व उत्पन्न केलें असें जें ) सांगितलें त्याची हानि होईल. कारण समावेश होतो व तशी श्रुति आहे ॥ ६ ॥

आणखी जें अल्प शक्तियुक्त असतें तें उत्पत्तिमान् असतें. ह्यास उदाहरण जगांतील पदार्थ ॥ ७ ॥

ह्यावरून वायूचेंही व्याख्यान होतें ॥ ८ ॥

( असतापासून ) सताची उत्पत्ति होणें संभवत नाहीं, कारण तें अयुक्त आहे ॥ ९ ॥ ३ ॥

तेज परमेश्वरापासून उत्पन्न झालें, कारण श्रुतींत तसें सांगितलें आहे ॥ १० ॥ ४ ॥

उदक ( परमेश्वरापासून उत्पन्न झालें आहे ) ॥ ११ ॥ ५ ॥

पृथिवी ( परमेश्वरापासून उत्पन्न झाली आहे ); कारण तिचें प्रकरण, रूप व दुसऱ्या अर्थाचा शब्द श्रुतींत आहे ॥ १२ ॥ ६ ॥

परमात्मा ( संहार करणारा आहे ), कारण त्याची तशी इच्छा आहे व श्रुतींत तसें त्याचें लिंग आहे ॥ १३ ॥ ७ ॥

उत्पत्तिक्रमापेक्षां नाशाचा क्रम उलट असणें योग्य आहे ॥१४॥८॥

इतरांशिवाय विज्ञान व मन ह्यांचा लय उत्पत्तीच्या क्रमानें होतो असें कोणी ह्मणेल तर तें बरोबर नाहीं, कारण विशेष प्रमाण नाहीं ॥ १५ ॥

परंतु तसें ह्मणणें चर व अचर ह्यांच्यावर अवलंबून असलें तथापि तें एक अंशानें आहे; कारण मन असल्यास पदार्थांचें ज्ञान होतें ॥ १६ ॥ ९ ॥

परमात्मा ( लय पावत नाहीं ), कारण तशी श्रुति नाहीं आणि श्रुतीवरून तो नित्य आहे ॥ १७ ॥ १० ॥

जीव परमात्म्यापासूनच ( उत्पन्न होतो ) ॥ १८ ॥

आणखी असें युक्तीनेंही ठरतें ॥ १९ ॥

( जीव ) बाहेर पडतो, जातो व येतो ( ह्यावरून तो अणु आहे ) ॥ २० ॥

आणखी पुढील दोन ( श्रुती ) वरून परमात्म्याच्या योगानें ( जीवाचे व्यापार होतात ) ॥ २१ ॥

( जीव ) अणु नाहीं कारण तशी श्रुति नाहीं, असें ह्मणणें बरो- बर नाहीं, कारण प्रकरण परमात्म्याविषयीं आहे ॥ २२ ॥

आणखी कारण स्व आणि उन्मान हे शब्द आहेत ॥ २३ ॥

चंदनाप्रमाणें विरोध नाहीं ॥ २४ ॥

स्थान विशेष असल्यामुळें ( तसें आहे ) असें ह्मणणें बरोबर नाहीं, कारण हृदयांत ( जीव ) असतो असें श्रुतींत आहे ॥ २५ ॥

प्रकाशाप्रमाणें ( जीवाची व्याप्ति ) चैतन्य गुणानें आहे ॥ २६ ॥

वासाप्रमाणें ( अंशीपासून ) पृथक् होतो; आणि श्रुतींत तसें सांगितलें आहे ॥ २७ ॥

( परमेश्वर जीवाहून ) निराळा आहे, कारण श्रुतींत तसें सांगितलें आहे ॥ २८ ॥

परमेश्वराच्या गुणाप्रमाणें गुण असल्यामुळें प्राज्ञ नामक परमात्म्याप्रमाणें ( अभेद ) सांगितला आहे ॥ २९ ॥ १४ ॥

आणि परमात्मा आहे तोंपर्यंत ( जीवाचा स्वरूपोपाधि असल्यामुळें ) दोष नाहीं. कारण श्रुतींत तसें सांगितलें आहे ॥ ३० ॥ १५ ॥

पुरुषत्वादि धर्माप्रमाणें ( जीवांत ) असलेले गुण प्रकट होतात ॥ ३१ ॥

( जीवाला ) आवरण न मानलें तर नेहमीं सुख किंवा नेहमीं दुःख किंवा नेहमीं त्या दोहोंपैकीं एक होईल ॥ ३२ ॥ १६ ॥

( जीव ) कर्त्ता आहे, कारण शास्त्र सफळ होतें ॥ ३३ ॥

कारण ( जीव ) क्रीडा करितो असें श्रुतींत सांगितलें आहे ॥ ३४ ॥

कारण ( मोक्षाचीं ) साधनें आहेत ॥ ३५ ॥

आणखी कारण उपासना क्रियेंत जीवाला कर्त्ता असें ह्मटलें आहे. जर तसें नसतें तर त्याच्या उलट सांगितलें असतें ॥ ३६ ॥

जसा जाणण्याचा नियम नाहीं ( तसा कर्माचा ) नियम नाहीं ॥ ३७ ॥

कारण शक्तींत कमीपणा आहे ॥ ३८ ॥

आणखी कारण तृप्ति नाहीं ॥ ३९ ॥

आणखी सुताराप्रमाणें दोन प्रकार आहेत ॥ ४० ॥

( जीवाची कर्तृत्वशक्ति ) परमेश्वरापासूनच आहे, कारण तशी श्रुति आहे ॥ ४१ ॥

विधि निषेधरूप शास्त्र व्यर्थ न व्हावें इत्यादि करितां ( जीवाचें ) कर्म व प्रयत्न पाहून त्याप्रमाणें ( ईश्वर फळ देतो ) ॥ ४२ ॥ १७ ॥

( जीव परमेश्वराचा ) अंश आहे, कारण नानाप्रकारचे संबंध दाखविले आहेत. कोणी ते एक समजून धीवर व ठक ब्रह्म आहेत असें ह्मणतात ॥ ४३ ॥

कारण श्रुति आहे ॥ ४४ ॥

स्मृतींतही तसें आहे ॥ ४५ ॥

प्रकाश इत्यादिकाप्रमाणें मत्स्यादि परमात्मा जीवाप्रमाणें नाहीं ॥ ४६ ॥

आणि स्मृति आहेत ॥ ४७ ॥

देह संबंध झाल्यामुळें सूर्यादिकाप्रमाणें प्रवृत्ति व निवृत्ति ( परमात्म्याच्या अधीन आहे ) ॥ ४८ ॥

आणखी बद्दल होत नाहीं, कारण जीवाची शक्ति अपूर्ण आहे ॥ ४९ ॥

आणखी ( जीव हा ) प्रतिबिंबच आहे ॥ ५० ॥ १८ ॥

( जीवाचा प्रतिबिंबपणा अनेक प्रकारचा आहे ) कारण अविद्या, कर्म, इत्यादि हीं अनेक प्रकारचीं आहेत ॥ ५१ ॥

इच्छा, द्वेष इत्यादिक हीं अनेक प्रकारचीं असण्याचें कारणही असेंच आहे ॥ ५२ ॥

स्थानभेदामुळें ( वैचित्र्य आहे ) असें ह्मणणें बरोबर नाहीं, कारण ( अविद्येंत त्याचा ) समावेश होतो ॥ ५३ ॥

तिसरा पाद संपला ॥ ३ ॥

## चवथा पाद.

त्याचप्रमाणें प्राण हे उत्पत्तिमान् आहेत ॥ १ ॥

( अनुत्पत्ति सांगणाऱ्या श्रुती ) गौण आहेत, कारण त्यांचा मुख्य अर्थ संभवत नाहीं ॥ २ ॥

आणखी कारण जें सांगितलें त्यास विरोध येऊं नये ॥ ३ ॥ १ ॥

आणखी कारण मन पूर्वीं उत्पन्न झालें अशी श्रुति आहे ॥ ४ ॥ २ ॥

वागिंद्रियास उत्पत्ति आहे, कारण त्याचें पूर्वीं मन असतें ॥ ५ ॥

आणखी कारण ज्ञानेंद्रियाला 'सात' असें विशेषण दिलें आहे ॥ ६ ॥

हातपाय इत्यादि कर्में करण्याकरितां आहेत. मोक्षाकरितां असें नाहीं ॥ ७ ॥

आणि ( प्राण ) अणु आहेत ॥ ८ ॥

आणि मुख्यप्राण उत्पत्तिमान् आहे ॥ ९ ॥

( प्राणशब्दानें ) वायु व त्याचा व्यापार घेऊं नये, कारण ते निराळे आहेत असें श्रुतींत सांगितलें आहे ॥ १० ॥

डोळे इत्यादिकांप्रमाणें ( मुख्यप्राण हा परतंत्र ) आहे, कारण तसें श्रुतींत सांगितलें आहे ॥ ११ ॥

आणखी ( मुख्यप्राण ) कारण नसल्यामुळें दोष नाहीं. श्रुतींत तसें सांगितलें आहे ॥ १२ ॥ ७ ॥

मनाप्रमाणें मुख्यप्राणाचीं पांच रूपें आहेत असें समजावें॥ १३॥ ८॥

आणि ( मुख्यप्राण ) अणु आहे ॥ १४ ॥ ९ ॥

ज्योति इत्यादि ठिकाणीं असलेला ( परमात्मा इंद्रियाकडून व्यापार करवितो ). कारण तसें श्रुतींत सांगितलें आहे ॥ १५ ॥

पुणे
४३० 
क्र. ६६६७
१.२

## सूत्रांचा शब्दार्थ.

जीवाकडून ( परमात्मा पाहाण्याचा व्यापार करवितो ). कारण तशी श्रुति आहे ॥१६ ॥

जीव व त्याचीं करणें ह्यांचा संबंध पुष्कळ दिवसांचा आहे ॥ १७ ॥ १० ॥

ते इंद्रियें आहेत, कारण मुख्यप्राणाशिवाय इतर ठिकाणीं ( इंद्रियत्व ) आहे, कारण तसें श्रुतींत सांगितलें आहे ॥ १८ ॥

कारण ( मुख्यप्राण व इंद्रियें ) ह्यांमध्यें भेद सांगणारी श्रुति आहे ॥ १९ ॥

आणखी कारण ( मुख्यप्राण व इंद्रियें ) ह्यांमध्यें विलक्षण विशेष आहे ॥ २० ॥

नामरूपात्मक ( प्रपंचाच्या ) उत्पत्तींत ( पृथ्वी, आप व तेज ) ह्यांचें मिश्रण करणाऱ्या ( परमात्म्या ) पासून आहे, कारण श्रुतींत तसें सांगितलें आहे ॥ २१ ॥

मांस इत्यादि हे पार्थिव आहेत, आणि दुसरे ( उदक व तेज ह्यांचें कार्य आहे ). असें श्रुति ह्मणते ॥ २२ ॥

विशेष योगामुळें ( पार्थिव शरीर इत्यादि ) असें ह्मणतात ॥ २३ ॥

ह्याप्रमाणें चवथा पाद संपला ॥ ४ ॥

६३३६

# उपोद्घातः

( पूर्वतनोपोद्घातः अग्रे प्रचलितः )

कश्चिदाह । धर्मादिकं कस्यचित्प्रत्यक्षं । वस्तुत्वात् । घटवत् ॥ अत्र किं धर्मादेः प्रत्यक्षत्वमात्रं साध्यं उतैकपुरुषप्रत्यक्षत्वं । आद्येऽर्थांतरत्वं । कस्यचित् केनचित् प्रत्यक्षीकृतत्वेनापि प्रतिज्ञातार्थस्य सिद्धेः । न द्वितीयः । दृष्टांते अदृष्टत्वात् । न हि पक्षातिरिक्तस्य सर्वस्यैकपुरुषप्रत्यक्षत्वं संमतं । एको घटो एकस्य प्रत्यक्ष इति चेत् । तर्हि धर्मस्य एकस्य प्रत्यक्षः अपरस्याधर्म इत्यर्थांतरतातादवस्थ्यात् । धर्मादिविशेषविज्ञानाभावे साध्यसाधनाद्यपरिज्ञाने च सामान्यज्ञानस्यानुपयुक्तत्वात् । एवं शिशवोल्पज्ञः । चेतनत्वात् । संमतवत् । चेतनत्वं हेतुः सर्वज्ञे परमेश्वरे नैकांतिक इति चेत् । न वेदंविना सर्वज्ञेश्वरस्याप्यसिद्धेः । तदर्थं चापौरुषेयं वाक्यमंगीकार्यं । तार्किकास्त्वाहुः । विमतं सकर्तृकं । कार्यत्वात् । घटवदिति क्षित्यादेः कर्त्तरि सिद्धे तस्य सार्वज्ञमपि सिद्धमेव । उपादानादिसाक्षात्कारवत एव कर्तृत्वात् । सर्वस्यापि क्षित्याद्युपादानादौ प्रविष्टत्वादितिचेन्न । घटादीनां कर्त्तरि कुलालादौ तदुपादानसाक्षात्कारस्यादृष्टत्वात् । नहि कुलालो घटं पलपरिमाणेयत्ताविशेषवत्तं तन्निमित्तं कालमदृष्टं तद्विषयप्रयोजनं वा साक्षात्करोति । केवलानुमाने सर्वत्रोपाधेः सुवचनत्वात् । यथोक्तं । उपाधिप्रतिरोधौतु क्वनामातीवदुर्वचाविति । प्रकृते शरीरजन्यत्वमुपाधिः । न विशेषणवैय्यर्थ्यं । पक्षव्यावृत्त्यर्थं विशेषणं स्यात् । अपिच किं व्यभिचारनिवारणलक्षणप्रयोजनाभावो वैय्यर्थ्यं प्रयोजनमात्राभावो वा । नाद्यः । व्याप्यगतविशेषणस्यैव तथात्वेन व्यापकगतस्य तथात्वनियमाभावात् । न द्वितीयः । असिद्धेरिति । विमतं सकर्तृकं । कार्यत्वात् । इतीश्वरानुमानं बहुधा सोपाधिकं अनणुत्वानिंद्रियत्वोपाधिदर्शनात् । न च साधनव्यापकता । कार्यात्पक्षतुल्यत्वात् । द्व्यणुकादिंद्रियाच्च व्यावृत्तेः । न च पक्षेतरता विपक्षात्परमाणोर्मनस-

श्च व्यावृत्तेः । एवं भूसमवेतत्वाभावोप्युपाधिः । पक्षतुल्याद्गोलकाद्यावृत्तेः । साधनव्यापकत्वात् । पृथिवीत्वादेर्विपक्षस्य व्यावर्त्तस्य सत्वादपक्षेतरत्वाच्च । एवं विमतो सर्वज्ञः । पुरुषत्वात्संमतवत् । न च धर्मिग्राहक प्रमाणविरोधः । अल्पकार्यस्य कर्त्तारं पक्षीकृत्यप्रयोगात् । दरीगतवनस्पतीनां किंचित्ज्ञः कर्तृत्वात् । कुविंदवत् । एवं दोषीत्यादिसुसाध्यं यथोक्तं वृक्षकृन्नाखिलं वृक्षं वेत्ति पुंस्त्वाद्धि चैत्रवत् । इत्याद्यनुमया स्पर्द्धि नानुमान परेशितुः । शक्तं विज्ञापने चातिप्रसंगोऽनुमयो दृशेति । एवं सार्वज्ञासिद्धौ तस्याविप्रलंभकत्वमप्यप्रामाणिकं कल्प्यं । रागाद्यभावोऽप्यसिद्धः । तद्रहितेष्वपीश्वरावतारेषु वंचकत्वदर्शनात् । दैत्यानां वंचनाय चेत्युक्तेः । वीतरागाणामपि ज्ञानांकुरसंरक्षणार्थं छलादिना प्रतिवादिप्रतारणस्य सर्वैरंगीकृतत्वाच्च । सोयमुपदेश इति च कल्प्यं । तदेतत्कल्पनागौरवप्रसंगेन न पौरुषेयेण वाक्येन धर्मादिनिश्चयः । न चापौरुषेयवादिनां किंचित्कल्पनीयमस्ति । तथोक्तं भगवत्पादाचार्यैः । अपौरुषेयत्वंच स्वत एव सिद्धमिति । अधुनाध्यापकैरध्येतृभिः पठ्यमानो वेदः किमीश्वरकृत एव उत नवीनः स्वयंकृतोवा । द्वितीयतृतीययोरसर्वज्ञप्रणीततापसंगः । अनुभवविरोधश्च । आद्येपीश्वरोपि कल्पादौ यं वेदं निर्माय एकस्मै शिष्यायोपदिशति । न वेदांतरं निर्मायेति वक्तव्यं । तमेवेति चेत् । कुतोयं भवतो निर्णयः । प्रथमरचितस्याविस्मरणात् । वृथावेदांतरकल्पनायोगाच्चेति चेत् । तत्किं पूर्वपूर्वतरकल्पे रचितं वेदं व्यस्मार्षीत् । येनात्रापि पुनारचयतीति कल्प्यते । एवं पूर्वतमादिकल्पेष्वित्यनादितैवागतेत्यपौरुषेयत्वं स्वतएव सिद्धं । वेदः ईश्वरकृतो न भवति । वाक्यत्वात्संमतवाक्यवत् । किंचेश्वरकृतो वेदः स एवायमुतान्यः । नाद्यः । तस्य तव मते नष्टत्वात् । द्वितीयेऽपसिद्धांतापत्तिः । किंच ऋग्वेदएवाग्नेरजायत यजुर्वेदो वायोः सामवेद आदित्यात् इत्यनीश्वररचितत्वश्रुतेर्नेश्वरकृतो वेदः । संप्रदायप्रवर्तका एवेति चेत् तर्हीश्वरोपि तथेत्यागतोसि मार्गं । यत्नतः प्रतिषेध्यानः पुरुषाणां स्वतंत्रते-

त्युक्तेः । अर्थं बुध्वा नरैर्मानैरचिता लौकिकागमाः । न प्रसिद्धिस्तथा वेदे हीशोप्यध्यापको मत इत्युक्तेश्च । अथाहुः । वेदवाक्यानि पौरुषेयाणि । वाक्यत्वात् । कालिदासवाक्यवत् । अयं कालो वेदव्यतिरिक्तेदानींतन त्वरहितः । पौरुषेयत्वात् । कालत्वादन्यकालवत् । आकाशो वेदव्यतिरिक्ताकाशनिष्ठत्वरहितः पौरुषेयत्वात् । द्रव्यत्वात् तंतुवत् । श्रोत्रं वेदव्यतिरिक्तश्रोत्रग्राह्यत्वरहितं पौरुषेयग्राहकं । इंद्रियत्वात् । चक्षुर्वदिति । मैवम् । अनुमानानां विपक्षे बाधकाभावेनाप्रयोजकत्वात् । वेदो नेश्वरप्रणीतः । वाक्यत्वात् । लौकिकवाक्यव दिति अपि वक्तुं शक्यत्वात् । पौरुषेयत्वेच कर्तुराप्त्यनिश्चयेन ततोधर्माद्यनिश्चयापातात् । विशिष्टव्यतिरकिणश्च पौरुषेयपदस्थाने अपौरुषेयपदप्रक्षेपेण सत्प्रतिपक्षानिस्तारात् । किंच वेदः सकर्तृको वाक्यत्वाल्लौकिकवाक्यवदित्यत्र वेदत्वाभाव उपाधिः । ननु किमिदं वेदत्वं यदभाव उपाधित्वेनाभिप्रेयते । नतावद्वाक्यत्वादृष्टविषयवाक्यत्वादृष्टविषयप्रमाणवाक्यत्वानामन्यतमत्वात् । तदभावस्य साध्यव्यापकत्वात् । नाप्यपौरुषेयत्वं । तदभावस्यैव साध्यत्वात् । नापि वैदिकशाब्दलक्षणवत्त्वं । तदभावस्य भारतादिषु साध्यव्यापकत्वात् । न च नियतक्रमवत्वं । तस्यापि भारतादौ सद्भावात् । नापि वेदव्यवहारगोचरत्वं । इतिहासपुराणादिषु तद्भावात् । इतिहासपुराणः पंचमो वेदः वेदानामृगादीनां पंचम इति श्रुतेः । नापि मुख्यतद्गोचरत्वं । तदभावस्य पक्षेतरत्वात् । प्रतिपक्षपर्यवसाने च असाधारणत्वात् । मैवं । अनुपलभ्यमानोचितकारणत्वाभावस्याभिप्रेतत्वात् । वाक्यस्योचितं कारणं प्रत्यक्षादिकं । वा विप्रलंभादिकं वा । अनुपलभ्यमानप्रत्यक्षादिमूलवाक्यत्वं वेदत्वं । एतच्चानुपलभ्यमानमूलत्वे सति महाजनपरिगृहीतत्वं वाक्यत्व मिति वदतो दयनेनाप्यंगीकृतं । तत्रानुपलभ्यमानमूलत्वग्रहणेन प्रत्यक्षादिमूलत्वस्य महाजन परिगृहीतत्वग्रहणेन विप्रलंभादिमूलत्वस्य च व्यावर्तितत्वात् । सर्वज्ञानमूलत्वं वदतापि तस्य प्रमाणजन्यत्वाभावादेवक्तुं शक्यत्वमेव । एवं च व्याप्यत्वासिद्धौ वाक्यत्वा दिति हेतुः । तर्कपराहतंच वाक्यत्वानुमानं । पूर्वोक्तकल्पनागौरवप्रसंगात् । श्रुतिपुराणादिवि-

रुद्धंच । एतेन वेदाः सर्वज्ञप्रणीताः । वेदत्वात् । व्यतिरेकेण लौकिकवाक्यव दित्यपास्तं । वेदस्य सर्वज्ञप्रणीतत्वनिश्चये सति प्रामाण्यनिश्चयः । तन्निश्चयेच सार्वज्ञनिश्चयः । ततश्च विशेषणप्रसिध्यानुमानप्रवृत्तौ वेदप्रामाण्यनिश्चय इति चक्रकाश्रयप्रसंगाच्च । ननु तथापि पौरुषेयत्वं वेदस्योपपद्यते । तस्य वर्णसमुदायरूपत्वात् । वर्णानां चोच्चारणेनोत्पद्यमानत्वात् । न चोत्पत्तिमतां समुदायो नोत्पत्तिमानिति युज्यते । मैवं । सएवा यं गकारः इति प्रत्यभिज्ञया । यावत्ब्रह्मविष्ठितं तावतीवागितिश्रुत्या च वर्णनित्यतांगीकारात् न चोपलब्ध्यनुपनलब्धिमात्रेणोत्पत्याद्यध्यवसायो युक्तः । तथासत्युपलब्धानुपलब्धानां घटादीनां तदैवोत्पत्यादिप्रसंगात् । व्यंजकभावाभावाभ्यामेव ह्युपलंभाऽनुपलंभौ । उच्चारणं तु व्यंजकजनकत्वेनोपयुज्यते । व्यंजकाश्च ध्वनयः । ते च नाभासाः । प्रतिनियताश्चेति । ते वर्णाएव पदाभिन्नेष्वपि वर्गेषु एकार्थाभिधोपाधिना एकं पदमिति संभवात् । एकदेशावस्थाननिमितेनानेकेष्वेवतरुषु वनमितिवत् । एकबुध्यारूढत्वेन वर्णानामेवार्थाभिधायकत्वोपपत्तेः । तदेवेदं पदं तदेवेदं वाक्यमिति नित्यत्वसिद्धिः । वर्णानामेव पदबुद्धिविषयाणामन्वितस्वार्थाभिधायकत्वेन वाक्यार्थवेदनसंभवात् । ननु वर्णास्तावन्नित्यत्वात्सर्वगतत्वाच्च स्वतः क्रमशून्याः । न च क्रमेणविना पदवाक्यभावः । ना पि तमंतरेण प्रामाण्यमतः क्रमः पौरुषेयएवस्थेयः । मैवं । सएवायं क्रम इति क्रमस्य स्वरादेरिव नित्यत्वावगमात् । ननु वेदेऽहमादिशब्दप्रयोगो दृश्यते ऽतः कथमपौरुषेयत्वं । मैवं । नहि वयं वेदेषु पुरुषाभिप्रायप्रवेश एव नास्तीति वदामः । तथात्वे संकल्पप्रार्थनादिवाक्यानामानर्थक्यप्रसंगात् । पुरुषाभिप्रायप्रवेशो पि स्वतंत्रस्य वक्तुरभावादपौरुषेयत्वं ब्रूमः । पूर्वस्थितान्येव वेदवाक्यानि कानिचित्कैश्चित्पुरुषैः स्वाभिप्रायप्रवेशेन प्रयुज्यंते । यथाऽधुना वेदपाठकैः न त्वपूर्वाणि क्रियंते । प्रत्यक्षादिनार्थं बुध्वा वाक्यरचनाऽभावात् । तथोक्तं श्रीमच्चरणैः वर्णाः कूटस्थनित्याः सर्वगत श्च पदान्यपि नियतान्येव तथाप्यनुपूर्वी विशेष-

स्वतंत्रपुरुषपूर्वकत्वभावाभ्यामयं भेद इति । एतत्सर्वमुक्तं पुराणे। नित्यावेदाः समस्ताश्च शाश्वता विष्णुबुद्धिगाः । सर्गेसर्गे मुनै वैते उद्गीर्यंते तथैव च । तत्क्रमेणैव तैर्वर्णैस्तैस्स्वरैरेव नान्यथा। अतः श्रुतित्वमेतासां श्रुता एवाखिलैर्जनैः । श्रुतयो दृष्टयश्चेति तेनोच्यंते पुरातनैः । तदुत्पत्तिवचश्चैव भवेद्व्यक्तिमपेक्ष्यतु । चेतनस्य जनि र्येद्व दुच्यते सर्वलौकिकैः। पुराणानि तदर्थानि सर्गेसर्गेन्यथैव तु । क्रियंतेऽतस्त्वनित्यानि तदर्थाः पूर्वसर्गवत्। वेदानां सृष्टिवाक्यानि भवेयुर्व्यक्त्यपेक्षया । अवांतराभिमानानां देवानां वाव्यपेक्षया इतिब्रह्माण्डे । वेदास्ते नित्यविन्नत्वाच्छ्रुतयश्चाखिलैः श्रुतेः । आम्नायो नन्यथापाठादीशबुद्धिस्थिताः सदेति महावराहे । नित्या वेदाः न केवलंवर्णमात्रं । नापि पदमात्रं । किंतु समस्ताश्च । तत्रोपपत्तिः शाश्वता विष्णुबुद्धिगा इति । नन्वीश्वरबुद्धौ सर्वदा प्रतीयमानत्वं नामेश्वरेण सर्वदावर्त्तमानतयानुभूयमानत्वं विवक्षितं। तस्यैव नित्यत्वसाधकत्वात् । तदेव कुतः । पुराणवचनादिति ब्रूमः । संस्कारमात्रवर्त्ततामितिचेन्न । अमुख्यार्थाश्रयणप्रसंगात् । सर्गे सर्गे मुनै वै त उद्गीर्यंत इति प्रत्यभिज्ञाविरोधाच्च । न च सादृश्यादेतएवेत्युक्तमिति वाच्यं । जन्मवाक्यगतिकथनविरोधाच्च । क्रमविशिष्टाः वर्णाएव वेदो नतु घटादिवदर्थांतरं । क्रमश्च बुद्धिनिमित्त एव । न तु स्वतोऽस्ति । ततश्च सर्वेषां सर्वथा वर्णविषयविवक्षितक्रमोपाधिभूतबुद्धेरुपरमएव वेदे विनाशो वक्तव्यः । न च घटादीनामिवापरः । न चेश्वरस्य तथाविधबुद्ध्युपरमो युज्यते । सहिंदेवदत्तस्येव विषयांतरनिमित्तो वा स्याद्विस्मरणनिमित्तो वा । नोभयथाऽपि संभवति । तस्य सर्वदा सर्वज्ञत्वात्। अतो वेदाः सर्वदा परमेश्वरेण वर्त्तमानतयानुभूयमानत्वात्समस्ता नित्या एवेति सिद्धं । तदुक्तमाचार्यैः । अत आकाशगुणे शब्दे व्यज्यमाना वर्णादयस्तत्क्रमात्मकोवेदश्च नित्य एव सिद्ध इति । एवं वेदस्यापौरुषेयसिद्धिः । प्रामाण्यस्य स्वतस्त्वं हि नोचेत्स्यादनवस्थितिः। साक्षिणा गृह्यते ज्ञानं तत्प्रामाण्यं च गृह्यते। ज्ञानस्य बाधकात् ज्ञेय-

मप्रामाण्यमिति स्थितिः । प्रामाण्यं स्वतः परतो ऽप्रामाण्य मिति द्वै-पायनीयं मतं । ज्ञानग्राहकातिरिक्तग्राहकानपेक्षत्वं ज्ञप्तौ स्वतस्त्वं । ज्ञानग्राहकातिरिक्तग्राहकांतरापेक्षत्वं ज्ञप्तौ परतस्त्वं । तत्र ज्ञानं स्व-प्रकाशेन साक्षिणैव गृह्यते । तत्प्रामाण्यं चोत्सर्गेण गृह्यते । यज्ज्ञानं तत्प्रमाणमिति वादिविप्रतिपत्तिश्चेत्किंचित् प्रतिबंधो भवति । तन्नि-रासे च स्वमहिम्नैव साक्षी प्रामाण्यं गृह्णाति । यथा स्वयंगतिसमर्थोऽपि गजोगोक्षुरकादिना प्रतिबद्धो न चलितुं क्षमते । तदपसरणे तु स्वमहि-म्नैव गच्छति । अप्रामाण्यं तु बाधकदर्शनादेव गृह्यत इति परतस्त्वं तस्य। तथाहि । प्रामाण्यं ज्ञानग्राहकमात्र ग्राह्यं अप्रमाण्येतरज्ञानसमवेतधर्म-त्वात् । ज्ञानत्ववत् । विपक्षे ऽनवस्था प्रसंगो बाधकः । न च प्रामाण्यं परतो ज्ञायते । अनभ्यासदशायां सांशयिकत्वात् अप्रामाण्यवदिति वा-च्यं । व्यर्थविशेषणत्वात् । असिद्धिपरिहारार्थमितिचेत् न । तथाऽन-भ्युपगमात् । व्यभिचारनिवारकमेव हेतोर्विशेषणमिति नियमांगीकारा-त् । असिद्धेश्च । नह्यनभ्यासदशायां सर्वत्रसंशयोदृश्यते । स्वतः प्र-माणतया भवदभ्युपगतधर्मिप्रत्यक्षानुमानोपमानेष्वपि संशयादिदर्शनेना-नैकांत्याच्च । किंच प्रामाण्यं तावदवश्यं केनचित्प्रमाणेन ज्ञातव्यं । अ-न्यथा तद्भावप्रसंगात् । ज्ञानग्राहकातिरिक्तेन ग्रहणांगीकारे ऽनवस्थानात् । तस्य स्वतस्त्वे प्रथमस्यैव तथांगीकारोपपत्तेः । परिशेषात्स्वतस्त्वसिद्धिः । तथाप्रयोगः । ज्ञानगतं याथार्थ्यं तद्ग्राहकेणैव ग्राह्यं । ग्राहकांतरानुपपत्तौ सत्यां गृह्यमाणत्वात् यद्यदन्येऽनानुपपद्यमानग्रहणं सत् गृह्यते तत्ते-नैव ग्राह्यं । यथाचक्षुषोन्येनानुपपद्यमानसाक्षात्कारं साक्षात्क्रियमाणं रू-पं चक्षुषा साक्षात्क्रियत इति । न च विशेषणासिद्धिः । ग्राहकांतरानव-स्थाप्रसंगेन निरस्तत्वात् । न च साक्षिवेद्यत्वेऽनवस्थाप्रसंगः । साक्षी स्वयं-प्रकाशः स्वात्मानं स्वप्रामाण्यंच गोचरयतीत्यंगीकारात् । किंच निःशंका-प्रवृत्तिस्तावत्प्रामाण्यं ज्ञातव्यं । अवधृतप्रामाण्यमेव हि परप्रामाण्यनि-श्चयाय प्रभवति । तत्प्रामाण्यंचावधृतप्रामाण्येन प्रमाणांतरेणेति दुर्वारा

ऽनवस्था स्यात्। अनुमानात् सिद्धि रिति चेत् न। अनुमान प्रामाण्यं च येन ज्ञानेन विषयी क्रियते तस्यापि प्रामाण्यमन्येनेति कथं तत्रापि नानवस्था स्यात् । किंच यज्ज्ञानस्य याथार्थ्यं किमदुष्टकरणजन्यत्वेनावधारणीयं उत दुष्टकरणजन्यत्वेन अथ प्रवृत्तिसामर्थ्येन। यद्वा ज्ञानांतरसंवादेन किंवा विसंवादाऽभावेन । नाद्यः । तस्यापि दुरवधारणत्वात् । ज्ञानयाथार्थ्येन तदनुमाने चेतरेतराश्रयापत्तेः । नित्यज्ञानेषु तदभावाच्च । न द्वितीयः। अशक्यानवधारणत्वात् । न तृतीयः। सर्वत्र तदभावात्। न चतुर्थः। सुखादिज्ञाने तदभावात् । ज्ञानमात्र संवादाभ्युपगमेच धारावाहिकविभ्रमेऽपि तद्ग्रहापातात्। यथार्थज्ञानसंवादाभ्युपगमेच तद्याथार्थ्यावधारणेनानवस्था स्यात्। न पंचमः। असंजातबाधभ्रमेष्वपि तदापातात् । पुरुषदेशकालविकल्पानुपपत्तेश्च । अतो ग्राहकेण साक्षिणैव ज्ञानयाथार्थ्यग्रहणं । साक्षिज्ञानंच यथार्थमेव । नहि तद्विषये सुख दुःखे च्छा भया दौ कश्चित्संदिग्धे। ना पि विपर्येति । अतएव साक्षिविषयावतारपर्यंतं परीक्षा कुत्रचित् । ततः परं संदेहाभावात् न परीक्षावतार इति स्वतः प्रामाण्यसिद्धेः ॥

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ ब नारायण
दा. नों.

# द्वितीयाध्यायप्रथमपादप्रतिपाद्यविषयः

पाशुपतादि स्मृतीनामनवकाशत्वेन विष्णोर्जगत्कर्तृत्वं नेति न शंकनीयम् तथा सति तदन्यस्मृतीनां श्रुतिसंवादित्वेन सर्वज्ञविष्ण्वादिप्रणीतत्वेन च प्रबलानामनवकाशत्वेन पूर्वोक्तस्मृतिविरोधोऽकिंचित्करत्वादित्यर्थः ( सू. १ ) । पाशुपतादिस्मृतीनां तदुक्तफलानुपलब्ध्याऽप्रामाण्यम् ( सू. २ ) । फलानुपलब्धिहेतुना योगशास्त्रं प्रत्युक्तं ज्ञेयम् (सू. ३) । श्रुतितदनुसारिस्मृत्यादेरप्रामाण्यं न यतः नित्यत्वाख्यवैलक्षण्यवत्वमस्ति (सू. ४) । श्रुत्याद्युक्तं फलं योग्याधिकारिणां दृश्यते (सू. ५) । मृदब्रवीदित्यादिषु तदभिमानिग्रहणं यतः सामर्थ्यं व्याप्तिश्चास्ति तत्सामर्थ्यं योगिभिरुपलभ्यते (सू.६–७) । असतः प्रलयावशेषित्वं नास्ति यतस्तस्य प्रतिषेधमात्रत्वमस्ति । तथासति प्रलयेऽसन्मात्रवत्वप्रसंगात्तन्मतमसमंजसं । प्रलयेऽसदवशेषो न युज्यते तदा पदार्थसत्वं साधयितुं शक्यम् । प्रलयेऽसत्वपक्षे दृष्टांतोनास्ति । तर्कस्यानवस्थितत्वात् सिद्धांत्युक्तादन्यरूपेणापि तर्कितं चेन्मोक्षाभावप्रसंगः स्यात् । एतेन वेदविरुद्धानां खंडनं ज्ञेयम् (सू.८–१३)। भोक्तुर्ब्रह्मभावश्रवणेनानयोरैक्यमिति न ज्ञेयं लोकवत्तत्र व्यवस्था ज्ञातव्या (सू. १४) । श्रुतिप्रमाणेन स्वतंत्रकारणं ब्रह्माभिन्नमिति ज्ञेयम् । स्वतंत्रसाधनसत्वे दर्शनं स्यात् । अस्वतंत्रसाधनसत्वमस्ति । असत्कथनात्तदेवास्तीति न मंतव्यं तदस्वतंत्रत्वधर्मेणेति ज्ञेयं । यतः तमोऽस्तीत्युत्तरवाक्येन ज्ञायते । युक्त्या शब्देन च साधनं भगवदधीनमिति ज्ञेयम् । पटसृष्टिवज्जगत्सृष्टिरपि ज्ञेया । यथाप्राणदेहेंद्रियादिकं स्वतंत्रं नास्ति तथा प्रकृत्यादिकमपि स्वतंत्रं न भवति (सू. १५–२१) । जीवस्य कर्तृत्वं चेत्तस्य हिताकरणादिदोषप्राप्तिर्भवेत् । ब्रह्मणः श्रमादिदोषोनास्ति तस्याधिकशक्तिमत्वात् । पाषाणादिवज्जीवस्य स्वतः कर्तृत्वं न युज्यते । कार्य-

समापनदर्शनाज्जीवस्य कर्तृत्वमिति न वाच्यं। यतः गोषु दृश्यमानक्षीरव ज्ज्ञेयम्। लोके परमेश्वरस्यादर्शनं देवादिवद्युज्यते (सू. २२–२६)। जीवस्य स्वतःकर्तृत्वे कृत्स्नतया प्रवृत्तिः तृणादानादिकार्येष्वपि सर्वसामर्थ्यप्रवृत्तिरेकदेशेन प्रवृत्तिर्वेति पक्षे निरवयवत्वशब्दविरोधः (सू. २७)। ईश्वरकर्तृत्वे जीवपक्षोक्तदोषाः न संति। यतः शब्दमूलकत्वमास्ति। परमेश्वरे नानाविधाः शक्तयः संति। जीवपक्षएव दोषाः। परमेश्वरस्य सार्वदिकसार्वकालिकसर्वशक्तिमत्वं वेदेन कथितं। परमेश्वरस्य हस्तादिशून्यतया कर्तृत्वं नेति न शंक्यं। यस्तद्धस्तादिशून्यत्वं प्राकृतेंद्रियविषयतयाऽज्ञेयं। परमेश्वरस्य सृष्टिकरणं फलोद्देशेन नास्ति। यतस्तस्यकृतकृत्यता विद्यते। परमेश्वरः केवललीलयैव सृष्टिं करोति (सू.२८–३४)। ईश्वरस्य कर्मापेक्षत्वेन फलदातृत्वाद्वैषम्यनैर्घृण्ये न भवतः। ईशापेक्षविशिष्टं कर्म नास्ति। यतस्तस्यानादित्वम्। कर्मापेक्षत्वेऽपीश्वरे स्वातंत्र्यमस्ति। परमेश्वरे सर्व धर्माणां युक्तत्वमस्ति (सू.३५–३८)॥ इति प्रथमः पादः॥ १॥

४३७ ब नारायण
दा. नों.

# दुसऱ्या अध्यायाच्या पहिल्या पादांतील विषय.

स्मृतींत न सांगितल्यामुळें परमेश्वर हा जगाचा कर्ता नाहीं असें कोणी ह्मणेल तर तें बरोबर नाहीं, कारण त्या स्मृतीपेक्षां वेदाला अनुसारी अशा आणि सर्वज्ञानें केलेल्या अशा स्मृतींत सांगितलें असल्या कारणानें पूर्वींच्या स्मृतींत सांगितलें नाहीं हा दोष कांहींएक उपयोगी नाहीं (सू० १). पाशुपतादि स्मृतींत सांगितल्याप्रमाणें फळ मिळत नाहीं ह्मणून त्या अप्रमाण आहेत (सू० २). फळ मिळत नसल्याकारणानें योगशास्त्रही अप्रमाण आहे (सू० ३). वेद व त्याच्या अनुसारी स्मृति ह्या फळ न मिळाल्यामुळें अप्रमाण होत नाहींत, कारण त्यांना नित्यत्वरूप वैलक्षण्य आहे (सू० ४). वेदादिकांमध्यें सांगितलेलें फळ योग्य अधिकाऱ्यांना मिळतें (सू० ५), माती बोलते इत्यादिक वाक्यांत त्यांच्या अभिमानी देवतांचें ग्रहण आहे, कारण त्यांना सामर्थ्य आहे, आणि व्यापकता आहे व त्याचा अनुभव योग्यांना आहे (सू० ६–७). प्रलयकालीं असत् बाकी राहते असें ह्मणणें बरोबर नाहीं, कारण तें निषेधरूपच आहे, तसें असेल तर प्रलयकाळीं असत्च राहतें. असें झाल्यानें तें मत अग्राह्य होईल, कारण प्रलयकाळीं असत्च बाकी राहतें असें ह्मणणें योग्य नाहीं. तर त्या वेळेस पदार्थ असतात हें सिद्ध करणें शक्य आहे. प्रलयकाळीं असत् राहातें ह्यास दृष्टांत नाहीं. तर्काची मर्यादा नसल्यामुळें सिद्धांतीच्या विरुद्ध जर तर्क केला तर मोक्षच नाहीं असा प्रसंग येईल. ह्यावरून वेदाविरुद्ध मताचें खंडन झालें असें जाणावें. (सू० ८–१३). फलभोक्ता ब्रह्मस्वरूप होतो एवढ्यानें दोघांचें ऐक्य आहे असें समजूं नये, तर तेथें लोकाप्रमाणें व्यवस्था जाणावी (सू० १४). श्रुतिप्रमाणावरून स्वतंत्र कारण ब्रह्माहून निराळें नाहीं. जर स्वतंत्र साधन असतें तर तें वेदांत आढळलें असतें. परंतु स्वतंत्र नव्हेत अशीं साधनें आ-

हेत. असत् आहे असें सांगितल्यावरून तेंच आहे असें मानूं नय. तें अस्वतंत्रपणानें आहे असें जाणावें, कारण पुढील वाक्यांत तम आहे असें समजतें. युक्तीनें व शब्दानें साधन परमेश्वराचे अधीन आहे असें जाणावें. वस्त्राचे सृष्टीप्रमाणें जगाची सृष्टि जाणावी. जसे प्राण इत्यादिक स्वतंत्र नाहींत, तसे प्रकृति इत्यादिक स्वतंत्र नाहींत ( सू० १९–२१ ). जीव कर्ता ह्मणावा तर तो आपण होऊन आपलें अहित करतो असा दोष येतो. परमात्म्याला श्रम, चिंता इत्यादि दोष नाहींत, कारण तो अधिक शक्तिमान् आहे. दगडाप्रमाणें जीव हा स्वतंत्र कर्ता नाहीं. आरंभिलेलें काम शेवटास नेतो ह्मणून जीव कर्ता आहे असें म्हणूं नये, कारण गाईमध्यें असलेल्या दुधाप्रमाणें जाणावें. देवादिकांप्रमाणें परमेश्वर लोकांस दृष्टिगोचर होत नाहीं (सू० २२–२६). जीव कर्ता आहे असें घेतलें तर तो सर्वांशांनीं प्रवृत्त होतो असें घेतलें तर गवत घेणें इत्यादि लहान कामांत सुद्धां सर्व शक्ति खर्च करतो असें होईल. जर एक अंशानें काम करतो तर त्याला अवयव नाहींत अशा वेदवाक्यास विरोध येतो ( सू० २७ ). ईश्वर कर्ता ह्या पक्षाला जीवाप्रमाणें दोष येत नाहींत, कारण त्यास वेद हा प्रमाण आहे. परमेश्वराच्या नानाप्रकारच्या शक्ति आहेत. सर्व प्रकारचे दोष जीवालाच आहेत. परमेश्वर सर्वदां सर्वकालीं सर्व शक्तिमान् आहे असें वेदांत सांगितलें आहे. परमेश्वरास हातपाय इत्यादि नाहींत ह्मणून तो कर्ता नाहीं असें म्हणूं नये, कारण त्याला इतरांप्रमाणें प्राकृत हातपाय नाहींत असें जाणावें. फल मिळण्याच्या उद्देशानें परमेश्वर सृष्टि करीत नाहीं, कारण त्यास सर्व मिळालेलें आहे, परंतु तो खेळण्याकरितां सृष्टि करतो (सू० २८—३४). ईश्वर कर्माप्रमाणें फल देतो असें घेतल्यानें त्याला वैषम्य आणि निर्दयत्व येत नाहीं. ईश्वरास ज्या कर्मांची अपेक्षा आहे असें एक अमुक कर्म नाहीं, तर कर्म अनादि आहे. कर्मांची अपेक्षा असूनही ईश्वर स्वतंत्र आहे. परमेश्वरामध्यें सर्व धर्म आहेत (सू. ३९—३८). ह्याप्रमाणें पहिला पाद संपला ॥ १ ॥

पुणे मराठी ग्रंथालय
४३१७ नारायण
दा. नं. ६६६५

# ब्रह्मसूत्राणि ।

## अथ द्वितीयाध्यायः ।

### प्रथमः पादः ।

**ॐ स्मृत्यनवकाशदोषप्रसंगइति चेन्नान्यस्मृत्यनवकाशदोषप्रसंगात् ॐ ॥१॥**

**टीका.**—प्रथमाध्याये प्रतिपादितार्थे युक्त्यादि[1]विरोधाभावं अस्मिन्नध्याये दर्शयति । तत्र प्रथमपादे युक्त्यविरोधं तत्रापि च प्रथमतः स्मृत्यविरोधं दर्शयति ॥ स्मृत्यनवकाशदोषप्रसंगइति ॥ यतः **स्मृत्यनवकाशदोषप्रसंगः** स्मृतीनां पाशुपतादि रूपाणां अनवकाशेन ईशजगत्कर्तृत्वादौ निरवकाशत्वेन श्रुतीनां ईशकारणतापरत्वे तद्विरोधेन दोषप्रसंगः अप्रामाण्याख्यदोषप्राप्तिरस्ति । अतः न श्रुतीनां ईशकारणतापरत्वं युक्तं किंतु शिवादिकर्तृतापरत्वमेव युक्तं **इति चेत् न** । कुतः । **अन्यस्मृत्यनवकाशदोषप्रसंगात्** पाशुपतादिभ्योअन्यासां श्रुतिसंवादित्वेन रुद्राद्यपेक्षयासर्वज्ञतमईशादिप्रणीतत्वेन च इतरस्मृतिभ्यः प्रबलानां पंचरात्रादि स्मृतीनां अनवकाशेन रुद्रादिजगत्कर्तृत्वादौनिरवकाशेन तद्विरुद्धशैवादिस्मृतीनां दोषप्रसंगात् अप्रामाण्याख्यदोषेण प्रकर्षेण संबंधांगीकारेण तद्विरोधस्याकिंचित्करत्वादित्यर्थः ॥ १ ॥

१ युक्तिविरोधः समयविरोधः श्रुतिविरोधः न्यायोपेतश्रुतिविरोधश्चेति चतुर्विधाः विरोधाः संति ।

अर्थ.—[ पहिल्या अध्यायांत जें सांगितलें त्यास युक्ति इत्यादिकांचे चार प्रकारचे विरोध येत नाहींत असें ह्या अध्यायांत दाखवितो. त्यामध्यें पहिल्या पादांत युक्तीचा विरोध येत नाहीं असें दाखवितो. त्यामध्येंही अगोदर स्मृतीचा विरोध येत नाहीं असें दाखवितो. ] श्रुतीमध्यें जगाचा कर्ता ईश्वर आहे असें सांगितलें आहे, ह्याला पाशुपत इत्यादि स्मृतींत ईश्वराला जगत्कर्तृत्व सांगितलें नसल्यामुळें ह्या स्मृतींचा विरोध येतो. ह्यावरून श्रुतीचें प्रमाण खोटें आहे असा दोष येतो. ह्या कारणास्तव ईश्वर हा जगाचा कर्ता आहे असें श्रुतीवरून होतें असें ह्मणणें बरोबर नाहीं, तर शिव इत्यादि जगाचे कर्ते आहेत असा श्रुतीचा अर्थ करणें योग्य आहे, असें जर कोणी ह्मणेल तर तें बरोबर नाहीं. कारण, पशुपति इत्यादि ह्यांच्याहून दुसऱ्यांनीं श्रुतीच्या अर्थाला अनुसरून स्मृति केल्या असल्याकारणानें व रुद्र इत्यादिकांपेक्षां जास्त सर्वज्ञ अशा ईश्वर इत्यादिकांनीं त्या स्मृति केल्या असल्याकारणानें इतर स्मृतींच्यापेक्षां जास्त बळकट अशा पंचरात्र इत्यादि स्मृतींमध्यें रुद्रादिकांना जगत्कर्तृत्व सांगितलें नसल्यामुळें, त्यांच्या विरुद्ध असलेल्या अशा पशुपति इत्यादिकांच्या स्मृतीला दोष येतो. म्हणून स्मृतींचा बलाबलाचा विचार केला असतां पशुपति इत्यादिकांच्या स्मृतींचा जो श्रुतीला विरोध येतो तो कांहींच नाहीं असा होतो. ॥ १ ॥

## ॐ इतरेषांचानुपलब्धेः ॐ ॥ २ ॥

टीका.—नन्वाप्तोक्तानां पाशुपतादिस्मृतीनां कथमप्रामाण्यं युज्यत इत्याशंकां परिहरत्सूत्रं पठित्वा व्याचष्टे ॥ इतरेषामिति ॥ तथाच अनुपलब्धेः अतींद्रियात् इतरेषां भिन्नानां प्रत्यक्षयोग्यानां पाशुपताद्युक्तफलानां अनिष्टानां [१]च तदुक्तक्रियानुष्ठानपरित्यागयोः कृतयोरप्यनुपलब्धेः प्रत्यक्षतोऽदर्शनात् तासामप्रामाण्यमेव युक्तमित्यर्थः ॥ २ ॥

अर्थ—[ जर कोणी अशी शंका घेईल कीं, पशुपति इत्यादिक सत्य

१ च शब्दः किंचित्फलोपलब्ध्यंगीकारसूचकः ।

वक्त्यांनीं केलेल्या स्मृतींना खोटेपणा कसा येतो, तर ह्या शंकेचा परिहार करणारें सूत्र सांगून विवेचन करितो. ] ज्यांना इंद्रियांनीं ज्ञान होण्याची योग्यता आहे त्यांना, पशुपति इत्यादिकांनीं सांगितलेलीं चांगलीं फळें त्यांनीं सांगितलेल्या रीतीनें अनुष्ठान केल्यानेंही मिळत नाहींत व वाईट फळें अनुष्ठान न केल्यानेंही मिळत नाहींत, ह्मणून त्यांच्या स्मृती अप्रमाण आहेत असें ह्मणणें योग्य आहे ॥ २ ॥

## ॐ एतेन योगः प्रत्युक्तः ॐ ॥ ३ ॥

**टीका**—ननु योगस्मृत्युक्तफलादीनामव्यभिचारेणोपलंभात्कथं सर्वासामनीशस्मृतीनामप्रामाण्यमित्याशंकां परिहत्सूत्रमुपन्यस्य व्याचष्टे ॥ एतेनेति ॥ **एतेन** फलादर्शनलक्षणपूर्वोक्तहेतुनैव **योगः** योगशास्त्रं **प्रत्युक्तः** निरस्तमित्यर्थः ॥ ३ ॥

**अर्थ**—[ जर कोणी अशी शंका घेईल कीं, योगस्मृतींत सांगितलेलीं फळें इत्यादि नियमानें मिळत असतां ईश्वराला न लागणाऱ्या सर्व स्मृती प्रमाण नाहींत असें कां म्हणावें तर ह्या शंकेचें समाधान करितो. ] फळ दिसत नसल्यामुळें योगस्मृति अप्रमाण आहे असें ठरतें ॥ ३ ॥

## ॐ न विलक्षणत्वादस्य तथात्वं च शब्दात् ॐ ॥४॥

**टीका**—अत्र वेदादिप्रामाण्यस्य युक्तिविरोधः परिह्रियते । पाशुपतादिस्मृतिवत् श्रुतिस्मृत्युक्तफलानामप्यनुपलब्ध्या तद्वदेव श्रुत्यादेरप्रामाण्यमिति पूर्वपक्षे सिद्धांतयत्सूत्रमूपन्यस्य प्रतिज्ञांशं तावव्द्याचष्टे ॥ नेति ॥ **अस्य** श्रुतितदनुसारिस्मृत्यादेः शैवादिस्मृतिवदप्रामाण्यं **न** । कुतः । **विलक्षणत्वात्** स्वतःप्रामाण्याख्येतरवैलक्षण्यात् । किंच श्रुतेर्नित्यत्वाख्यवैलक्षण्यवत्वात् । स्मृतेः श्रुत्यनुसारित्वाख्यवैलक्षण्यवत्वाच्च नाप्रामाण्यं **तथात्वं च** उक्तवैलक्षण्यवत्वं च **शब्दात्** वाचाविरूपानित्ययेत्यागमान्निश्चितमित्यर्थः ॥ ४ ॥

**अर्थ**—[ ह्या सूत्रांत वेदादिकांच्या प्रामाण्याला युक्तीचा विरोध येत नाहीं असें दाखवितो. पशुपति इत्यादिकांच्या स्मृतीप्रमाणें श्रुति व स्मृति

ह्यांमध्यें सांगितलेलीं फळेंही मिळत नसल्यामुळें त्या सारखेंच श्रुति इत्यादि अप्रामाण आहेत अशी शंका घेऊन तिचें समाधान सांगून वेदादिकांच्या प्रामाण्याला युक्तीचा विरोध येत नाहीं असें सांगतो.] श्रुति व त्यांस अनुसरून असणारी स्मृति इत्यादि ह्यांना पशुपति इत्यादिकांच्या स्मृतीप्रमाणें अप्रामाण्य नाहीं. कारण श्रुत्यादिकांना स्वतःच प्रामाण्य असल्यामुळें दुसऱ्या स्मृतींपेक्षां विलक्षण आहेत, आणखी श्रुति नित्य आहे हा दुसरा विलक्षण गुण आहे. ईश्वरपर असलेल्या स्मृतींत आणखी असा विलक्षण गुण आहे कीं त्या स्मृतीला व श्रुतीला अनुसरून आहेत, ह्मणून त्यांना अप्रामाण्य नाहीं. आणखी नित्यत्वरूप वैलक्षण्य "वाचाविरूपनित्यया" (हे अनेक रूपाच्या परमेश्वरा, नित्य वाणीनें मी तुझी स्तुति करितों.) ह्या श्रुतीवरून ठरत आहे ॥ ४ ॥

## ॐ दृश्यते तु ॐ ॥ ५ ॥

**टीका**—नन्वथापि न वेदस्य प्रामाण्यं तदुक्तफलस्यादर्शनादित्याशंकां परिहरत्सूत्रमुपन्यस्य तच्छेषं पूरयति ॥ दृश्यत इति ॥ तु[1] यतः तत्फलयोग्याधिकारिविशेषाणां श्रुत्याद्युक्तं फलं **दृश्यते उपलभ्यते** अतो नाप्रामाण्यमित्यर्थः ॥ ५ ॥ २ ॥

**अर्थ**—[जर कोणी असें ह्मणेल कीं, असें आहे तथापि वेदाला प्रामाण्य नाहीं, कारण त्यांत सांगितल्याप्रमाणें फळ आढळत नाहीं, तर ह्या शंकेचें निवारण करणारें सूत्र सांगून बाकी राहिलेलें पूर्ण करितो.] वेदांत सांगितलेलें फळ मिळण्यास जे योग्य आहेत त्यांना तें फळ मिळतें, ह्मणून वेदाला खोटेपणा येत नाहीं ॥ ५ ॥

## ॐ अभिमानिव्यपदेशस्तु विशेषानुगतिभ्याम् ॐ ६

**टीका**—अत्र पुनर्वेदप्रामाण्ये युक्तिविरोधः परिह्रियते ॥ अभिमानिव्यपदेश इति ॥ **अभिमानिव्यपदेशः** तु मृदब्रवीदित्यादौ अभिमानिनश्चेतनस्यैव व्यपदेशः उक्तिः । नवचेतनस्य । कुतः । मृन्नवक्त्री । जड-

१ तुशब्दो विशेषार्थे ।

त्वादिति युक्तिविरुद्धत्वात् । तथा च न वेदाप्रामाण्यं । नन्वभिमानिनः विदेहत्वायोगेन । सदेहत्वे तस्यादर्शनं अन्यवस्त्वधिष्ठाने न वक्तृत्वं अनेकाभिमन्यमानाधिष्ठातृत्वं चेत्यादिकं कथं युज्यत इत्यत उक्तं ॥ विशेषेत्यादि ॥ **विशेषानुगतिभ्याम्** विशेषः सामर्थ्यम् अनुगतिः सर्वाभिमन्यमानव्याप्तिः ताभ्यां सर्वं युज्यत इत्यर्थः ॥ ६ ॥

**अर्थ**—[ ह्या सूत्रांत आणखी वेदाच्या खरेपणाविषयीं अनुमानानें येणाऱ्या विरोधाचा परिहार करितो. ] " मृदब्रवीत् " ( ह्मणजे माती बोलली ) इत्यादि श्रुतींत माती ह्या शब्दानें अचेतन माती असें न समजतां मातीची अभिमानी चेतन देवता असें समजावें. कारण, माती अचेतन असल्यामुळें ती बोलत नाहीं ह्या अनुमानाला विरोध येतो. म्हणून माती ह्मणजे मातीची अभिमानी देवता घेतली असतां वेदाला खोटेपणा येत नाहीं. [ आतां जर कोणी असें ह्मणेल कीं मातीची देवता ही देहरहित होऊं शकत नसून तिला बोलतां· येण्यास्तव देह असल्यास, ती देवता दिसत नाहीं, ती दुसऱ्या वस्तूंत राहून बोलते, व ती अनेक ठिकाणीं राहाते हें सर्व कसें घडतें ? तर समाधान सांगतो. ] तिच्यामध्यें तसें सामर्थ्य असून ती आपल्या राहण्याचे जागीं व्याप्त असते, ह्या दोन कारणांनीं तें सर्व घडतें ॥ ६ ॥

## ॐ दृश्यतेच ॐ ॥ ७ ॥

**टीका**—नन्वभिमानिदेवतानां तत्सामर्थ्यस्य च सद्भावे प्रमाणाभावात्कथं तत्कल्पनमित्याशंकां परिहरत्सूत्रं पठित्वातच्छेषमेव पूरयति ॥ दृश्यत इति ॥ अभिमानिदेवतायां सामर्थ्यं योगिभिः दृश्यते उपलभ्यते च अतो ऽपि नादर्शनविरोध इत्यर्थः ॥ ७ ॥ ३ ॥

**अर्थ**—जर कोणी अशी शंका घेईल कीं अभिमानी देवता आहेत व त्यांस सामर्थ्य आहे ह्याविषयीं प्रमाण नाहीं ह्मणून अशी कल्पना कशी करावी ? तर ह्या शंकेचा परिहार करणारें सूत्र सांगून शंकेचा बाकीचा भाग पुरा करतो.] अभिमानी देवतांमध्यें सामर्थ्य आहे ह्याचा अनुभव योग्यांना आहे, ह्मणून त्या दिसत नाहींत असा विरोध येत नाहीं ॥ ७ ॥ ३ ॥

## ॐ असदिति चेन्न प्रतिषेधमात्रत्वात् ॐ ॥ ८ ॥

**टीका**—अत्र ब्रह्मणो जगत्कारणत्वे युक्तिविरोधः परिह्रियते पूर्वपक्षयति ॥ असदिति ॥ **असत्** विश्वप्रागभाव एव जगत्कर्तृत्वे नेश्वर **इति चेन्न**। कुतः । **प्रतिषेधमात्रत्वात्** अभावधर्मात्मतामंतरेण स्वरूपत एव निषेधबुद्धिविषयत्वात् ॥ ८ ॥

**अर्थ**—[ह्या सूत्रांत परमात्मा जगाचा कर्ता आहे ह्याविषयीं अनुमानानें येणाऱ्या विरोधाची शंका घेऊन समाधान सांगतो. ] जग उत्पन्न होण्यापूर्वी जो जगाचा अभाव होता तो जगाचा कर्ता असून ईश्वर हा जगाचा कर्ता नाहीं असें ह्मणणें बरोबर नाहीं. कारण अभावपणा हा धर्म सोडून नुसती नाहीं अशी बुद्धि असते ॥ ८ ॥

## ॐ अपीतौ तद्वत्प्रसंगादसमंजसम् ॐ ॥ ९ ॥

**टीका**—असदेवेतिश्रुतिबलाद्युक्तिविरुद्धस्यापि कस्यचिदसतः कारणत्वस्याभ्युपगमे बाधकाभावादसतोऽपि कारणत्वं किं न स्यादित्याशंकां परिहरत्सूत्रं पठित्वा व्याचष्टे ॥ अपीताविति ॥ **अपीतौ** प्रलये **तद्वत्प्रसंगात्** असन्मात्रवत्वप्रसंगात् । असत्कर्तृत्वं **असमंजसं** अयुक्तमित्यर्थः ॥ ९ ॥

**अर्थ**—[ अनुमानाशीं विरुद्ध असलेला असाही एकादा अभाव " असदेव " ( ह्मणजे प्रमम शून्य होतें ) ह्या श्रुतीच्या आधारावरून जगाचें कारण आहे असें घेतलें असतां त्याला कांहीं बाध येत नसल्याकारणानें अभावही कारण होणार नाहीं ह्या शंकेचें निवारण करून सूत्र सांगून विवेचन करितो. ] प्रलयकाळीं नुसता अभाव राहिल्यामुळें अभाव हा जगाचा कर्ता आहे असें ह्मणणें सयुक्तिक नाहीं. ॥ ९ ॥

## ॐ न तु दृष्टांतभावात् ॐ ॥ १० ॥

**टीका**—नन्वस्माभिरपि प्रलये ऽसन्मात्रावशेषस्याभिलषितत्वान्नानिष्टापादनमेतदित्याशंकां परिहरत्सूत्रमुपन्यस्य व्याचष्टे ॥ नत्विति ॥ प्रलये सर्वासत्त्वं तु न युज्यते । कुतः **दृष्टांतभावात्** तदा सर्वपदार्थत्व एव दृष्टांतस्य भावात् सद्भावादित्यर्थः ॥ १० ॥

---

१ तु शब्दोऽवधारणे ।

**अर्थ**—[ प्रलयकाळीं अभाव मात्र बाकी राहतो असें मत आह्माला मान्य असल्यामुळें तें आमच्या विरुद्ध होत नाहीं अशी शंका कोणी घेईल तर ती दूर करण्याकरितां सूत्र सांगून विवेचन करतों. ] प्रलयकाळीं सर्वांचा अभाव असतो हें ह्मणणें योग्य नाहीं, कारण त्यावेळीं सर्व पदार्थ असतात ह्याविषयीं दृष्टांत मिळतो ॥ १० ॥

## ॐ स्वपक्षदोषाच्च ॐ ॥ ११ ॥

**टीका**—अप्रामाणिकं च प्रलये सर्वासत्त्वमित्यर्थप्रतिपादकं सूत्रमुपन्य. स्य व्याचष्टे ॥ स्वपक्षेति ॥ **स्वपक्षदोषात् च** स्वपक्षे प्रलये सर्वासत्त्वपक्षे दोषात् दृष्टांताभावाख्यदोषाच्च न तत्पक्षो युक्त इत्यर्थः ॥ ११ ॥

**अर्थ**—[ प्रलयकाळीं सर्वांचा अभाव असतो असें ह्मणणें खोटें आहे असें सांगण्याकरितां सूत्र सांगून विवेचन करतों. ] प्रलयकाळीं सर्वांचा अभाव असतो. ह्याविषयीं दृष्टांत नाहीं असा दोष येतो ह्मणून तसें ह्मणणें योग्य नाहीं ॥ ११ ॥

## ॐ तर्काप्रतिष्ठानादन्यथाप्यनुमेयमितिचेदेवमप्यनिर्मोक्ष प्रसंगः ॐ ॥ १२ ॥

**टीका**—तर्केण सदसतोः कारणत्वसाधनबाधने आक्षिप्य समादधत्सूत्रमुपन्यस्याक्षेपांशंतावद्व्याचष्टे ॥ तर्केति ॥ **तर्काप्रतिष्ठानात्** दृष्टांताभावादिरूपतर्कस्याप्रतिष्ठानात् अव्यवस्थितत्वात् **अन्यथा अपि** सिद्धांत्युक्तप्रकाशात् अन्यरूपेणापि प्रतितर्केण **अनुमेयं** साधनियं **इति चेत्** नेति शेषः । कुतः । **एवं अपि** एवं सति तर्कमात्रस्याप्रामाण्ये सति **अनिर्मोक्षप्रसंगः** सर्वसिद्धांतिभिः स्वस्वशास्त्रप्रयोजनत्वेनांगीकृतस्यापि मोक्षस्यापि लोपप्रसंगः । कुतः । तस्य विप्रतिपन्नं प्रति अनुमानेनैव साधनीयतया तस्याप्येवमप्रामाण्योक्तिसंभवादित्यर्थः ॥ १२ ॥

**अर्थ**—[ भाव पदार्थ जगताला कारण आहे व अभाव कारण नाहीं असें अनुमानानें ठरवितां येत नाहीं अशी शंका घेऊन समाधान कर-

ण्यास्तव सूत्र सांगून शंकेचें विवेचन करितो. ] दृष्टान्त नाहीं इत्यादि प्रकारें केलेलें अनुमान अव्यवस्थित असल्या कारणानें दुसऱ्या प्रकारें उलट रीतीनें अनुमान करितां येईल असें कोणी ह्मणेल, तर तसें ह्मणणें बरोबर नाहीं. कारण, सर्व अनुमानें खोटीं आहेत असें ह्मटलें तर सर्व सिद्धांत्यांनीं आपआपल्या शास्त्राप्रमाणें ठरविलेला मोक्ष नाहींसा होईल. ( ह्मणजे चार्वाकाचें मत सिद्ध होईल. ) कारण, जो वाद करितो त्याचेंही ह्मणणें खोटें आहे असें अनुमानाच्या साधनानें दाखवितां येईल ॥ १२ ॥

## ॐ एतेन शिष्टा अपरिग्रहा अपि व्याख्याताःॐ१३

**टीका**—मास्त्वसत्कारणं जगतस्तथापि परमात्मनः जगत्कारणत्वं न संभवति । विप्रतिपन्नं निष्कारणमचेतनकारणं जीवकारणं वा कार्यत्वात् कूलपतनदध्यादिवदिति निष्कारणत्वादिसाधकयुक्तिविरोधादित्याशंकां परिहरत्सूत्रमुपन्यस्य व्याचष्टे ॥ एतेनेति ॥ **एतेन** स्वपरपक्षयोः दृष्टांतभावाभावाख्यहेतुना **अपरिग्रहाः** वेदपरिग्रहशून्याः तद्विरुद्धाश्च **शिष्टाः** अवशिष्टाः जीवकालस्वभावकर्तृत्वपक्षाः **अपि व्याख्याताः** प्रत्याख्याता दूषिता इत्यर्थः ॥ १३ ॥ ४ ॥

**अर्थ**—[ जगाचें कारण अभाव नाहीं असें घेतलें तरी त्याचें कारण परमात्मा असल्याचें संभवत नाहीं. ज्याच्या कारणाविषयीं वाद पडला आहे तें ह्मणजे जग हें कारणरहित, किंवा ज्याचें कारण जड आहे असें, किंवा ज्याचें कारण जीव आहे असें आहे, कारण जग हें कार्य आहे, ह्यास उदाहरण जसा नदीचा कांठ पडतो व दुधाचें दही होतें इत्यादि. ह्याप्रमाणें निष्कारणत्व इत्यादि सिद्ध करण्याकरितां जें अनुमान केलें त्याचा विरोध येत असल्या कारणानें जगाचें कारण परमात्मा नाहीं असें होतें. ह्या शंकेचें समाधान सांगणारें सूत्र सांगून विवेचन करितो. ] आपल्या ह्मणण्याला उदाहरण असल्या कारणानें व दुसऱ्याच्या ह्मणण्याला उदाहरण नसल्या कारणानें, वेदाला न मानणारे व

वेदाच्या विरुद्ध असणारे असे बाकी राहिलेले ह्मणजे जीव, काल व स्वभाव हे जगाचे कर्ते आहेत असें मानणाऱ्यांच्या मतांचेंही खंडन होतें ॥ १३ ॥ ४ ॥

## ॐ भोक्त्रापत्तेरविभागश्चेत्स्याल्लोकवत् ॐ ॥१४॥

**टीका**—अत्र पुनः परमात्मनः जगत्कारणत्वादौ युक्तिविरोधः परिह्रियते। पूर्वपक्षस्य सूत्र एवोक्तत्वात्तदुपन्यस्य पूर्वपक्षांशं तावद्व्याचष्टे॥ भोक्त्रापत्तेरिति ॥ **भोक्त्रापत्तेः** यस्माद्भोक्तुः जीवस्य परेऽव्यये सर्वे एकीभवंतीति वाक्ये ब्रह्मभावापत्तेः श्रवणात् । तयोः **अविभागः** भेदाभावः। तस्मादल्पजीवाभिन्नब्रह्मणः जगत्कारणत्वं न युक्तमिति **चेत्**। नेति शेषः । कुतः **लोकवत्** यथा लोके जले जलांतरस्यैकीभावोक्तिस्तथात्रापि स्थानैक्याद्यालंबनेन जीवेशयोः एकीभवंतीत्यैक्योक्तिः **स्यात्** उपचरिता भवेत् । अतो नोक्तदोष इत्यर्थः ॥ १४ ॥ ५ ॥

**अर्थ**—[ह्या अधिकरणांत परमात्मा हा जगताचें कारण इत्यादि आहे ह्याविषयीं अनुमानाचा जो विरोध येतो त्याचा परिहार करितो. सूत्रांतच शंका सांगितलीं असल्यामुळें सूत्र सांगून शंकेचें विवरण करितो. ] " परेऽव्यये सर्वे एकीभवंति " ( ह्मणजे अविनाशी परमात्म्याच्या ठिकाणीं सर्व एक होतात ) ह्या श्रुतींत, भोक्ता जीव ह्याला ब्रह्मपणा प्राप्त होतो असें सांगितलें आहे, त्या दोघांमध्यें भेद नाहीं, ह्मणून जीवाहून निराळें नव्हे असें ब्रह्म जगाचें कारण आहे असें ह्मणणें सयुक्तिक नाहीं, असें कोणी ह्मणेल तर तें बरोबर नाहीं. कारण, जसें लोकव्यवहारांत पाण्यांत पाणी मिळालें असें ह्मणतात, तसें येथेंही ठिकाण इत्यादि एक झाल्याकारणानें जीव व परमात्मा हे दोघे एक होतात असें ह्मणणें उपचाराचें आहे. ह्मणून परमात्मा हा जगत्कर्ता आहे असें ह्मणण्याला दोष येत नाहीं ॥ १४ ॥ ५ ॥

## ॐ तदनन्यत्वमारंभणशब्दादिभ्यः ॐ ॥ १५ ॥

**टीका**—अत्र परमात्मनः स्वातंत्र्येण जगत्कारणत्वे युक्तिविरोधः परिह्रि

यते । जगत्सृष्ट्यादिकं परमात्मनः स्वान्यस्वतंत्रसाधनसापेक्षं सृष्ट्यादित्वात् । कुलालादेः घटसृष्ट्यादिवदिति पूर्वपक्षे प्राप्ते सिद्धांतयत्सूत्रमुपन्यस्य व्याचष्टे ॥ तदनन्यत्वमिति ॥ **तदनन्यत्वं** तस्य स्वतंत्रकारणस्य ब्रह्माभिन्नत्वं वाच्यम् । कुतः । **आरंभणशब्दादिभ्यः** आरभ्यतेऽनेनेत्यारंभणं साधनं वा आरंभणे फलोपलक्षितकिंस्विदासीदित्याधिष्ठानाद्याक्षेपकवाक्यात् स्वातंत्र्यादियुक्तिभिश्चेत्यर्थः ॥ १५ ॥

**अर्थ**—[ह्या सूत्रांत परमात्मा हा स्वतंत्रपणानें जगाचा कर्ता आहे ह्याविषयीं अनुमानानें जो विरोध येतो त्याचा परिहार करितो. परमात्म्याला जगाची उत्पत्त्यादिक करण्याला आपणाहून निराळें असें स्वतंत्र साधन पाहिजे, कारण त्याला सृष्टि इत्यादि करण्याची आहे, ह्यास उदाहरण, जसा कुंभार इत्यादि ह्यांना मडकें इत्यादि करण्यास तशीं साधनें लागतात. ह्याप्रमाणें शंका आल्यास तिचें समाधान करण्याकरितां सूत्र सांगून विवेचन करितो. ] तें स्वत्रंत कारण ब्रह्माहून निराळें नाहीं असें जाणावें. कारण, " किंस्विदासीत् " ( ह्मणजे काय होतें ) ह्या श्रुतीवरून ठिकाण इत्यादि नकोत असें हातें आणि स्वतंत्र असणारास कांहीं लागत नाहीं असें युक्तीनेंही सिद्ध होतें ॥ १५ ॥

## ॐ भावे चोपलब्धेः ॐ ॥ १६ ॥

**टीका**—युक्त्यंतरेण स्वतंत्रसाधनं प्रातीक्षिपत्सूत्रमुपन्यस्य व्याचष्टे ॥ भावे चेति ॥ यतः ईश्वरान्यस्वतंत्रसाधनस्य **भावे** सत्वे **च उपलब्धेः** दर्शनस्य प्रसंगः इति शेषः । अतोऽपि नास्त्यन्यत्स्वतंत्रसाधनमित्यर्थः ॥ १६ ॥

**अर्थ**—[ दुसऱ्या अनुमानानें स्वतंत्र साधन आहे अशी शंका घेऊन ती दूर करण्यास्तव सूत्र सांगून व्याख्यान करितो. ] आणखी जर ईश्वराहून निराळें असें स्वतंत्र साधन असतें, तर तें दिसलें असतें. ह्मणून दुसरें स्वतंत्र साधन नाहीं असें होतें ॥ १६ ॥

## ॐ सत्वाच्चावरस्य ॐ ॥ १७ ॥

**टीका**—नन्वद्भ्यः संभूत इति श्रुतौ प्रकृतिं स्वामवष्टभ्य विसृजामीति स्मृतौ च भगवदितरस्वतंत्रसाधनप्रतीतेर्न तदनुपलब्धिरित्याशंक्य तत्परिहरत्वेन सूत्रमवतार्य व्याचष्टे ॥ सत्वादिति ॥ **अवरस्य** अस्वतंत्रसाधनस्य **सत्वात् च** एव 'अद्भ्यः संभूतः' इति वाक्यं तत्परं भवतीति न तद्विरोध इत्यर्थः ॥ १७ ॥

**अर्थ**—[ जर कोणी असें ह्मणेल कीं "अद्भ्यःसंभूतः" ( ह्मणजे पाण्यापासून झाला ) ह्या श्रुतींत आणि "प्रकृतिं स्वामवष्टभ्य विसृजामि" ( ह्मणजे आपल्या लक्ष्मीची मदत घेऊन उत्पन्न करितो ) ह्या स्मृतींत परमात्म्याशिवाय दुसरें स्वतंत्र साधन असल्याचें आढळतें, ह्मणून तसें आढळत नाहीं असें नाहीं, अशी शंका मनांत आणून तिचें निवारण करण्याकरितां सूत्र सांगून विवेचन करितो. ] परतंत्र साधन असल्यामुळें "अद्भ्यः संभूतः" ही श्रुति त्या अर्थास अनुसरून असून तीस कांहीं विरोध येत नाहीं ॥ १७ ॥

## ॐ असद्व्यपदेशान्नेति चेन्न धर्मान्तरेण वाक्यशेषात् ॐ ॥ १८ ॥

**टीका**—उक्तमाक्षिप्य समादधत्सूत्रमुपन्यस्याक्षेपांशं तावद्व्याचष्टे ॥ असदिति ॥ **असद्व्यपदेशात्** नासदासीदित्यन्यस्यासत्ववचनात् अन्यसत्वं न युक्तं इति चेत् न । कुतः यतः तन्निषेधः **धर्मान्तरेण** स्वातंत्र्यादिधर्मविशेषेण युज्यते । कुत एतत् । **वाक्यशेषात्** तम आसीदित्यवशिष्टवाक्यशेषादित्यर्थः ॥ १८ ॥

**अर्थ**—[ पूर्वी सांगितलें त्यावर शंका घेऊन समाधान करण्याकरितां सूत्र सांगून शंकेचें विवेचन करितों. ] "नासदासीत्" ( वायू व

---

१ चोऽवधारणे । २ अद्भ्यः संभूतः पृथिव्यैरसाच्चेति नारायणोपनिषदि ।

३ नासदासीन्नो सदासीत्तदानीं नासीद्रजो नो व्योमापरो यदिति श्रुतेः ।

४ तम आसीत्तमसा गूढमग्रे प्रकेतं सलिलं सर्वमाइदमिति श्रुतेः ।

आकाश हे अमूर्त पदार्थ नव्हते ) ह्या व दुसऱ्या श्रुतीवरून दुसरें कांहीं होतें असें ह्मणणें योग्य नाहीं अशी शंका घेणें बरोबर नाहीं. कारण कांहीं नव्हतें ह्मणजे स्वतंत्रपणानें नव्हतें असें ह्मणणें योग्य आहे. हें कशावरून? तर त्या श्रुतीच्या बाकीच्या भागांत " तम आसीत् " ( ह्मणजे तम होतें ) असें सांगिलें आहे ॥ १८ ॥

## ॐ युक्तेः शब्दांतराच्च ॐ ॥ १९ ॥

**टीका**—ननु साधनाभावमभ्युपगम्य सृष्टयादिकर्तृत्वाभ्युपगमे ईश्वरस्य महिमाधिक्यलाभात्किं साधनान्यभ्युपगम्य तेषां तदधीनतांगीकारेणेत्याशंकां परिहरत्सूत्रमुपन्यस्य, व्याचष्टे ॥ युक्तेरिति ॥ प्रलये **युक्तेः** लीलया दंडमवष्टभ्यागंतुः पंगुत्वाभाववत् भगवतोपि लीलया स्वाधीनसाधनावलंबनस्य युक्तत्वात् **च शब्दांतरात्** अद्भ्यः संभूतो हिरण्यगर्भ इत्यष्टाविति आगमविशेषाच्च उक्तं युक्तमित्यर्थः ॥ १९ ॥

**अर्थ**—[ जर कोणी अशी शंका घेईल कीं, साधन नसून परमेश्वरानें सृष्टि उत्पन्न केली असें घेतल्यानें त्याचें माहात्म्य अधिक होत असतां साधनें असून तीं त्याच्या स्वाधीन आहेत असें घेतल्यानें काय उपयोग आहे? तर ही शंका दूर करण्यास्तव सूत्र सांगून विवेचन करितो. ] गमतीकरितां काठी घेऊन जाणाऱ्याला जसें पांगळा असें समजत नाहीं, तसें प्रळयकाळीं परमात्माही क्रीडा करण्यास्तव आपल्या स्वाधीन मात्रें ठेवतो असें समजणें योग्य असल्या कारणानें आणि " अद्भ्यःसंभूतो हिरण्यगर्भ इत्यष्टौ " ( ह्मणजे उदकापासून हिरण्यगर्भ इत्यादि आठ पदार्थ उत्पन्न झाले ) अशी श्रुति असल्या कारणानें पूर्वीं जें सांगितलें तें योग्य आहे ॥ १९ ॥

---

१ साधनानां साधनत्वं यदात्माधीन मिष्यत इत्याद्युक्तेः ।

२ अद्भ्यः संभूतो हिरण्यगर्भ इत्यष्टावितिश्रुतौ अद्भयः अबुपलक्षितभूतैरीश्वरात्संभूतः हिरण्यगर्भः । एवमेव कलामुहूर्ताःकाष्ठाश्चाहोरात्राश्च सर्वशः । अर्धमासा मासा ऋतव संवत्सराश्चेत्युक्ता अष्टौ कलादिकलाभिमानिदेवाश्च संभवंति ।

## ॐ पटवच्च ॐ ॥ २० ॥

**टीका**—साधनसद्भावस्य युक्तिसिद्धत्वाच्च सोऽवश्यमंगीकार्य इत्यर्थप्रतिपादकं सूत्रमुपन्यस्य व्याचष्टे ॥ पटवच्चेति ॥ **च पटवत्** पटसृष्टिवच्च विश्वसृष्टिरपि कर्तृभिन्नसाधनान्तरसाध्येत्यर्थः ॥ २० ॥

**अर्थ**—[ आणखी साधन असणें हें अनुमानानें सिद्ध होत असल्यामुळें तसें मानणें अवश्य आहे, अशा अर्थाचें सूत्र सांगून विवेचन करितो. ] आणखी कापड तयार करण्याच्या रीतीप्रमाणें जग उत्पन्न करण्यालाही जगत्कर्त्याहून दुसरें साधन असलें पाहिजे ॥ २० ॥

## ॐ यथा प्राणादिः ॐ ॥ २१ ॥

**टीका**—तर्ह्येवमेव स्वतंत्रसाधनान्तरसाध्यत्वमप्यनुमातुं शक्यमित्याशंकां परिहरत्सूत्रं पठित्वा व्याचष्टे ॥ यथेति ॥ **यथा प्राणादिः** प्राणदेहेन्द्रियादिकं न स्वतंत्रं एवं प्रकृत्यादिसाधनांतरमपीत्यर्थः ॥ २१ ॥ ६ ॥

**अर्थ**—[ असें आहे तर स्वतंत्र अशा दुसऱ्या साधनानें जग उत्पन्न होईल असेंही अनुमान करण्याजोगें आहे ही शंका निवारण करण्यास्तव सूत्र सांगून विवेचन करितो. ] जसें प्राण देह इंद्रियें इत्यादि स्वतंत्र नाहींत, तसे प्रकृति ( ह्मणजे लक्ष्मी ) इत्यादि हीं दुसरीं साधनेंही स्वतंत्र नाहींत. ॥ २१ ॥ ६ ॥

## ॐ इतरव्यपदेशाद्धिताकरणादिदोषप्रसक्तिः ॐ ॥ २२ ॥

**टीका**—अत्र जीवकर्तृत्वपक्षो निराक्रियते ॥ इतरव्यपदेशादिति ॥ **इतरव्यपदेशात्** जीवाद्भवन्ति भूतानीति श्रुतावुक्तत्वात् स एव कर्ता नेश्वर इति यदि तर्हि **हिताकरणादिदोषप्रसक्तिः** जीवनिष्ठयोः हितानाचरणहिताचरणयोर्दोषत्वप्रसंगः जीवस्य स्वतंत्रत्वात् तेन स्यातामिति भावः । विद्येते च ते जीवे तस्मान्न जीवः स्वतंत्रकर्तेत्यर्थः ॥ २२ ॥

---

१ यः प्राळे तिष्ठन्निितिबृहदारण्यश्रुत्या भगवत्प्रवीष्टत्वं तथा साधनजातमपि भगवदनुप्रविष्ठमिति

**अर्थ**—[ ह्या सूत्रांत जीव हा जगाचा कर्ता आहे ह्या मताचें खंडन करितो. ] " जीवाद्भवन्तिभूतानि " ( ह्मणजे जीवापासून प्राणी उत्पन्न होतता ) ह्या श्रुतीवरून जीव हा कर्ता आहे, व ईश्वर हा कर्ता नाहीं असें कोणी ह्मणेल, तर जीव आपल्याला हितकारक करीत नाहीं व आपल्याला अहितकारक करितो असा दोष येतो. जीव स्वतंत्र असता तर असें घडलें नसतें. परंतु जीवाचे ठिकाणीं तसें घडतें. ह्मणून जीव हा स्वतंत्र कर्ता नाहीं ॥ २२ ॥

## ॐ अधिकं तु भेदनिर्देशात् ॐ ॥ २३ ॥

**टीका**—ननु परमेश्वरस्यापि कथं कर्तृत्वं । तस्यापि श्रमादिदोषनियमादित्याशंकां परिहरत्सूत्रमुपन्यस्य व्याचष्टे ॥ अधिकमिति ॥ ब्रह्म तु[1] जीवापेक्षया **अधिकं** । कुतः । **भेदनिर्देशात्** श्रोतामंतेत्यादि[2]श्रोतृत्वादिरूपविशेषस्योक्तत्वादित्यर्थः ॥ २३ ॥

**अर्थ**—[ जर कोणी असें ह्मणेल कीं परमेश्वर हाही कर्ता कसा होईल, कारण त्यालाही श्रम इत्यादि दोष येतो, तर ह्या शंकेचा परिहार करण्यास्तव सूत्र सांगून विवेचन करितो. ] परमात्मा हा तर जीवापेक्षां अधिक आहे. कारण " श्रोतामंता " ( ह्मणजे परमात्मा हा ऐकणारा, मनन करणारा इ० आहे ) ह्या श्रुतींत परमात्मा हा ऐकणारा इत्यादि आहे असा त्याचा विशेष धर्म सांगितला आहे ॥ २३ ॥

## ॐ अश्मादिवच्च तदनुपपत्तिः ॐ ॥ २४ ॥

**टीका**—नन्वथापि जीवस्य चेतनत्वादीश्वरवदन्यनिरपेक्षतया कर्तृत्वमेव किं न स्यादित्याशंकां परिहरत्सूत्रमुपन्यस्य व्याचष्टे ॥ अश्मादिवदिति ॥ **अश्मादिवत् च**[3] पाषाणादेरिवापि जीवस्य चेतनत्वेपि **तदनुपपत्तिः** स्वतः कर्तृत्वानुपपत्तेरित्यर्थः ॥ २४ ॥

---

१ तु शब्दः जीववंत् ईश्वरस्यापि श्रमचिंतादिदोषाभावविशेषसूचकः । तु शब्दो जीवसाम्यव्यावर्तकः ।

२ बृहदारण्ये ।

३ चोऽपि शब्दार्थः

अर्थ—[ असें असलें तथापि जीव हा चेतन असल्यामुळें परमात्म्याप्रमाणें कशाचीही जरूरी न ठेवितां सृष्टीचा कर्ता कां होणार नाहीं ही शंका दूर करण्याकरितां सूत्र सांगून विवेचन करितो. ] जीव हा चेतन असला तथापि दगडाप्रमाणेंच त्याला स्वतःची कर्तृत्वशक्ति नाहीं ॥ २४ ॥

## ॐ उपसंहारदर्शनान्नेति चेत्क्षीरवद्धि ॐ ॥ २५ ॥

**टीका**—जीवस्य स्वतः कर्तृत्वाभावमाक्षिप्य समादधत्सूत्रं पठित्वा क्षेपांशं तावद्व्याचष्टे ॥ उपसंहारेति ॥ **उपसंहारदर्शनात्** जीवेनारब्धकार्यस्य समापनदर्शनात् स एव कर्तेति उक्तब्रह्मकर्तृत्वं **न इति चेत् न** । कुतः **हि**[1] यस्मात् **क्षीरवत्** गोषु दृश्यमानक्षीरस्य यथा मुख्यप्राणकृतत्वं तथा जीवकृतोपसंहारोऽपि परमात्मकृत[2]एवेत्यर्थः ॥ २५ ॥

**अर्थ**—[ जीवाला स्वतः कर्तृत्वशक्ति नाहीं अशी शंका घेऊन समाधान करण्याकरितां सूत्र सांगून शंकेचें विवेचन करितों. ] जीव जें काम करण्यास आरंभ करितो तें काम संपवितो असें आढळत असल्यावरून तोच जगाचा कर्ता आहे, ह्मणून पूर्वीं सांगितलेलें ब्रह्म कर्ता नाहीं, असें कोणी ह्मणेल तर तें बरोबर नाहीं. कारण, जसा गाईमध्यें आढळणाऱ्या दुधाचा कर्ता मुख्य प्राण आहे, तसा जीवानें शेवटास नेलेल्या कृत्याचा कर्ता परमात्मा आहे ॥ २५ ॥

## ॐ देवादिवदपिलोके ॐ ॥ २६ ॥

**टीका**—नन्वनुपलब्ध्या ईश्वरस्यैवाभावान्नतदधीनकर्तृत्वं जीवस्य वाच्यमित्याशंकां परिहरत्सूत्रमुपन्यस्य व्याचष्टे ॥ देवेति ॥ एवं भूतेश्वरस्य **अपि**[3] **देवादिवत्** अदर्शनं युज्यते । **लोके** जगति पिशाचादीनामपि अदृश्यत्वादिशक्तिर्दृष्टा सर्वेश्वरस्य तु किं वाच्यमित्यर्थः ॥ २६ ॥

---

१ हि शब्देनात्रार्थे अन्नं रसादिरूपेण प्राणः परिणयत्यसावितिश्रुतेः ।

२ य आत्मानमंतरोपमयतीति बृहदारण्ये ।

३ अपिशब्दः कैमुत्यद्योतकः ।

**अर्थ**—[ जर कोणी असें ह्मणेल कीं परमात्मा आढळत नसल्याकारणानें तोच नसल्यामुळें जीवाचें कर्तृत्व परमात्म्याच्या अधीन आहे असें ह्मणूं नये, ही शंका दूर करण्यास्तव सूत्र सांगून विवेचन करितों. ] अशा प्रकारचा परमात्मा देवादिकांप्रमाणें न दिसणें योग्य आहे. जगांत पिशाच इत्यादिकांमध्यें हीं न दिसण्याची शक्ति आहे. असें असतां सर्वांच्या ईश्वराला तशी शक्ति आहे कीं काय हें कशास सांगावयाला पाहिजे ! ॥ २६ ॥

## ॐ कृत्स्नप्रसक्तिर्निरवयवत्वकोपो वा ॐ ॥ २७ ॥

**टीका**—युक्त्यंतरेण जीवस्य स्वतः कर्तृत्वं निराकुर्वत्सूत्रमुपन्यस्य व्याचष्टे ॥ कृत्स्नेति ॥ **कृत्स्नप्रसक्तिः** जीवस्य स्वतः कर्तृत्वे एकेनांगुलिना तृणादानादिलघुतरकार्येपि जीवस्य कृत्स्नप्रसक्त्या पूर्णशक्त्या प्रवृत्तिः स्यात् । न चैवं अनुभवविरोधात् । **वा**[१] **निरवयवत्वशब्दकोपः** जीवस्य तृणादानादौसामर्थ्यैकदेशेन प्रवृत्त्यंगीकारे अथ यः स जीवः स नित्यो निरवयव इति जीवस्य निरवयत्वप्रतिपादकश्रुतिव्याकोपः विरोधः स्यात् । जीवस्य सर्वसामर्थ्येन प्रवृत्तिपक्षे अनुभवविरोधः । एकदेशपक्षे निरवयवत्वश्रुतिविरोध इति सूत्रार्थः ॥ २७ ॥ ७ ॥

**अर्थ**—[ जीव हा स्वतंत्र कर्ता आहे हें ह्मणणें दुसऱ्या अनुमानानें खंडन करण्याकरितां सूत्र सांगून विवेचन करितो. ] जीव हा स्वतः कर्ता आहे व तो सर्व कार्यें सर्व सामर्थ्यानें करण्यास प्रवृत्त होतो असें घेतलें असतां एका बोटानें गवत घेणें इत्यादि फार लहान कामामध्येंही सर्व सामर्थ्यानें तो प्रवृत्त होतो असें ह्मणावें लागेल. तसें ह्मणणें बरोबर नाहीं, कारण अनुभवाला विरोध येतो. अथवा गवत घेणं इत्यादि कार्यामध्यें जीव आपल्या शक्तीच्या थोड्या अंशाचा उपयोग करितो असें घेतलें असतां, 'अथ यः स जीवः स नित्यो निरवयव इति' ( ह्मणजे जो प्रसिद्ध असलेला जीव तो नेहमीं असणारा, अवयवरहित असा आहे ) ह्या

---

१ वा शब्दः पक्षभेदेन दोषापादनसूचकः । वा शब्दो व्यवस्थितविकल्पे वा ।

श्रुतीवरून जीवाला अवयव नसल्यामुळें श्रुतीला बाध येईल. तात्पर्य, जीव सर्वसामर्थ्यानें प्रवृत्त होतो असें मानलें असतां अनुभवाला विरोध येतो, आणि एका अवयवानें प्रवृत्त होतो असें मानलें असतां श्रुतीला विरोध येतो ॥ २७ ॥ ७ ॥

## ॐ श्रुतेस्तुशब्दमूलत्वात् ॐ ॥ २८ ॥

**टीका**—नन्वेवं सति जीवकर्तृत्वपक्षोक्तकृत्स्नप्रसक्त्यादिदोषस्येश्वरकर्तृत्वपक्षेऽपि साम्यादीश्वरस्यापि कर्तृत्वं न युज्यत इति पूर्वपक्षे प्राप्ते सिद्धान्तयत्सूत्रमुपन्यस्य व्याचष्टे ॥ श्रुतेरिति ॥ ईश्वरकर्तृत्वपक्षे तु कृत्स्नप्रसक्तिरित्यादिना जीवकर्तृत्वपक्षोक्तयुक्तिविरोधदोषो नास्ति । कुतः तु[1] **श्रुतेः** योऽसौ विरुद्धइतिश्रुतेरेव । नन्वेतावता कथं युक्तिविरोधशांतिरित्यतउक्तं **शब्दमूलत्वात्** ईश्वरतद्धर्माणां शब्दैकप्रमाणवत्वे युक्त्यविषयत्वात् न तत्र युक्तिविरोधः प्रवर्तते । जीवे तु न तथा । तस्य प्रमाणांतरेणापि गम्यत्वादित्यर्थः ॥ २८ ॥

**अर्थ**—[ असें असल्यास जीव कर्ता आहे असें मानल्यास सर्व सामर्थ्याची प्रवृत्ति झाली पाहिजे इत्यादि जे दोष सांगितले तेच दोष ईश्वर कर्ता आहे असें मानिल्यास येतात, ह्मणून ईश्वरालाही कर्तृत्व मानणें योग्य नाहीं, अशी जर कोणी शंका काढील, तर तिचें निवारण करण्याकरितां सूत्र सांगून विवेचन करितो.] जीव कर्ता आहे असें ह्मणण्यास सर्व सामर्थ्यानें प्रवृत्ति होते इत्यादि जे अनुमानाला विरोध आणणारे दोष येतात ते दोष ईश्वर कर्ता आहे असें ह्मणण्यास येत नाहींत. कारण ‘ योसौ विरुद्ध ’ ( ह्मणजे जो हा ईश्वर विरुद्ध आहे व अविरुद्ध आहे ) अशी श्रुति आहे. जर कोणी असें ह्मणेल कीं, अनुमानाला येणारा विरोध येवढ्यानें कसा नाहींसा होतो, तर असें सांगतो कीं, ईश्वर व त्याचे धर्म ह्यांच्याविषयीं वेदच प्रमाण असल्यामुळें त्याविषयीं अनुमानाचा विरोध येत नाहीं. परंतु जीवाविषयीं तसें नाहीं; कारण तो दुसऱ्या प्रमाणानेंही जाणण्याजोगा आहे ॥ २८ ॥

---

१ तु शब्दो भयंदोषो जीवपक्षेनेश्वरपक्ष इति विशेषद्योतकः ।

४३७ ब ...
दा. नं. ६६६६



## ॐ आत्मनि चैवं विचित्राश्चहि ॐ ॥२९॥

**टीका**—जीव एव युक्तिविरोधो नेश्वर इत्येतमर्थं युक्त्यंतरेण प्रतिपादयत्सूत्रमुपन्यस्य व्याचष्टे ॥ आत्मनीति ॥ च[1] हि[2] **आत्मनि च ईश्वर एव एवं** उक्तप्रकारेण सकलयुक्तिविरोधनिरासकाः **विचित्राः** विविधाः विचित्रशक्तिरिति श्रुतिप्रसिद्धः शक्तयः संति न जीवे । तस्माज्जीवपक्षएव युक्तिविरोधः नेश्वरपक्ष इत्यर्थः ॥ २९ ॥

**अर्थ**—[ जीवाविषयींच अनुमानाचा विरोध येतो, तसा ईश्वराविषयीं येत नाहीं, हा अर्थ दुसऱ्या अनुमानानें सांगण्याकरितां सूत्र सांगून विवेचन करितो. ] अशा प्रकारें अनुमानानें येणाऱ्या सर्व विरोधांचा परिहार करण्याची नानाप्रकारची शक्ती परमात्म्यामध्येंच आहे· कारण ' विचित्रशक्तिरिति ' ( ह्मणजे नानाप्रकारच्या शक्ती आहेत ) अशी श्रुति आहे. तशा शक्ती जीवांत नाहींत. ह्मणून जीवाविषयींच अनुमानाचा विरोध येतो, ईश्वराविषयीं येत नाहीं ॥ २९ ॥

## ॐ स्वपक्षदोषाच्च ॐ ॥ ३० ॥

**टीका**—ननु यथा शब्दैकसमधिगम्यत्वादिना परमात्मनःयुक्तिविरोधोप्यविरोधतां नीयते तथा चेतनत्वादिना जीवेऽपि किं न नीयते। अन्यथेश्वरेपि न नेतव्य इत्याशंकां परिहरत्सूत्रं पठित्वा व्याचष्टे ॥ स्वपक्षेति ॥ च[3] **स्वपक्षदोषात्** ये दोषा इति[4] श्रुतौ जीवपक्षे युक्तिविरोधस्य दोषस्यैवोक्तेः नासावदोषतां नेतव्यः । किंतु ईश्वरपक्ष एव अदोषतां नेतव्य इत्यर्थः ॥ ३० ॥

**अर्थ**—[ जर कोणी असें ह्मणेल कीं, जसा परमात्मा हा नुसत्या वेदप्रमाणानें जाणण्यास योग्य असल्यामुळें त्याविषयीं अनुमानानें येणारा विरोध नाहींसा होतो तसा चेतनत्व असल्या कारणानें जीवाविषयीं

---

१ चशब्दोऽवधारणे ।

२ हिशब्देनविचित्रशक्तिः पुरुषः पुराण इति श्वेताश्वतरश्रुतिसिद्धिं सूचयति ।

३ चोऽवधारणे ।

४ काषायणश्रुतिः ।

अनुमानानें येणारा विरोध कां नाहींसा होत नाहीं? असें नसेल तर परमात्म्याविषयीं अनुमानानें येणारा विरोध नाहींसा होऊं नये. ह्या शंकेचें निवारण करण्यास्तव सूत्र सांगून विवेचन करितो. ] आणखी 'ये दोषा इतरत्रापि' ( म्हणजे जे दोष दुसऱ्यामध्यें आहेत ते परमात्म्याविषयीं गुण आहेत ) ह्या श्रुतींत अनुमानानें येणाऱ्या विरोधाचा दोष जीवालाच लागू आहे असें सांगितलें असल्यामुळें ते दोष नाहींसे होत नाहींत, परंतु परमात्म्याविषयींच ते दोष होत नाहींत ॥ ३० ॥

## ॐ सर्वोपेताचतद्दर्शनात् ॐ ॥ ३१ ॥

**टीका**—सा भगवदीया विचित्रशक्तिर्यदविषया भवति यदाच नश्यति तदा तत्र विरोधःस्यादेवेत्याशंकां परिहरत्सूत्रमुपन्यस्य व्याचष्टे ॥ सर्वेति ॥ यतः परमात्माख्यदेवता न केवलं सामान्यतो विचित्रशक्तिमती किंतु **सर्वोपेता** सर्वविषयसार्वकालिकशक्तिमती **च** । कुतः । **तद्दर्शनात्** सर्वैर्युक्तेति तथा श्रुतेः । अतो नेश्वरे युक्तिविरोधः शंकनीय इत्यर्थः ॥ ३१ ॥

**अर्थ**—[ ती भगवंताची विचित्रशक्ति ज्यास गोचर होत नाहीं व जेव्हां ती नाहींशी होते तेव्हां परमात्म्याविषयीं अनुमानानें विरोध येईल, ही शंका दूर करण्याकरितां सूत्र सांगून विवेचन करितो.] परमात्मा ह्या देवतेला केवळ सामान्यपणें नाना प्रकारच्या शक्ती आहेत एवढेंच नाहीं, तर त्याला सर्व विषयसंबंधीं व सर्व काळीं शक्ती आहेत. कारण, 'सर्वैर्युक्तेति' ( म्हणजे परमात्मा सर्व शक्तींनीं युक्त आहे ) ह्या श्रुतींत तसें सांगितलें आहे. ह्मणून परमात्म्याविषयीं अनुमानानें विरोध येतो अशी शंका करूं नये ॥ ३१ ॥

## ॐ विकरणत्वान्नेति चेत्तदुक्तं ॐ ॥ ३२ ॥

**टीका**—परमात्मनःजगत्कर्तृत्वमाक्षिप्य समादधत्सूत्रमुपन्यस्य व्याचष्टे ॥ विकरणत्वादिति ॥ **विकरणत्वात्** अपाणिपादमिति श्रुत्या ईश्वरस्य हस्तादीन्द्रियशून्यत्वानगमात् **नं इति चेत्** ईश्वरस्य कर्तृत्वं न युक्तमि-

१ मेत्यावर्तते ।

ति चेत् न । कुतः । यस्मात् तदुक्तं तस्मिन्नतस्येत्याद्यागमेन तत्करण-राहित्यस्य प्राकृतेन्द्रियविषयत्वमुक्तं । तस्मादित्यर्थः ॥ ३२ ॥ ८ ॥

**अर्थ**—[ परमात्मा हा जगाचा कर्ता असल्याविषयीं शंका घेऊन समाधान करण्यास्तव सूत्र सांगून विवेचन करितो. ] ' अपाणिपादमिति ' ( ह्मणजे परमात्म्याला हात पाय नाहींत ) ह्या श्रुतीवरून परमात्म्याला हात पाय इत्यादि इन्द्रियें नाहींत असें समजत असल्यामुळें तो कर्ता आहे असें ह्मणणें योग्य नाहीं. असें कोणी ह्मणेल तर तें बरोबर नाहीं. कारण ' न तस्येति ' ( ह्मणजे परमात्म्याला कार्य व इन्द्रियें नाहींत ) ह्या श्रुतीनें त्याला इन्द्रियें नाहींत ह्मणजे प्राकृत इंद्रियें नाहींत असें जाणावें. ह्मणून प्राकृत इंद्रियें नसलीं तथापि परमात्म्याला जग करितां येईल ॥ ३२ ॥ ८ ॥

## ॐ न प्रयोजनवत्वात् ॐ ॥ ३३ ॥

**टीका**—अत्र हरेर्जगत्कर्तृत्वे निष्फलत्वादियुक्तिविरोधः परिह्रियते ॥ नेति ॥ ईश्वरस्य सृष्ट्यादौ प्रवृत्तिस्वप्रयोजनोद्देशेन **न** । कुतः । **प्रयोजनवत्वात्** पूर्णानंदत्वेन प्राप्तप्राप्तव्यत्वादित्यर्थः ॥ ३३ ॥

**अर्थ**—[ फळाशिवाय कोणी कांहीं करीत नाहीं. जग करण्यांत फळ नाहीं. ह्मणून परमात्मा जगाचा कर्ता नाहीं. अशा अनुमानानें जो विरोध येतो त्याचा परिहार ह्या सूत्रांत करितो. ] आपणास फळ मिळावें अशा उद्देशानें सृष्टि इत्यादि परमात्मा करीत नाहीं. कारण तो पूर्णानंद असल्यामुळें मिळण्यास जें योग्य तें सर्व त्यास मिळालें आहे ॥ ३३ ॥

## ॐ लोकवत्तु लीलाकैवल्यं ॐ ॥ ३४ ॥

**टीका**—फलानुद्देशेऽपि प्रवृत्त्यनुपपत्तिरिति तत्परिहाराय सूत्रमुपन्यस्य व्याचष्टे ॥ लोकवदिति ॥ **लोकवत्** लोके मत्तादिप्रवृत्तिरिवेश्वरप्रवृत्तेः **लीलाकैवल्यं तु** केवललीलारूपत्वमेव न स्वप्रयोजनोद्देश्यत्वमित्यर्थः ॥ ३४ ॥ ९ ॥

---

१ भोगार्थं सृष्टिरित्यन्ये क्रीडार्थमिति चापर इति मांडुक्ये ।

२ तुशब्द एवार्थे ।

**अर्थ**—[ फळ मिळण्याचा हेतु असल्याशिवाय प्रवृत्ति होत नाहीं ही शंका दूर करण्यास्तव सूत्र सांगून विवेचन करितो. ] जगांतील उन्मत्त मनुष्याच्या वागणुकीप्रमाणें परमात्म्याची प्रवृत्ति होत असल्यामुळें तो आपल्याला फळ मिळण्याची इच्छा न धरितां केवळ खेळण्याकरितां जग करितो ॥ ३४ ॥ ९ ॥

## ॐ वैषम्यनैर्घृण्ये न सापेक्षत्वात्तथाहि दर्शयति ॐ ॥ ३५ ॥

**टीका**.—अत्र परमात्मनः सर्वकर्त्तृत्वे वैषम्यादिदोषप्राप्तियुक्तिविरोधः परिन्हियते ॥ वैषम्येति ॥ स्वातंत्र्यसिध्यर्थमीश्वरस्य जीवेभ्यः फलदाने कर्मापेक्षानंगीकारे निर्निमित्तं वैषम्येन फलदातुस्तस्य **वैषम्यनैर्घृण्ये** विषमत्वनिर्दयत्वे ये प्रसक्ते ते **न** स्तः । कुतः । **सापेक्षत्वात्** ईश्वरस्य कर्मापेक्षावत्वाभ्युपगमात् । **हि** यस्मात् **तथा** तदेव **दर्शयति**[1] पुण्येन पुण्यमिति श्रुतिस्[2]तथाप्रतिपादयतीत्यर्थः ॥ ३५ ॥

**अर्थ**.—[ परमात्मा हा सर्व कर्ता आहे असें ह्मटलें असतां वैषम्य ( ह्मणजे कमी जास्त करणें ) इत्यादि दोष येत असल्यामुळें अनुमानानें जो विरोध येतो त्याचा परिहार करितो. ] ईश्वराचा स्वतंत्रपणा सिद्ध होण्यासाठीं त्यानें जीवाला फळ देतानां कर्म पाहाण्याची अवश्यकता ठेविली नाहीं, तर तो विनाकारण एकाला कमी व दुसऱ्याला जास्त फळ देतो असें होईल. तसें केलें असतां वैषम्य ह्मणजे सर्वांना सारखें फळ न देणें व नैर्घृण्य ह्मणजे निर्दयपणा हे दोन दोष ईश्वराला येतात असें कोणी ह्मणेल, तर तें बरोबर नाहीं. कारण, ईश्वर हा कर्म पाहून फळ देतो. कारण, ‘ पुण्येन पुण्यं लोकं नयति ’ ( म्हणजे पुण्य केल्यानें पुण्यलोकांस नेतो ) ह्या श्रुतींत तसें सांगितलें आहे ॥ ३५ ॥

---

१ एष ह्येव साधु कर्म कारयति तं यमेभ्यो लोकेभ्य उन्निनीषते एष उ एवासाधु कर्म कारयति तं यमधो निनीषत इति श्रुतेः ।

२ बृहदारण्ये चतुर्थाध्याये ।

## ॐ न कर्माविभागादिति चेन्नानादित्वात् ॐ ॥ ३६ ॥

**टीका**—कर्मापेक्षया फलदातृत्वमाक्षिप्य समादधत्सूत्रमुपन्यस्याक्षेपांशं तावद्व्याचष्टे ॥ न कर्मेति ॥ **कर्म** वैषम्यनैर्घृण्यादिदोषपरिहाराय ईशेनापेक्षणीयं यत्कर्म तत् **न** नास्तीति विशिष्टनिषेधः । कुतः । **अविभागात्** तस्य कर्मणः अस्वतंत्रवस्तुभ्यः अविभक्तत्वात् । अस्वतंत्रत्वादिति यावत् । तथाच स्वाधीनकर्मापेक्षया वैषम्यादेरपरिहारः **इति चेत् न** । कुतः । **अनादित्वात्** । कर्मपरंपरायाः अनादित्वादित्यर्थः । तथा चेश्वरः पूर्वपूर्वमपेक्ष्योत्तरोत्तरकर्म जीवेन कारयतीत्यंगीकारेण कर्मणः अपेक्षणीयत्वापत्तेः नोक्तदोष इति भावः ॥ ३६ ॥

**अर्थ**—[ कर्म पाहून ईश्वर फळ देतो असें ह्मणण्यावर शंका घेऊन समाधान करण्यास्तव सूत्र सांगून शंकेचें विवेचन करितो. ] वैषम्य व नैर्घृण्य हे दोष न येण्यास्तव ईश्वर जें कर्म पाहातो असें विशेष कर्म नाहीं. कारण, कर्म स्वतंत्र नाहीं. असें आहे तर, ईश्वर आपल्या अधीन असलेलें कर्म पाहून फळ देतो असें ह्मटलें, तर वैषम्य इत्यादि दोष नाहींसे होत नाहींत असें कोणी ह्मणेल, तर तें बरोबर नाहीं. कारण, कर्माची परंपरा अनादि आहे. असें आहे ह्मणून ईश्वर पूर्वीचें पूर्वीचें कर्म पाहून पुढील पुढील कर्म जीवाकडून करवितो असें घेतलें असतां कर्म पाहून फळ देण्याचें असल्यामुळें वर सांगितलेला दोष येत नाहीं ॥ ३६ ॥

## ॐ उपपद्यते चाप्युपलभ्यते च ॐ ॥ ३७ ॥

**टीका**—ननु तथापि नियमेन कर्मापेक्षयैव फलदातुरीश्वरस्यास्वातंत्र्यं प्रसज्यत इत्याशंकां परिहरत्सूत्रमुपन्यस्य व्याचष्टे ॥ उपपद्यत इति ॥ च ईश्वरस्य कर्मापेक्षायामपि **उपपद्यते** स्वातंत्र्यं युज्यत एव कर्मणः स्वाधीनत्वात् । ननु पुनः स्वाधीनकर्मसापेक्षत्वकृतवैषम्यापात् इ-

त्यत उक्तम् **उपलभ्यते च** स कारयेदिति श्रुत्या तादृशवैषम्यं अदोषत्वेन ज्ञायते चेत्यर्थः ॥ ३७ ॥ १० ॥

**अर्थ**—[ तसें असलें तरी नियमानें कर्म पाहून फळ देणारा ईश्वर स्वतंत्र नाहीं असें होतें अशी कोणी शंका काढील, तर तिचें समाधान करण्यास्तव सूत्र सांगून विवेचन करितो. ] आणखी ईश्वराला कर्माची अपेक्षा असली तरी तो स्वतंत्र आहे असें ह्मणणें योग्य आहे, कारण कर्म त्याच्या स्वाधीन आहे. आणखी जर कोणी असें ह्मणेल कीं, आपल्या स्वाधीन असलेलें कर्म पाहून फळ देतो तर पुनः वैषम्य हा दोष येतो. ह्यावर असें सांगतो कीं, 'स कारयेत्पुण्यमथापिपापं' ( ह्मणजे परमेश्वर जीवाकडून पुण्य अथवा पाप करवितो ) ह्या श्रुतीवरून तसें वैषम्य आल्यास दोष नाहीं असें समजतें ॥ ३७ ॥ १० ॥

## ॐ सर्वधर्मोपपत्तेश्च ॐ ॥ ३८ ॥

**टीका**—परमात्मनःगुणपूर्णत्वं न युक्तं सर्वचेतनानामपूर्णत्वनियमात्तस्यापि चेतनत्वेनापूर्णताया अवश्यं भावित्वादिति प्राप्ते सिद्धांतयत्सूत्रं पठित्वा व्याचष्टे ॥ सर्वेति ॥ **च सर्वधर्मोपपत्तेः** गुणदोषाभाववत्त्वरूपाणां उपपत्तेः स्वातंत्र्यादिना ब्रह्मणि युक्तत्वाच्च न तस्य गुणपूर्णत्वे युक्तिविरोधः शंकनीय इत्यर्थः ॥३८॥११॥ इति द्वितीयाध्याये प्रथमः पादः॥१॥

**अर्थ**—[ ईश्वर सर्वगुणपूर्ण आहे असें ह्मणणें योग्य नाहीं. कारण सर्व चेतन अपूर्ण असल्यामुळें तोही चेतन असल्याकारणानें अवश्य अपूर्ण असला पाहिजे असें कोणी ह्मणेल तर त्याविषयीं सिद्धांत सांगण्याकरितां सूत्र सांगून विवेचन करितो. ] ईश्वर स्वतंत्र असल्या कारणानें त्याच्यामध्यें गुण असणें व दोष नसणें अशा प्रकारें सर्व धर्म असणें योग्य असल्यामुळें अनुमानानें विरोध येण्याची शंका घेऊं नये ॥३८॥११॥ ह्याप्रमाणें दुसऱ्या अध्यायाचा पहिला पाद संपला ॥ १ ॥

# द्वितीयाध्यायद्वितीयपादप्रतिपाद्यविषयः ।

निरीश्वरसांख्यानुमानकल्पितस्य प्रधानस्य जगत्कर्त्तृत्वं न यतस्तस्य जडत्वेन स्वतःप्रवृत्तिर्न युज्यते । जगति चेतनस्यैव प्रवृत्तिदर्शनात् । पयोंबुवत्प्रवृत्तिर्न युज्यते । यतस्तत्रापीश्वरप्रवृत्तिरस्ति । ईश्वरव्यतिरेकेण कस्यापि कर्मणोऽसत्वमतएवाचेतनस्यैव स्वतः प्रवृत्त्यभावात्सांख्यमतस्याप्रामाणिकत्वं (सू. १—४)। सेश्वरसांख्यपक्षोऽपि न युज्यते। यतई श्वरप्रेरणां विना जगतोऽभावादीश्वरस्य प्रकृत्यादिसत्ताप्रदत्वं चेति (सू. ५)। चार्वाकमते विषयप्रयोजनयोरभावोऽस्ति तस्मात्तत्पक्षोऽयुक्तः (सू. ६)। अचेतनशरीरस्य पुरुषसंबंधेन यथाश्मानयनादौ प्रवृत्तिस्तथा चेतनसंबंधेनाचेतनमपि प्रवर्तते इति न युक्तं। यतस्तत्र दृष्टांतो नास्ति। अंगित्वानुपपत्तिःस्यात् (सू. ७—८) । अचेतनसंबंधेन चेतनस्य प्रवृत्तिस्वीकारे शरीरसंबंधार्थं जीवस्य शक्तिवियोगो भवेत्तस्मात्तन्मतमयुक्तं । सकलश्रुतिस्मृतियुक्तिविरुद्धत्वादनीश्वरमतमयुक्तं (सू. ९—१०)। वैशेषिकमते यथा त्र्यणुकगतान्महत्त्वाद्दीर्घत्वाच्च चतुरणुकगतपरिमाणमुत्पद्यते तथा द्व्यणुकपरमाणूभयगतन्ह्रस्वत्वपारिमांडल्यपरिमाणाभ्यामपि त्र्यणुकद्व्यणुकगतंपरिमाणोत्पत्तिः स्यान्नोचेत्पूर्वोक्तमपि न स्यात्तस्मात्तन्मतमयुक्तं । ईश्वरेच्छायानित्यत्वानित्यत्वरूपपक्षद्वयेऽपि परमाणुषु कार्योत्पत्तिर्न युक्ता तस्मात्तत्र द्व्यणुकादिकार्याभावः । अवयवावयविनोर्भिन्नत्वहेतुना समवायो गृहीतस्तर्हि तत्साम्येन समवाय्यसमवायिनोरपि समवायांगीकारेऽनवस्थेतितन्मतमयुक्तं । ईशेच्छापरमाण्वादीनां सदात्वात् । सदैव कार्योत्पत्तिर्भवेत् । परमाणूनां रूपादिमत्वात्तेषामनित्यत्वं तथा लोके दृष्टं । परमाणूनां नित्यत्वानित्यत्वरूपपक्षद्वयेऽपि दोषोऽस्ति । श्रुत्यादिपरिग्रहशून्यत्वात् वैशेषिकमतमनादरणीयं (सू. ११— १७)। बौद्धमते उभयहेतुकेऽपि समुदाये परमाणुपुंजलक्षणकार्यस्याप्राप्तिस्तस्माद्बौद्धपक्षस्यायुक्तत्वं । परमाणूनामितरेतरापेक्षा

बुद्धिनिमित्तकत्वं नास्ति किं तूत्पत्तिमात्रनिमित्तकत्वं विद्यते तस्मात्क्षणिकमत-मयुक्तं। विशेषकार्योत्पत्तिर्न युज्यते। यतःकार्यमुत्पाद्य कारणस्य नाशोऽस्ति। असति कारणे कार्यं भवतीत्यंगीकारे सिद्धांतव्यवहारहानिरन्यथाकारणेन सहकार्याणामेकदावस्था स्यात्। कार्यनाशं विना कारणनाशः कार्येण सह कारणनाशस्तयोरप्राप्तिर्यतः कार्यपरंपरायाः विच्छेदो नास्ति। कारणे सति कार्यं तदभावपक्षे च कार्यमित्युभयपक्षेपि दोषोऽस्ति तस्मात्क्षणिकपक्षो न युक्तः (सू१८–२३)। आकाशे दीपवाद्विशेषो नास्ति। तदेवेदमिति प्रत्य-भिज्ञानाज्जगतः क्षणिकत्वं नास्ति (सू. २४–२५)। असतः जगत्कारणत्वं नास्ति यतस्तत्र प्रमाणं नास्ति। एवं सति गगनकुसुमादीनां सौरभ्यसि-द्धिर्भवेत्। उपलब्धिहेतुना जगदभावस्वरूपं न। विलक्षणत्वकारणेन स्व-प्नादिवज्जगदसन्न (सू.२६–२९)। जगतः ज्ञानात्मकत्वं नास्ति। यतस्तयाऽ-नुभवो नास्ति। ज्ञानस्य क्षणिकत्वमस्ति। बौद्धसिद्धांतः सर्वप्रकारैरनु-पपन्नः (सू. ३०–३२)। जैनोक्तप्रकाराः एकत्र न संभवंति। कायपरि-माणेऽगींकृते सत्यात्मन अकार्त्स्न्यं भवेत्। क्रमेण तत्तद्देहपरिमाणत्वांगी-कारेण विरोधो नेति न युज्यते। तथा सत्यात्मनो विकारित्वापत्तेः। का-यपरिमाणत्वे मोक्षेऽप्यात्मनः शरीरसत्वमंगीकरणीयं स्यात्। तस्मात्का-यपरिमाणत्वमात्मनो न युक्त (सू.३३–३६)। पशुपतेर्जगत्कारणत्वं नास्ति। तस्य परतंत्रत्वरूपदोषोऽस्ति। अशरीरत्वेन तस्य संबंधो न युक्तः। आ-श्रयाद्यनुपपत्तिहेतुना शिवस्य जगत्कारणत्वं न। तस्य साधनजातं शरीरवन्नास्ति। तथा सति सुखदुःखभोगोत्पत्तिमरणादिदोषः स्यात्। शि-वस्य देहित्वेंऽतवत्वं तदभावे चासर्वज्ञत्वं स्यात् (सू.३७—४१)। शक्ते-र्जगत्कारणत्वं नास्ति। यतः केवलस्त्रीभ्य उत्पत्तिर्न विद्यते (सू.४२)। शि-वस्य ज्ञानसाधनं नास्ति। तस्मात् शक्त्यनुग्राहकत्वं नास्ति (सू.४३)। शिव-स्य ज्ञानेच्छादिसत्वेऽगीकृते शैवपक्षस्यानिरासः। तस्य च दूषितत्वं (सू. ४४)। सकलश्रुतिस्मृतिविरुद्धहेतुना शक्तिमतमयुक्तं (सू. ४५)। इति द्वितीयाध्यायद्वितीयपादप्रतिपाद्यविषयः समाप्तः ॥ २ ॥

# दुसऱ्या अध्यायाच्या दुसऱ्या पादांतील विषय.

ईश्वर नाहीं असें मानणाऱ्या सांख्यमतीं अनुमानांनीं कल्पना केलेलें प्रधान ( जड ), जगाचा कर्ता नाहीं, हें कारण तें जड असल्यामुळें स्वतः कांहीं करूं शकत नाहीं. कारण जगामध्यें चेतनच कार्य करूं शकतों. पाणी व दुधाप्रमाणें प्रवृत्ति होईल असें म्हणणें बरोबर नाहीं; कारण तेथें सुद्धां परमेश्वराची प्रवृत्ति आहे. ईश्वराशिवाय कोणतेंच कर्म होत नाहीं. ह्मणून जडाची स्वतः प्रवृत्ति होत नाहीं. ह्यास्तव सांख्य-मत प्रमाणविरुद्ध आहे (सू. १–४). ईश्वर आहे असें मानणाऱ्या सांख्यांचें मत बरोबर नाहीं, कारण ईश्वराच्या प्रेरणेशिवाय जगत चालत नसल्यामुळें ईश्वरच प्रकृति इत्यादिकांना सत्ता देणारा आहे ( सू. ५ ). चार्वाकाचे मतें विषय व प्रयोजन नसल्या कारणानें तें मत अयोग्य आहे (सू. ६).जसें, जड शरीर, चेतन पुरुषाचा संबंध असल्यानें दगड आणणें इत्यादि क्रिया करतें, तसें जडही चेतनाच्या संबंधानें जगाचा कर्ता होईल असें ह्मणणें योग्य नाहीं; कारण त्यास दृष्टांत मिळत नाहीं. अंगित्व हा दोष येईल ( सू. ७–८ ). चेतनाची प्रवृत्ति अचेतनाच्या संबंधानें होते असें मानलें असतां शरीरसंबंध करण्याकरितां जीवांस शक्ति नाहीं असें होईल, ह्मणून तें मत अयोग्य आहे. सर्व श्रुति, स्मृति आणि युक्ति ह्या सर्वांशीं विरुद्ध असलेलें अनीश्वर वाद्याचें मत अयोग्य आहे (सू.९–१०). वैशेषिकाचे मतें जसें त्र्यणुकाचें महत्त्व आणि दीर्घत्व ह्यापासून चतुरणुकाचें महत्त्वदीर्घत्वरूप परिमाण होतें तसें द्व्यणुक आणि परमाणु ह्या दोहोंच्या परिमाणापासून क्रमानें त्र्यणुक व द्व्यणुक ह्यांची उत्पत्ति व्हावी तशी जर होत नाहीं, तर पूर्वींचीही होऊं नये, ह्मणून तें मत अयोग्य आहे. ईश्वराची इच्छा नित्य आहे व अनित्य आहे ह्या दोन्हीही पक्षीं परमाणूपासून कार्याची उत्पत्ति होणें योग्य नाहीं

ह्मणून त्यापासून व्द्यणुक इत्यादि कार्य होणें अयोग्य आहे, अवयव आणि अवयवी भिन्न असल्यामुळें त्यांचा समवायसंबंध घेतला तर त्याचप्रमाणें समवाय्य आणि समवायी यांचा समवाय संबंध घ्यावा लागेल तसें केलें तर अनवस्था प्राप्त होतें. ह्मणून तें मत अयोग्य आहे.

ईश्वराची इच्छा व परमाणु इत्यादि नित्य आहेत म्हणून कार्यही नित्य होईल. परमाणूंनां रूप इत्यादिक आहेत म्हणून ते अनित्य असावेत असें लोकांत दिसत आहे. परमाणू नित्य आहेत व अनित्य आहेत ह्या दोन्हीपक्षीं दोष नाहीं. श्रुति इत्यादिकांनीं घेतलें नाहीं म्हणून वैशेषिकमत आदरण्यास योग्य नाहीं (सू. ११–१७). बौद्धमतीं समुदायाला दोन कारणें आहेत असें मानलें असतां परमाणूंच्या पुंजापासून कार्य होणार नाहीं, म्हणून बौद्धमत अयुक्त आहे. क्षणिकमतीं परमाणूंना परस्परांची अपेक्षाबुद्धीही निमित्त आहे असें नाहीं, तर उत्पत्तिमात्र होण्यास निमित्त आहे, म्हणून क्षणिक मत अयुक्त आहे. विशेष कार्य होऊं शकणार नाहीं, कारण कार्य उत्पन्न झाल्यावर कारणाचा नाश होतो. कारण नसूनही कार्य होतें असें जर मानिलें तर सिद्धांताचा व्यवहार नाश होईल. असें नसेल तर कारण व कार्यें एकदम होतात अशी अवस्था होईल. कार्याचा नाश झाल्याशिवाय कारणाचा नाश होतो. कार्याबरोबर कारणाचा नाश होतो. ह्या दोहोंचीही प्राप्ति नाहीं. कारण कीं कार्याच्या परंपरेचा नाश नाहीं. कारण असतां कार्य होतें व कारण नसतां कार्य होतें ह्या दोन्हीही पक्षांत दोष आहेत, म्हणून क्षणिक मत अयुक्त आहे (सू. १८–२३). आकाशामध्यें दीपाप्रमाणें विशेष नाहीं. तेंच हें आहे अशी ओळख आहे ह्मणून जग हें क्षणिक नाहीं (सू. २४-२५). असत् हें जगाचें कारण नाहीं, कारण त्यास प्रमाण नाहीं असें झालें तर आकाशरूपीं फुलापासून सुगंध मिळेल. जगाचा अनुभव येत आहे ह्मणून तें अभावरूप नाहीं. तें विलक्षण आहे ह्या कारणावरून तें स्वप्न इत्यादिकाप्रमाणें असत नाहीं (सू. २६–२९). जग हें ज्ञानस्वरूप नाहीं,

कारण तसा अनुभव नाहीं. ज्ञान हें क्षणिक आहे. बौद्धांचा सिद्धांत सर्व प्रकारांनीं युक्तिविरुद्ध आहे (सू. ३०–३२). जैनांनीं सांगितलेले प्रकार एक ठिकाणीं संभवत नाहीत. जीव शरीरा एवढा असतो असें घेतलें असतां जीवाला अपुरतेपणा येईल. क्रमाक्रमानें त्या त्या देहाएवढा जीव होतो असें घेऊन विरोध येत नाहीं असें ह्मणणें योग्य नाहीं; कारण तसें झाल्यास जीव हा विकारी होईल. जीव शरीराएवढा आहे असें मानलें असतां मोक्षांत सुद्धां जीवाला शरीर असतें असें मानावें लागेल; म्हणून जीव शरीराएवढा आहे असें म्हणणें बरोबर नाहीं ( सू. ३३—३६ ). पशुपति हा जगाचा कर्ता नाहीं, कारण त्याला परतंत्रपणा हा दोष आहे. त्याला शरीर नसल्यामुळें त्याबरोबर संबंध योग्य नाहीं. आधार इत्यादिकांची अडचण असल्या कारणानें शिव हा जगाचें कारण नाहीं. त्याला शरीराप्रमाणेंच साधनसामग्रीही नाहीं. तसें असेल तर सुख, दुःख, उपभोग, उत्पत्ति, मरण इत्यादि दोष येतील. जर शिवाला देह असेल तर त्याचा नाश होईल आणि देह नसेल तर तो सर्वज्ञ होणार नाहीं ( सू. ३७—४१ ). शक्ति ही जगाचें कारण नाहीं, कारण एकट्या स्त्रीपासून उत्पत्ति होत नाहीं. शिवाला ज्ञानाचें साधन नाहीं म्हणून तो शक्तीला मदत करणारा होऊं शकत नाहीं ( सू. ४३ ). शिवाला ज्ञान, इच्छा इत्यादिक आहेत असें मानलें असतां शैवपक्षाचें खंडन होणार नाहीं; परंतु ज्ञान इच्छादि नाहीं असें तर पूर्वींच सांगितलें ( सू. ४४ ). सर्वश्रुति, स्मृति, ह्यांशीं विरुद्ध असल्याकारणानें शक्तिवाद्याचें मत अयोग्य आहे ( सू. ४५ ) ॥ २ ॥ ह्याप्रमाणें दुसरा पाद संपला.

# अथ द्वितीयःपादः

श्री वेदव्यासाय नमः श्री गुरुभ्यो नमः

## ॥ ॐ रचनानुपपत्तेश्च नानुमानं ॐ ॥ १ ॥

टीका—अत्र नये निरीश्वरसांख्यमतं निरस्यते ॥ रचनेति ॥ **अनुमानं**[1] सांख्यानुमानैकल्पितं प्रधानं **न** जगत्कर्तृ । कुतः **रचनानुपपत्तेः** प्रधानस्य जडत्वेन स्वतः प्रवृत्त्यनुपपत्तेः । **च** अचेतनस्य स्वतः प्रवृत्तौ प्रमाणाभावादित्यर्थः ॥ १ ॥

अर्थ—[ ह्या अधिकरणांत, ईश्वर नाहीं असें ह्मणणाऱ्या सांख्यांच्या मताचें खंडन करितो. ] सांख्यांनीं अनुमानानें कल्पिलेलें प्रधान ह्मणजे जड हें जगाला उत्पन्न करणारें नाहीं. कारण प्रधान हें जड असल्यामुळें तें स्वतः कांहीं करूं शकत नाहीं, आणि जड कांहीं करूं शकतें अशाविषयीं प्रमाण नाहीं ॥ १ ॥

## ॥ ॐ प्रवृत्तेश्च ॐ ॥ २ ॥

टीका—इतश्च जडं न कर्त्रित्याह ॥ प्रवृत्तेरिति ॥ च[3] अहंकरोमीति चेतनस्यैव **प्रवृत्तेः** दर्शनात् न प्रधानं जगत्कर्तृ इत्यर्थः ॥ २ ॥

अर्थ—[ ह्यापुढें जड हें कांहीं उत्पन्न करीत नाहीं असें सांगतो. ] आणखी मी करीन अशी प्रवृत्ति चेतन पदार्थालाच आढळते. ह्मणून प्रधान हें जगाला उत्पन्न करणारें नव्हे ॥ २ ॥

## ॥ ॐ पयोंबुवच्चेत्तत्रापि ॐ ॥ ३ ॥

टीका—जडत्वान्न कर्तृप्रधानमित्युक्तमाक्षिप्याह ॥ पयोंबुवदिति ॥ **पयोंबुवत्** यथाऽचेतनमेवपयः दध्याकारेण परिणमते यथा वा अचेतनमे-

---

१ अनुमीयतइत्यनुमानं । कृत्यल्युटोबहुलमिति कर्मणि ल्युट् ।

२ महदादिकार्यं सकारणकं । कार्यत्वात् । घटवत् ।

३ युक्तिसमुच्चये च शब्दः ।

वांबुगच्छति॰तद्वत् अचेतनमपि स्वतः जगत्कर्तृकिन्न स्यादिति चेत् न कुतः तत्र अपि[1] पयोंब्वादावपि अंततः ईश्वरादेव प्रवृत्तिः । न स्वतः प्रवृत्तिरित्यर्थः ॥ ३ ॥

**अर्थ**—[ जड असल्यामुळें अचेतन हें कर्ता नाहीं असें जें सांगितलें त्यावर शंका घेऊन सांगतो. ] जसें दुधाचे दहीं होते व पाणी जातें तसें अचेतनापासून जग कां होणार नाहीं असें कोणी ह्मणेल, तर तें बरोबर नाहीं. कारण पाणी व दूध ह्यांच्यामध्येंही आंतून ईश्वराची प्रेरणा असल्यानें कार्यें घडतात, आणि त्यांच्या स्वतापासून घडत नाहींत ॥ ३ ॥

## ॥ ॐ व्यतिरेकानवस्थितेश्चानपेक्षत्वात् ॐ ॥४॥

**टीका**—स्वस्वश्रुतिबलात्पयोंब्वादावेवमयस्कांतादिरन्यस्तु दृष्टांतः स्यादित्यत आह ॥ व्यतिरेकेति ॥ व्यतिरेकानवस्थितेः नऋते त्वत्क्रियत[2] इतिश्रुत्या ईश्वरव्यतिरेकेण कस्यापि कर्मणःअनवस्थितेः अवस्थानाभावश्रवणात् । **अनपेक्षत्वात्** सर्वप्रमाणविरुद्धतया अप्रामाणिकतयाच स्वतःअचेतनकर्त्तृकमतस्य सतामनेपक्षत्वादेतन्मतमग्राह्यमेवेति सूत्रार्थः ॥ ४ ॥

**अर्थ**—[ श्रुतींच्या आधारावरून दूध, पाणी इत्यादि ह्यांच्याविषयीं असें असलें तथापि जडापासून कार्य होतें ह्याविषयीं लोहचुंबक इत्यादि दुसरें उदाहरण देतां येईल असें कोणी ह्मणेल, तर सांगतो. ] ईश्वर नसल्यास कोणतेंहि कर्म होणार नाहीं, असें " नऋत इति " ( ह्मणजे तुझ्याशिवाय कोणीही कार्य करूं शकत नाहीं ) ह्या श्रुतीवरून होतें. सर्व प्रमाणांच्याविरुद्ध व अप्रमाणिक असल्या कारणानें अचेतन हें कर्ता आहे हें मत चांगल्या मनुष्यांनीं घेण्यासारखें नसल्यामुळें तें घेऊं नये ॥ ४ ॥

---

१ अपि शब्दः चेतनप्रवृत्तेरनुकर्षणार्थः ।

२ न ऋते त्वत्क्रियते किंच नार इति श्रुतिः ।

## ॥ ॐअन्यत्राभावाच्चनतृणादिवत् ॐ ॥ ५ ॥

**टीका**—अत्र न ऋत इति श्रुतेर्गुणभूतेशपरत्वसंभवान्न मे प्रागुक्तदोष इति पूर्वाक्षेपेण प्रवृत्तमीशगुणकप्रधानकर्तृमतं निरस्यते ॥ अन्यत्रेति ॥ **च तृणादिवत्** यथा पृथिवीजन्यतृणादिकार्ये पर्जन्यः सहकारिमात्रं तथा प्रकृतिजन्यमहदादिकार्येपीश्वरः अनुग्राहकः न स्वतंत्र इति सेश्वरसांख्यपक्षोपि **न** कुतः । **अन्यत्राभावात्** ईश्वरादन्यत्र तत्प्रेरणांविना जगतोऽभावादीश्वरस्य प्रकृतिसत्तादिप्रदत्वाच्चेत्यर्थः ॥ ५ ॥

**अर्थ**—[ ह्या सूत्रांत " नऋत इति " ( ह्मणजे तुझ्याशिवाय जवळ किंवा दूर कांहीं करितां येत नाहीं ) ह्या श्रुतीवरून परमेश्वर गौण असून जड हें मुख्य असल्यामुळें पूर्वी सांगितलेला दोष मला लागत नाहीं असें सेश्वरसांख्य मतवादी ह्मणेल, अशी शंका घेऊन ईश्वर गौण आहे व जड मुख्य आहे ह्या मताचें खंडन करितो. ] जसा पृथ्वीपासून गवत इत्यादि उत्पन्न होण्यास पाऊस हा नुसता मदत करणारा आहे, तसा जडापासून महदादिक उत्पन्न होण्याला परमेश्वर हा नुसता मदत करणारा आहे आणि स्वतंत्र नाहीं असें जें सेश्वरसांख्य मत आहे तें बरोबर नाहीं. कारण ईश्वराच्या प्रेरणेवांचून जग उत्पन्न होत नाहीं आणि जडाला आस्तित्व इत्यादि देणारा ईश्वर आहे ॥ ५ ॥

## ॥ ॐअभ्युपगमेप्यर्थाभावात्ॐ ॥ ६ ॥

**टीका**—श्रुत्यादेरप्रामाण्यात्धर्माद्यदृष्टवस्त्वनभ्युपगमे किंचिद्बाधकाभावात् अदृष्टवस्तुन एवाभावेन कुतो जगदीश्वरः कुतस्तरां तस्य जगत्कारणत्वमिति पूर्वपक्षे प्राप्ते सिद्धांतयत्सूत्रमुपन्यस्य व्याचष्टे ॥ अभ्युपगम इति ॥ अनभ्युपगमेपि चार्वाकैः स्वशास्त्रस्य सिद्धांतत्वानभ्युपगमे सिद्धमस्मादिष्टं । अभ्युपगमे अपि अर्थाभावात् । सिद्धांतत्वव्यापकयोः

---

१ यच्च किंचिज्जगत्सर्वं दृश्यते श्रूयते ऽपि वेति नारायणोपनिषदि ।

२ पूर्वसूत्रान्नेप्यनुवर्तते ।

अर्थशब्दितविषयप्रयोजनयोः असत्वांगीकारात् स्वव्याघातः स्यादिति न तत्पक्षोपि युक्त इत्यर्थः ॥ ६ ॥

**अर्थ**--[ श्रुति इत्यादिक अप्रमाण असल्या कारणानें धर्मादिक अदृष्ट वस्तु न स्वीकारिल्यास कांहीं हरकत नसल्यामुळें अदृष्ट वस्तूच नाहीं, मग ईश्वर कोठचा असेल व तो जग करणारा कसा होईल ? अशी शंका आली असतां सिद्धांताचें सूत्र सांगतो. ] चार्वाकांनीं आपल्या शास्त्रास सिद्धांत असें मानिलें नाहीं, तर आह्मांला जें पाहिजे तें सिद्ध होतें. जर त्यांनीं आपल्या शास्त्राला सिद्धांत असें मानिलें तर सिद्धांताला अवश्य असणारे विषय व फळ हीं दोन्हींही ते मानीत नसल्यामुळें त्यांचें ह्मणणें त्यांनाच बाधक होतें. ह्मणून त्यांचें ह्मणणें सयुक्तिक नाहीं ॥ ६ ॥

## ॥ ॐ पुरुषाश्मवदिति चेत्तत्रापि ॐ ॥ ७ ॥

**टीका**--अत्र न प्रागुक्तदोषोत्रास्तीति प्राप्तं जीवगुणकप्रधानकर्तृवादं निराचष्टे ॥ पुरुषेति ॥ **पुरुषाश्मवत्** यथा पुरुषसंबधादचेतनं शरीरं अश्मानयनादौ प्रवर्त्तते तथा ऽचेतनप्रकृतिः चेतनसंबंधात्प्रवर्तत **इति चेत्** न । कुतः । यतः **तत्र अपि** शरीरप्रवृत्तावपि चेतनस्य ईश्वरस्यैव कर्तृत्वे न दृष्टांताभावः अत इत्यर्थ ॥ ७ ॥

**अर्थ**--[ ह्या सूत्रांत ज्यास पूर्वीं सांगितलेले दोष लागत नाहींत अशा, जीव गौण असून जड कर्ता आहे ह्या मताचें खंडन करितो. ] जसें अचेतन शरीराशीं जीवाचा संबंध झाला असतां शरीर दगड नेणें इत्यादि कर्मे करितें, तसें अचेतन जडाशीं चेतनाचा संबंध झाला असतां अचेतन जड हें कार्य उत्पन्न करील असें कोणी ह्मणेल तर तें बरोबर नाहीं. कारण, शरीराकडून कर्मे होण्यालाही ईश्वर चैतन्य हाच कर्ता आहे, ह्याविषयीं दृष्टांत नाहीं असें नाहीं ॥ ७ ॥

## ॥ ॐ अंगित्वानुपपत्तेश्च ॐ ॥ ८ ॥

**टीका**—इतश्च साध्यहीन इत्याह ॥ अंगीति ॥ **च अंगित्वानुप-**

**पत्तेः** पुरुषस्यांगत्वेंगीकृते सति अंगमंगीति वाक्ये अंगित्वस्य प्राधान्यस्य उक्त्यनुपपत्तेः न पुरुषोपसर्जनप्रकृतिकर्तृत्वपक्षे दृष्टांतोस्तीत्यर्थः ॥ ८ ॥

**अर्थ**—[ ह्यापुढें जें सिद्ध करावयाचें तें नाहीं असें सांगतो. ] जीव हा अंग आहे असें घेतलें असतां, " अंगमंगीति " ( ह्मणजे ज्यांस अंग आहे तो जसा अंगाला घेऊन कार्य करितो ) ह्या श्लोकांत ज्यास अंग असतें तो मुख्य असें सांगितलें आहे, त्यास अडचण येते, ह्मणून जीव गौण आहे व जड कर्त्ता आहे ह्या मताविषयीं दृष्टांत नाहीं ॥८॥

## ॥ ॐ अन्यथानुमितौ चज्ञशक्तिवियोगात् ॐ ॥ ९ ॥

**टीका**—प्रकृत्युपसर्जनस्य पुरुषस्य कर्तृत्वांगीकारे पूर्वोक्तांगित्वानुपपत्तिदोषाभावात्पुरुषयुक्तप्रधानादेव जगदुत्पत्तिसंभवे किमीश्वरेणेति पूर्वपक्षे प्राप्ते सिद्धांतयत्सूत्रमुपन्यस्य व्याचष्टे ॥ अन्यथेति ॥ **चं अन्यथानुमितौ** पुरुषसंबंधादचेतनमेवशरीरंप्रवर्त्ततइत्युक्तपक्षा दन्यथाशरीरसंबंधात्पुरुषः यथा प्रवर्त्तते तथा प्रकृतिसंबंधादीश्वरः प्रवृत्तत इत्यनुमितौ **ज्ञशक्तिवियोगात्** ज्ञस्यजीवस्य शरीराभावेन शरीरसंबंधार्थं शक्तिवियोगात सामर्थ्याभावादिति सूत्रार्थः ॥ ९ ॥

**अर्थ**—[ जड हें गौण व जीव हा कर्त्ता असें घेतलें असतां पूर्वीं सांगितलेली अंगित्वाची अडचण येत नसल्यामुळें जीव युक्त जडापासूनच जग उत्पन्न होण्यासारखें असतां ईश्वर कशाला पाहिजे अशी शंका आली असतां सिद्धांताचें सूत्र सांगून समाधान करितो. ] आणखी चेतनाच्या संबंधामुळें अचेतन शरीर हें व्यापार करितें असें जें पूर्वीं सांगितलें त्याच्या उलट ह्मणजे शरीराचा संबंध झाल्यामुळें जसा जीव व्यापार करितो तसा जडाचा संबंध झाल्यानें ईश्वर सृष्टि करितो असें अनुमान करणें बरोबर नाहीं. कारण, जीवाला शरीर नसल्यामुळें शरीराशीं संबंध होण्यासाठीं जीवाला सामर्थ्य नाहीं ॥ ९ ॥

---

१ अंगमंगी समादाय यथाकार्यं करोत्यसाविति ।

२ च शब्देन अंगित्वानुपपत्यभावं सूचयति ।

## ॥ ॐ विप्रतिषेधाच्चाऽसमंजसं ॐ ॥ १० ॥

**टीका**—सामान्यदोषेणापि प्राक्तनसर्वपक्षान्निराह ॥ विप्रतिषेधादिति ॥ **च विप्रतिषेधात्** सकलश्रुतिस्मृतियुक्तिविरुद्धत्वादनीश्वरमतं **असमंजसं** अयुक्तमित्यर्थः ॥ १० ॥ ९ ॥

**अर्थ**—[ पूर्वी सांगितलेल्या सर्व अनीश्वर वाद्यांच्या मतांना सामान्य दोष देऊनही त्यांचें निराकरण करितो. ] सर्व श्रुति, स्मृति व युक्ति ह्यांच्या विरुद्ध असल्यामुळें अनीश्वर सांख्यमत अयोग्य आहे ॥ १० ॥ ९ ॥

## ॥ ॐ महद्दीर्घवद्वा ह्रस्वपरिमंडलाभ्यां ॐ ॥ ११ ॥

**टीका**—अत्र प्रागुक्तनिरीश्वरमतोक्तदोषो नात्रास्तीति प्राप्तवैशेषिकमतन्निरस्यते ॥ महदिति ॥ **महद्दीर्घवत्** वैशेषिकमते त्र्यणुकादिगतान्महत्वात् परमाणुभिर्द्व्यणुकादिकार्यजगदारंभो नतु तदात्मना परिणामः । कार्यमात्रं समवाय्यसमवायिनिमित्तरूपकारणत्रितयजन्यं । तत्र कारणगतं परिमाणं कार्यगतपरिमाणस्यासमवायिकारणं । तत्तु त्र्यणुकादिगतमेव न द्व्यणुकपरिमाणुगतं । त्र्यणुकद्व्यणुकगतपरिमाणयोस्तु त्र्यणुकपरमाणुगतसंख्यादिनैव जन्मेति वैशेषिकाणां वादः । दीर्घत्वाच्च चतुरणुकादिगतपरिमाणमुत्पद्यते । तथा **ह्रस्वपरिमंडलाभ्यां** अपि द्व्यणुकपरमाणूभयगतह्रस्वत्वपारिमांडिल्यपरिमाणाभ्यामपि त्र्यणुकद्व्यणुकगतपरिमाणोत्पत्तिः स्यादित्यर्थः । **वा** अन्यथा महत्वदीर्घत्वाभ्यामपि कार्योत्पत्तिर्न स्यात् । तस्माद्वैशेषिकमतमनुपपन्नमिति भावः ॥ ११ ॥

**अर्थ**—[ ईश्वर नाहीं ह्या पूर्वी सांगितलेल्या मताला जे दोष येतात ते वैशेषिक मतास येत नाहींत. ह्या वैशेषिक मताचें ह्या सूत्रांत खंडन करितो. ] वैशेषिक मताप्रमाणें असें आहे कीं त्र्यणुकात जें महत्त्व व दीर्घत्व असतें त्यापासून चतुरणकांत असलेलें परिमाण उत्पन्न होतें, ह्याप्रमाणें व्द्यणुकांत असलेल्या ह्रस्व परिमाणापासूनही त्र्यणुक परिमाण उ-

६६६५

त्पन्न होईल आणि परिमाणूंत असलेल्या पारिमांडिल्य परिमाणापासूनही व्यणुक परिमाण उत्पन्न होईल. नाहींतर महत्त्व व दीर्घत्व ह्यांपासूनही कार्य उत्पन्न होणार नाहीं. ह्मणून वैशेषिक मत अयोग्य आहे ॥ ११ ॥

## ॥ ॐ उभयथापि न कर्मातस्तदभावः ॐ ॥ १२ ॥

**टीका**—असमवायिकारणं निरस्य निमित्तं निरस्यति ॥ उभयथेति ॥ यतः **उभयथा अपि** ईश्वरेच्छाया नित्यत्वानित्यत्वरूपपक्षद्वये ऽपि **न कर्म** परमाणुषु क्रियोत्पत्तिसंभवः । अतः **तदभावः** । तस्मिन् द्व्यणुकादिकार्याभावः स्यादित्यर्थः ॥ १२ ॥

**अर्थ**—[ असमवायिकारणाचें निरसन करून निमित्त कारणाचें निरसन करितो. ] ईश्वराची इच्छा नित्य आहे किंवा अनित्य आहे असे दोन्ही पक्ष घेतले असतांही परमाणूमध्यें क्रिया उत्पन्न होण्याचा संभव नाहीं. ह्मणून ईश्वराच्या इच्छेनें द्व्यणुक इत्यादि कार्यें घडणार नाहींत. ॥ १२ ॥

## ॥ ॐ समवायाभ्युपगमाच्च साम्यादनवस्थितेः ॐ १३

**टीका**—कार्याभाव इति सूचयितुं समवायिकारणं च निराह ॥ समवायेति ॥ **च** वैशेषिकैः अवयवावयव्यादीनां भिन्नत्वनिमित्तेन **समवायाभ्युपगमात्** समवायसंबंधांगीकारात् । **साम्यात्** समवाय्यसमवायिनोरपि भिन्नत्वसाम्यात् तत्रापि समवायाभ्युपगमे **अनवस्थितेः** अनवस्थानात्तन्मतमयुक्तमित्यर्थः ॥ १३ ॥

**अर्थ**—[ वैशेषिक मतानें कार्य होणार नाहीं असें दाखविण्यास्तव समवायि कारणाचें निरसन करितो. ] आणखी अवयव व अवयवी इत्यादि भिन्न असल्या कारणानें वैशेषिक त्या दोहोंमध्यें समवायसंबंध आहे असें मानितात, आणि समवायि व असमवायि ह्या दोहोंमध्यें तसाच भिन्नपणा असल्यामुळें तेथेंही समवाय संबंध आहे असें घेतल्यास अनवस्था दोष येतो. ह्मणून त्यांचें मत बरोबर नाहीं ॥ १३ ॥

---

१ दोषसमुच्चये चः ।

२ आदिपदेन अनित्यगुणक्रिया तद्वतां संग्रहः ।

## ॐ नित्यमेव च भावात् ॐ ॥ १४ ॥

**टीका**—एवं कारणत्रयनिरासेन सृष्टिं निरस्य प्रलयं निराचष्टे ॥ नित्यमिति ॥ **चं भावात्** ईशेच्छापरमाण्वादिकारणानां सदात्वात् वैशेषिकमते **नित्यं एव** सर्वदैव कार्योत्पत्तिः स्यात् । न तु कदाचिदित्यर्थः ॥ १४ ॥

**अर्थ**—[ ह्याप्रमाणें तीन कारणांचें निरसन केल्यानें सृष्टि होत नाहीं असें सिद्ध केलें. आतां प्रळयाचें निरसन करितो. ] आणखी परमेश्वराची इच्छा व परमाणु इत्यादि कारणें नेहमीं असल्यामुळें कार्य केव्हां केव्हां न होतां सदां उत्पन्न होत जाईल ॥ १४ ॥

## ॐ रूपादिमत्त्वाच्च विपर्ययो दर्शनात् ॐ ॥१५॥

**टीका**—इदानीं तु तन्नित्यत्वमेव नेत्याह ॥ रूपादिमत्त्वादिति ॥ **च** किंच वैशेषिकमते पार्थिव आप्यतैजसपरमाणूनां **रूपादिमत्त्वात् विपर्ययः** । नित्यत्वविपरीतानित्यत्वं स्यात् । कुतः । **दर्शनात्** यद्रूपादिमत्तदनित्यमिति व्याप्तेः घटादौ दृष्टत्वादित्यर्थः ॥ १५ ॥

**अर्थ**—[ आतां तर त्यांना ह्मणजे परमाणूंना नित्यपणाच नाहीं असें सांगतो. ] आणखी वैशेषिकांच्या मताप्रमाणें पृथिवी, उदक व तेज ह्यांच्या परमाणूंना रूप इत्यादि असल्या कारणानें ते नित्य नाहींत. कारण, असें आढळतें कीं, ज्यास रूप इत्यादि असतात तें अनित्य असतें अशी व्याप्ति आहे, कारण ह्याप्रमाणें मडकें इत्यादि ह्यांच्या ठिकाणीं पाहाण्यांत येतें ॥ १५ ॥

## ॐ उभयथा च दोषात् ॐ ॥ १६ ॥

**टीका**—अस्तु रूपादिमत्त्वेपि नित्यत्वमस्तु वा नित्यत्वं किं बाधकमित्यत आह ॥ उभयथेति ॥ **च**[1] वैशेषिके **उभयथा** परमाणुनित्यत्वानित्यत्वरूपपक्षद्वये ऽपि **दोषात्** तद्गतसर्वानित्यत्वकारणाभावनिमित्तकतदुत्पत्तिभावस्य दोषसत्वात् न तत्पक्षो युक्त इत्यर्थः ॥ १६ ॥

---

१ दोषसमुच्चयेचः ।

**अर्थ**—[ रूप इत्यादि असल्यानें परमाणु नित्य असले किंवा अनित्य असले, तरी तेणेंकरून काय बाध येतो असें कोणी ह्मणेल तर सांगतो. ] आणखी वैशेषिक मतामध्यें परमाणु नित्य असले किंवा अनित्य असले तरी दोन्हीही बाबतींत दोष आहेत. ते असे कीं परमाणु नित्य असल्यास कार्य नेहमी घडलें पाहिजे आणि परमाणु अनित्य असल्यास ते कारण होत नाहींत, अशा प्रकारें दोन दोष परमाणूंपासून होणाऱ्या उत्पत्तीला येतात. ह्मणून वैशेषिकांचें मत बरोबर नाहीं ॥ १६ ॥

## ॐ अपरिग्रहाच्चात्यंतमनपेक्षा ॐ ॥ १७ ॥

**टीका**—इतश्च तन्मतं निराचष्टे ॥ अपरिग्रहादिति ॥ **अपरिग्रहात्** वैशेषिकमतस्य श्रुत्यादिपरिग्रहशून्यत्वात् तद्विरुद्धत्वाच्च तत्र **अत्यंतं अनपेक्षा** अनादरः कार्य इत्यर्थः ॥ १७ ॥ ६ ॥

**अर्थ**—[ ह्यापुढें आणखी वैशेषिक मताचें खंडन करितो. ] श्रुति इत्यादि हें वैशेषिकाचें मत कबूल करीत नसून त्याच्या विरुद्ध आहेत, ह्मणून तें अगदीं घेऊं नये ॥ १७ ॥ ६ ॥

## ॐ समुदाय उभयहेतुकेपि तदप्राप्तिः ॐ ॥ १८ ॥

**टीका**—एवं हैतुकान्निरस्य पाषंडिषु परमाणुपुंजवादिनोर्वैभाषिकसौत्रांतिकयोर्मतमत्र नये निरस्यते[1] ॥ समुदाय इति ॥ **समुदाये उभयहेतुके अपि** अत्र प्रष्टव्यं । किमयं समुदायः एकपरमाणुहेतुकोऽनेकपरणुहेतुको वेति । तत्र समुदायस्यैकहेतुकत्वं एकपरमाणुहेतुकत्वं तावन्न युज्यते । एकस्मात्सयुदायइत्यस्य मे माता वंध्यावत् व्याहतेः । उभयहेतुकत्वे अनेक परमाणुहेतुकत्वेपि **तदप्राप्तिः** समुदायाप्राप्तिः अनुपपत्तिरिति यावत् । कुतः । अन्योन्याश्रयादिदोषादिति शेषः । परमाणूनां मेलने हि सति समुदायो भवति । समुदाये च सति मिलितत्वमिति । अन्यथा पर-

---

१ बौद्धाश्चतुर्विधाः वैभाषिकाः सौत्रांतिका माध्यमिका योगाचाराश्चेति । तत्र वैभाषिकसौत्रांतिकाभ्यामुभाभ्यामपि परमाणुपुंज एव गोघटादिबुद्धिविषयो न त्ववयवी नाम कश्चिदस्तीत्यंगीकारात् ।

माणूनां मेलनमनंगीकृत्य विरलानेकपरमाणुभ्य एव समुदायजनिरित्यंगीकारे सर्वदा समुदायसत्वं स्यात् । अमिलितपरमाणूनां सर्वदा सत्वात् । ततश्च प्रलयाभ्युपगमविरोध इति भावः ॥ १८ ॥

**अर्थ**—[ ह्याप्रमाणें हेतुवादी ह्मणजे वैशेषिक ह्यांच्या मताचें खंडन करून वैभाषिक व सौत्रांतिक अशा दोन परमाणुपुंज वाद्यांच्या मताचें ह्या सूत्रांत खंडन करितो. ] येथें असा प्रश्न आहे कीं, समुदाय हा एक परमाणूनें झालेला आहे किंवा अनेक परमाणूंनीं झालेला आहे? ह्या दोन प्रश्नांमध्यें समुदाय एक परमाणूनें झाला आहे असें ह्मणणें योग्य नाहीं, कारण माझी आई वांझ आहे असें ह्मणण्याप्रमाणें व्याहति हा दोष येतो. समुदाय एकाहून अधिक ह्मणजे दोन परमाणूंनीं झाला आहे असें ह्मटल्यास समुदाय होत नाहीं. कारण, अन्योन्याश्रय इत्यादि दोष येतो. तो असा कीं, परमाणूं मिळाले असतां समुदाय होतो आणि परमाणूंचा समुदाय झाला असतां ते मिळतात. आतां परमाणूं मिळतात असें न घेतां वेगळे वेगळे असलेल्या परमाणूंचाच समुदाय होतो असें घेतल्यास सर्वदा समुदाय राहील, आणि न मिळतां परमाणूं नेहमीं असतात, ह्या कारणास्तव प्रलय होण्यास विरोध येईल ॥ १८ ॥

## ॐ इतरेतरप्रत्ययत्वादिति चेन्नोत्पत्तिमात्रनिमित्तत्वात् ॐ ॥ १९ ॥

**टीका**—उक्तमाक्षिप्याह ॥ इतरेतरेति ॥ ननु परमाणुपुंजस्य सदासत्वेऽपि नास्मत्पक्षे प्रलयानुपपत्तिः । कुतः तव्द्यवहारादे[1]: **इतरेतरप्रत्ययत्वात्** इदमिदं चेति परमाणुपरस्परापेक्षाबुद्धिनिमित्तकत्वात् । तथा च तादृशबुध्यभावकाले समुदायव्यवहारादेरसत्वात्प्रलयोपपत्तिः **इति चेत् न**। कुतः । **उत्पत्तिमात्रनिमित्तत्वात्** । परमाणूनां स्वसमुदायोत्पत्तिमात्रनिमित्तत्वात् । न तेभ्यो अपेक्षाबुध्यादेरप्युत्पत्तिः संभवतीति । तथा

१ वेद्यते चेत्यपि ग्राह्यं ।

२ न तेभ्यो अपेक्षाबुध्यादेरप्युत्पत्तिः संभवतीति मात्रशब्दार्थः ।

च तन्निमित्तकव्यवहारादिः क्षणिकमते न कदापि संभवतीत्यर्थः ॥ १९ ॥

**अर्थ**—[ जें सांगितलें त्यावर शंका घेऊन सांगतो. ] जर कोणी असें ह्मणेल कीं, परमाणुपुंज नेहमीं असला तथापि आमच्या मतानें प्रलयाला अडचण येत नाहीं. कारण, परमाणूंच्या पुंजाविषयीं व्यवहार करण्याला हा एक परमाणूं हा दुसरा परमाणूं अशा प्रकारें परमाणूंचा परस्परसंबंध मनांत आणावा लागतो. ह्याप्रमाणें जेव्हां मनांत आणित नाहीं तेव्हां परमाणूंच्या समुदायाचा व्यवहार होत नसल्यामुळें प्रलय होतो असें कोणी ह्मणेल तर तें बरोबर नाहीं. कारण, परमाणूं आपला समुदाय उत्पन्न करण्याला मात्र निमित्त कारण होतात, परंतु हा एक व हा दुसरा असा परस्पर संबंध त्यांपासून मनांत येत नाहीं. असें आहे ह्मणून परमाणूंच्या कारणानें होणारा व्यवहार इत्यादि बौद्ध मताप्रमाणें अगदीं संभवत नाहीं.

## ॐ उत्तरोत्पादे च पूर्वनिरोधात् ॐ ॥ २० ॥

**टीका**—अथ विरलपरमाणुभ्यो मिलितपरमाणूनामुत्पत्तिमेव निराकुर्वत्सूत्रमुपन्यस्य व्याचष्टे ॥ उत्तरोत्पाद इति ॥ न क्षणिकमते विरलपरमाणुभ्यो विशेषकार्यस्य मिलितपरमाणुरूपं विसदृशकार्यस्योत्पत्तिश्च युज्यते । कुतः । कारणस्य स्वसदृशकार्यजनन एव सामर्थ्यात् । न च कारणं प्रथमं सदृशकार्यमुत्पाद्य पश्चात्तत्र वै सादृश्यमुत्पादयतीति वाच्यं । च **उत्तरोत्पादे** कार्योत्पत्तावेव **पूर्वनिरोधात्** । कारणस्य विनाशात् । सदृशमेकं कार्यमुत्पाद्य सद्य एव कारणस्य विनष्टत्वादितिभावः ॥ २० ॥

**अर्थ**—[ आतां वेगळे वेगळे असलेल्या परमाणूंपासून एकत्र मिळून असलेल्या परमाणूंची उत्पत्ति होते ह्याचें निराकरण करण्याकरितां सूत्र सांगून विवेचन करितो. ] बौद्धमतानें, वेगवेगळे असलेल्या परमाणूंपासून एकत्र मिळून असलेले असें परमाणूंचें भिन्नकार्य उत्पन्न होतें असें ह्मणणें योग्य नाहीं. कारण, कारण हें आपल्यासारखेंच कार्य

उत्पन्न करूं शकतें. आणखी कारण हें प्रथम आपल्यासारखें कार्य उत्पन्न करून नंतर त्यांत भिन्नपणा उत्पन्न करितें असें ह्मणणें बरोबर नाहीं. कारण कार्य उत्पन्न होतांच कारणाचा अगदीं नाश होतो. तात्पर्य, आपल्यासारखें एक कार्य उत्पन्न केल्यावर लगेंच कारणाचा नाश होतो ॥ २० ॥

## ॐ असति प्रतिज्ञोपरोधो यौगपद्यमन्यथा ॐ ॥२१॥

**टीका**--प्रतिक्षणोत्पत्तिरेव नेत्याह ॥ असतीति ॥ क्षणिकमते न प्रतिक्षणं कार्योत्पत्तिर्युज्यते । कुतः । **असति** कारणे कार्यमुत्पद्यत इत्यंगीकारे **प्रतिज्ञोपरोधः** । तस्य तत्कार्यत्वमिति प्रतिज्ञाय सिद्धांतव्यवहारस्योपरोधो हानिः स्यात् । **अन्यथा** कारणे सति कार्यमुत्पद्यत इत्यंगीकारे **यौगपद्यं** कारणेन सह कार्याणां एकदावस्था प्रसज्जेतेत्यर्थः ॥२१॥

**अर्थ**—[ प्रत्येक क्षणाला उत्पत्तिच होत नाहीं असें सांगतो. ] प्रत्येक क्षणीं उत्पत्ति होते असें जें बौद्धांचें मत तें बरोबर नाहीं. कारण, कारण नसतां कार्य होतें असें घेतलें असतां, अमुक कारणाचें अमुक कार्य असें सांगून व्यवहार करण्यास अडचण पडेल. आणखी कारण असल्यास कार्य उत्पन्न होतें असें घेतल्यास कारणाबरोबर कार्य एकाच वेळीं असतें असें होईल. ॥ २१ ॥

## ॐ प्रतिसंख्याप्रतिसंख्यानिरोधाप्राप्तिरविच्छेदात् ॐ ॥ २२ ॥

**टीका**—एवं क्षणिकवोदकर्योत्पत्तिं निरस्य विनाशं च निरस्यति ॥ प्रतिसंख्येति ॥ एवं क्षणिकमते **प्रतिसंख्या प्रतिसंख्या निरोधाप्राप्तिः** संतानमंतरेण कार्यनाशं विना यः प्रतिक्षरं । कारणनाशः सः प्रतिसंख्यानिरोधः यश्चकार्येण सह कारणस्य नाशः स अप्रतिसंख्यानिरोधाख्यनाशः इत्युभयविधनाशयोरप्राप्तिः अनुपपत्तिः । कुतः । **अविच्छेदात्** कारणे सति कार्यं भवत्येवेति नियमात् । कार्योत्पत्तिसमये कार-

णावस्थाने तत्रापि कारणे सत्यैवमिति कार्यपरंपरायाः विच्छेदाभावादिति सूत्रार्थः ॥ २२ ॥

**अर्थ**—[ ह्याप्रमाणें बौद्धमतांतील कार्य उत्पत्ति ह्यांचें निरसन करून नाशाचें निरसन करितो. ] अशा रीतीनें बौद्ध मतांत, कार्याचा नाश झाल्याशिवाय प्रत्येक क्षणीं जो होणारा कारणाचा नाश त्यास प्रतिसंख्यानिरोध ह्मणणात, आणि कार्याबरोबर होणारा जो कारणाचा नाश त्यास अप्रतिसंख्या निरोध नांवाचा नाश असें ह्मणतात. ह्या दोन्ही प्रकारच्या नाशांना अडचण येते. कारण नियम असा आहे की कारण असल्यास कार्य होतें. तात्पर्य, कार्य उत्पन्न होण्याचे वेळेस कारण असल्यामुळें तेथेंही कारण असल्यास कार्य होतें. ह्या नियमाप्रमाणें एका मागून एक अशी कार्यांची परंपरा चालण्यास अडचण येत नाहीं ॥ २२ ॥

## ॐ उभयथा च दोषात् ॐ ॥ २३ ॥

**टीका**—अर्थक्रियाकारित्वरूपसत्वान्यथानुपपत्या क्षणिकत्वं भावानामुपेयमित्यत आह ॥ उभयथेति ॥ **उभयथा** कारणे सति कार्यं भवत्येवेति नियमपक्षे तदभावपक्षे च **दोषात्** दोषसत्वात् कार्यकारणविशेषकार्यानुत्पत्याख्यदोषात् नान्यतरपक्षावलंबेनार्थापत्या क्षणिकपक्षो युक्त इत्यर्थः ॥ २३ ॥

**अर्थ**—[ पदार्थाकडून व्हावयाची क्रिया घडल्यानें त्याचें जें अस्तित्वाचें ज्ञान होतें तें तशी क्रिया न घडल्या कारणानें होत नसल्यामुळें पदार्थ क्षणिक आहेत असें बौद्ध ह्मणेल तर सांगतो. ] कारण असल्यास कार्य होतेंच असा जो नियम आहे त्यापक्षीं कार्य कारणांचा विशेष संबंध नाहींसा ह्मणजे ज्या वेळीं कारण असतें त्याच वेळीं कार्य असतें असा दोष येतो, आणि कारण नसतां कार्य होतें असें मानलें असतां कार्य उत्पन्न होत नाहीं हा दोष येतो. ह्या दोहोंपैकीं कोणताही

एक पक्ष घेतला असतां अर्थापत्तीच्या प्रमाणानें बौद्धांचें मत बरोबर नाहीं ॥ २३ ॥

## ॐ आकाशेचाविशेषात् ॐ ॥ २४ ॥

**टीका**—ननु माभूदर्थापत्या क्षणिकत्वासिद्धिः । यत्सत्तत्क्षणिकं यथा दीपादि । संतश्चामी भावा इत्यनुमानेन सेत्स्यति दीपादिकां च प्रतिक्षणं परिमाणविशेषदर्शनाद्भिन्नमेवेति तत्क्षणिकमेवेत्याशंकां परिहरत्सूत्रमुपन्यस्य व्याचष्टे ॥ **चं**[1] यदि दीपादिषु पूर्वोत्तरक्षणयोः ज्वालावैलक्षण्यदर्शनेन तद्दृष्टांतेन यत् सत् तत्क्षणिकं यथादीपादिरिति सर्व पदार्थानां क्षणिकत्वमनुमीयते तर्हि **आकाशे** दीपादिज्वालावत् **अविशेषात्** विशेषादर्शनात् आकाशदृष्टांतेन सर्व पदार्थानामक्षणिकत्वमेव अनुमीयतामितिसूत्रार्थः॥२४॥

**अर्थ**—[ जर बौद्ध असें ह्मणेल कीं, जरी अर्थापत्ति प्रमाणानें जग क्षणिक असें सिद्ध होत नाहीं, तरी जें सत् तें क्षणिक आहे, जसा दिवा इत्यादि, जे जे भाव पदार्थ आहेत ते ते सत् आहेत. अशा प्रकारें अनुमान केल्यानें सिद्ध होईल. दिवा इत्यादि ह्यांचें परिमाण प्रत्येक क्षणीं निरनिराळें होत असल्यामुळें भिन्न असून ते क्षणिकच आहेत. ही शंका निवारण करण्यास्तव सूत्र सांगून विवेचन करितो.] आणखी जर दिवा इत्यादिकांविषयीं पहिल्या क्षणाच्या व पुढच्या क्षणाच्या ज्योतीमध्यें भिन्नपणा दिसल्यामुळें त्या दृष्टांतावरून, जें सत् आहे तें क्षणिक आहे, जसा दिवा इत्यादि, ह्या प्रमाणें सर्व पदार्थ क्षणिक आहेत असें अनुमान होतें, तर आकाशांत दिव्याच्या ज्योतीप्रमाणें विशेष कांहीं दिसत नसल्यामुळें आकाशाच्या दृष्टांतावरून सर्व पदार्थ क्षणिक नाहींत असेंच अनुमान करावें ॥ २४ ॥

## ॥ ॐ अनुस्मृतेश्च ॐ ॥ २५ ॥

**टीका**—बाधितत्वेनाप्यनुमानं निराह ॥ अनुस्मृतेरिति ॥ **च अनुस्मृ-**

---

१ च शब्दः दृष्टांतसाम्यसूचकः ।

**तेः** ॥ तदेवेदमिति प्रत्यभिज्ञानाच्च तद्विरोधात् न सत्वहेतुना क्षणिकत्व-साधनं युक्तमित्यर्थः ॥ २५ ॥ ७ ॥

**अर्थ**—[बाधित दोषानेंही अनुमानाचें निराकरण करितो.] आणखी तेंच हें आहे अशा रीतीनें पूर्वींच्या ज्ञानाची स्मृति होत असतां त्याच्या विरुद्ध सत् हें कारण घेऊन क्षणिकपणा सिद्ध करणें बरोबर नाहीं ॥ २५ ॥ ७ ॥

## ॥ ॐ नासतो दृष्टत्वात् ॐ ॥ २६ ॥

**टीका**—अत्र नये परमाणुपुंजवादोक्तो दोषो नेति प्राप्तं शून्यमतं निरस्यते ॥ नेति ॥ **असतः** शून्यस्य न जगत्कर्तृत्वं युक्तं । कुतः । प्रमाणाभावात् । तत्कुतः । **अदृष्टत्वात्** क्वाप्यसतः कारणत्वादर्शनात् । अतएवानुमानागमयोरप्यभावादित्यर्थः ॥ २६ ॥

**अर्थ**—[ परमाणूंपुंजाच्या मतास दिलेले दोष ज्यास लागत नाहींत असें शून्यवादी मत ह्या सूत्रांत खंडन करितो. ] शून्य हें जग उत्पन्न करण्यास कारण होत नाहीं, कारण त्यास प्रमाण नाहीं. त्याचें कारण, कोठेंही शून्य हें कशांचें कारण झाल्याचें आढळत नाहीं. ह्मणून त्याविषयीं अनुमानाचें किंवा श्रुतीचें प्रमाण नाहीं ॥ २६ ॥

## ॐ उदासीनानामपि चैवं सिद्धिः ॐ ॥ २७ ॥

**टीका**—अदृष्टमप्यसतो जगत्कारणमस्त्वित्यत आह ॥ उदासीनानामिति ॥ **च एवं** सत्यसतः कार्योत्पादकत्वे अंगीकृते सति **उदासीनानां** हेयोपादेयत्वबुध्यविषयाणां गगनकुसुमादीनां सकाशात् **अपि सिद्धिः** सौरभ्यादिकार्यसिद्धिः स्यादित्यर्थः । अन्यथा शून्यादपि कार्योत्पत्तिर्न स्यात् ॥ २७ ॥

**अर्थ**—[ जरी तसें आढळत नसलें तरी शून्य हें जगाचें कारण होईना असें शून्यवादी ह्मणेल तर सांगतो. ] आणखी शून्यापासून कार्य उत्पन्न होतें असें घेतलें असतां, ज्याविषयीं घेण्याची किंवा टाकण्याची बुद्धि होत नाहीं अशा आकाशपुष्प इत्यादिकांपासूनही सुगंध

इत्यादि कार्य होईल. तसें नसेल तर शून्यापासूनही कार्य उत्पन्न होणार नाहीं ॥ २७ ॥

## ॐ नाभाव उपलब्धेः ॐ ॥ २८ ॥

**टीका**--मास्तु शून्यपरिणामप्रपंचस्तत्संवृत्तितस्तु स्यात्तथोक्ते दोषाभावादत आह ॥ नेति ॥ जगत् **अभावः** असत् **न** । कुतः । **उपलब्धेः** सदिति प्रतीयमानत्वादित्यर्थः ॥ २८ ॥

**अर्थ**—[ प्रपंच हा शून्याचा परिणाम नसला तरी शून्याला आच्छादन होऊन झाला आहे असें ह्मणण्यास दोष येत नाहीं असें शून्यवादी ह्मणेल तर सांगतो. ] जग हें शून्य नाहीं. कारण, तें आहे असें अनुभवास येतें ॥ २८ ॥

## ॐ वैधर्म्याच्च न स्वप्नादिवत् ॐ ॥ २९ ॥

**टीका**—ननु सदित्युपलंभेपि स्वप्नादिवदसज्जगत्किन्न स्यादत आह ॥ वैधर्म्यादिति ॥ **स्वप्नादिवत्** सत्वेन प्रतीयमानमपि जगत् स्वप्नादिवदसत् **न** । कुतः । **वैधर्म्यात्** स्वाप्नजाग्रत्वस्य बाध्यत्वाख्यविलक्षणधर्मवत्वात् जगति **च** तदभावादित्यर्थः ॥ २९ ॥ ॥ ८ ॥

**अर्थ**—[ जर कोणी असें ह्मणेल कीं, जग आहे असा अनुभव येत असला तथापि स्वप्न इत्यादीप्रमाणें जग खोटें आहे असें कां होणार नाहीं, तर सांगतो. ] आहे असें अनुभवास येणारें जग हें स्वप्नाप्रमाणें खोटें नाहीं. कारण, स्वप्न व जाग्रति ह्यांस जसा बाध येण्याचा विलक्षण धर्म आहे तो धर्म जगामध्यें नाहीं ॥ २९ ॥ ८ ॥

## ॥ ॐ नभावोऽनुपलब्धेः ॐ ॥ ३० ॥

**टीका**—अत्र नये नासतो दृष्टत्वादित्युक्तदोषो नात्रेति प्राप्तं विज्ञानमतं निराह ॥ नेति ॥ जगत् **भावः** ज्ञानात्मकमपि **न अनुपलब्धेः** ज्ञानज्ञेययोरभेदाननुभवादित्यर्थः ॥ ३० ॥

**अर्थ**—[" नासतो दृष्टत्वात्" ह्यांत शून्यवाद्याला जो दोष दिला आहे तो जेथें येत नाहीं असें विज्ञानमताचें ह्या सूत्रांत खंडन करितो.] जग हें ज्ञानरूपही नाहीं. कारण, ज्ञान व जें जाणायाचें तें हीं दोन्हीं एक असल्याचा अनुभव येत नाहीं ॥ ३० ॥

## ॥ ॐ क्षणिकत्वाच्च ॐ ॥ ३१ ॥

**टीका**—इतश्चैवमित्याह ॥ क्षणिकत्वादिति ॥ **च क्षणिकत्वात्** ज्ञानस्यैकक्षणावस्थायित्वाज्जगतः स्थायित्वात्तद्विरोधान्न तयोरैक्यमित्यर्थः ॥ ३१ ॥

**अर्थ**—[ह्या पुढें असेंच आहे असें सांगतो.] आणखी ज्ञान एक क्षण राहाणारें आहे व जग नेहमीं राहाणारें आहे, ह्मणून दोहोंत विरोध येत असल्यामुळें ते दोन्ही एक नाहींत ॥ ३१ ॥

## ॐ सर्वथानुपपत्तेश्च ॐ ॥ ३२ ॥

**टीका**—एवं पृथङ्निरस्तानि बौद्धमतानि सामान्यदोषेण निराह ॥ **च सर्वथा** सर्वप्रकारेण **अनुपपत्तेः** बौद्धराद्धांतस्य युक्तिशून्यत्वात् तद्विरुद्धत्वाच्च न ग्राह्यत्वमित्यर्थः ॥ ३२ ॥ ९ ॥

**अर्थ**—[ ह्याप्रमाणें बौद्धमताचें निरानिराळें खंडन करून साधारण दोष देऊन त्या सर्वांचें निराकरण करितो. ] आणखी सर्व प्रकारें बौद्धांचें मत अनुमानरहित व अनुमानाशीं विरुद्ध असल्यामुळें तें घेण्यास योग्य नाहीं ॥ ३२ ॥ ९ ॥

## ॐ नैकस्मिन्नसंभवात् ॥ ॐ ॥ ३३ ॥

**टीका**—अत्र सर्वप्रकारोपगमान्नैकपक्षोक्तदोषोऽत्रेति प्राप्तं क्षणिकमतं निराक्रियते ॥ नेति ॥ जैनोक्तसप्तप्रकारः **एकस्मिन्** वस्तुनि **न** युक्ताः । कुतः । **असंभवात्** अप्रामाणिकत्वेन तेषांमेकत्रासंभावितत्वादित्यर्थः । सप्तप्रकारास्तु सत्वं असत्वं सदसत्वं सद्विलक्षणत्वं सत्वे सति-

१ ह्याच पादाचें सूत्र २६ पाहावें.

सद्विलक्षणत्वं असत्वेसति असद्विलक्षणत्वं सदसत्वे सति सदसद्विलक्षणत्व मित्येवंरूपाः ज्ञातव्याः ॥ ३३ ॥

**अर्थ**--[ बौद्धमताचे सर्व प्रकार घेतल्यामुळें एका पक्षाविषयीं सांगितलेले दोष ज्यास लागत नाहींत अशा क्षणिक मताचें ह्या सूत्रांत निराकरण करितो. ] जैनांनीं सांगितलेले सात प्रकार एका वस्तूंत योग्य नाहींत. कारण प्रमाण नसल्यामुळें ते एका ठिकाणीं असण्याचें संभवत नाहीं. ते सात प्रकार असे--१ सत आहे २ असत आहे, ३ सत असून असत आहे, ४ सताहून विलक्षण आहे, ५ सत असून सताहून विलक्षण आहे, ६ असत असून असताहून विलक्षण आहे, ७ सत् व असत् असून सत् व असत् ह्याहूल विलक्षण आहे ॥ ३३ ॥

## ॐ एवं चात्माऽकार्त्स्न्यं ॐ ॥ ३४ ॥

**टीका**---यदपि जीवस्य शरीरपरिमितत्वमंगीक्रियते तत्प्रतिक्षेप्तुं सूत्रमुपन्यस्य व्याचष्टे ॥ एवमिति ॥ **एवं च** आत्मनः कायपरिमाणेंऽगीकृते सति **आत्मा अकार्त्स्न्यं** आत्मनः प्राक् पिपीलिकादेहं प्राप्तस्य तत्कायपरिमितस्य जीवस्याऽकार्त्स्न्यं गजगर्दभादिशरीरप्राप्तावपूर्णता स्यादित्यर्थः । एवं गजशरीरं प्राप्तस्यात्मनः पिपीलिकादेहप्राप्तावकार्त्स्न्यमाधिक्यं च स्यादित्यपि द्रष्टव्यं ॥ ३४ ॥

**अर्थ**---[ शरीरा येवढा जीव आहे असें जे मानतात त्याचें खंडन करण्याकरितां सूत्र सांगून विवेचन करितो. ] जीव हा शरीरा येवढा आहे असें मानिलें असतां, पूर्वीं मुंगीचा देह प्राप्त झाल्यावर त्या देहायेवढा असलेला जीव, हत्ति गाढव इत्यादिकांच्या शरीरांमध्यें पूर्णपणें राहणार नाहीं. तसाच हत्तीच्या शरीरांत असलेल्या जीवाला मुंगीचा देह प्राप्त झाला असतां त्या देहांत तो मावणार नाहीं, असेंही जाणावें ॥ ३४ ॥

## ॐ न च पर्यायादप्यविरोधो विकारादिभ्यः ॐ ३५

**टीका**—यदा यद्देहमाप्नोति तदा तद्देहपरिमाणइत्यत आह ॥ न चेति ॥ **पर्यायात्** क्रमात् क्रमेण तत्तद्देहपरिमाणत्वांगीकारात् । **अपि अविरोधः** नोक्तदोष इति **च न** युज्यते । कुतः । यतः पर्यायो न युज्यते । तदपि कुतः । **विकारादिभ्यः** तथा सति तत्तत्कालीनपरिमाणभेदेन वस्तुभेदात् आत्मनो विकारित्वापत्तेः ततश्चानित्यत्वान्निर्मोक्षत्वादिदोषप्रसंगादित्यर्थः ॥ ३५ ॥

**अर्थ**—[ ज्या वेळीं ज्या देहांत जातो त्यावेळीं त्या देहायेवढा होतो असें कोणी ह्मणेल तर सांगतो. ] ज्या ज्या देहांत जीव जातो त्या त्या देहांत तो क्रमानें त्या त्या परिमाणाचा होतो, असें मानिलें असतांही पूर्वीं सांगितलेला दोष येत नाहीं, असें ह्मणणें बरोबर नाहीं. कारण, तसाच क्रम मानणें योग्य नाहीं. कारण तसा क्रम आहे असें घेतलें असतां निरनिराळ्या वेळीं निरनिराळे परिणाम झाल्यास वस्तु निरनिराळी झाल्या कारणानें जीव विकारी आहे असें होईल. मग तो अनित्य होऊन त्यास मोक्ष नाहीं असा दोष येऊं लागेल ॥ ३५ ॥

## ॐ अंत्यावस्थितेश्चोभयनित्यत्वादविशेषात् ॐ ३६

**टीका**—ननु जीवस्य शरीरावच्छेदमंतरेण स्वतः परिमाणाभावाच्छरीरपरिमाणत्वमंगीक्रियते अतो नोक्तदोष इत्याशंकां प्रतिक्षिपत्सूत्रं पठित्वा व्याचष्टे ॥ **अंत्यावस्थितेः** मोक्षे जीवस्यस्वतः परिमाणाभावेन निःस्वरूपत्वापत्या जीवपरिमाणसिध्यर्थं शरीरांगीकारे अंत्ये मोक्षे शरीरस्य अवस्थितेः **उभयनित्यत्वात्** शरीरमात्मा चेत्युभयोर्नित्यत्वात् **अविशेषात्** शरीरत्वाविशेषात्सर्वशरीरनित्यत्वं स्यादिति सूत्रार्थः ॥ ३६ ॥

**अर्थ**—[जर कोणी असें ह्मणेल कीं शरीर असल्याशिवाय जीवाला स्वताचें परिमाण नसून शरीराचे परिमाणानेंच त्याचें परिमाण आहे असें घेतलें आहे, ह्मणून पूर्वी सांगितलेला दोष येत नाहीं, ही शंका दूर करण्यास्तव सूत्र सांगून विवेचन करितो. ] मुक्तिकालीं जीवाला स्वतः परिमाण नसल्यामुळें त्याला स्वरूपच नाहीं असें होईल, ह्या कारणास्तव

जीवाला परिमाण असण्यास्तव त्याला शरीर आहे असें मानिलें असतां त्याला मुक्तिकाळीं शरीर असल्यामुळें शरीर व आत्मा हे दोघे नित्य होतात, आणि मुक्तिकाळच्या शरीरांत ज्यास्त कांहीं नसल्यामुळें सर्व शरीर नित्य होईल ॥ ३६ ॥

## ॐपत्युरसामंजस्यात्ॐ ॥ ३७ ॥

**टीका**—[ अत्र नये नैकस्मिन्नुक्तदोषोत्र नेति प्राप्तं सौरा[1]दिमतोपलक्षणत्वेन शैवमतं निरस्यते ॥ पत्युरिति ॥ **पत्युः** पशुपतेः जगत्कारणत्वं न युक्तं । कुतः । **असामंजस्यात्** पारतंत्र्योत्पत्यादिदोषवत्वादित्यर्थः ॥ ३७ ॥

**अर्थ**—[ " नैकस्मिन्[2] " ह्या सूत्रांत सांगितलेला दोष ज्यास लागत नाहीं अशा सौरादिमतांचें उपलक्षण शैवमताचें निरसन करितो. ] शिव हा जगाचें कारण आहे असें ह्मणणें बरोबर नाहीं. कारण, त्यास परतंत्रपणा, उत्पत्ति, इत्यादि दोष आहेत ॥ ३७ ॥

## ॐसंबंधानुपपत्तेश्चॐ ॥ ३८ ॥

**टीका**—[ इतश्च न युक्तमित्याह ॥ संबंधेति च शिवस्याशरीरत्वेन जगता **संबंधानुपपत्तेः** न तस्य कर्तृत्वमित्यर्थः ॥ ३८ ॥

**अर्थ**—[ आणखी ह्या पुढें तें सयुक्त नाहीं असें सांगतो. ] आणखी कारण शिवाला शरीर नसल्यामुळें जगाशीं त्याचा संबंध होऊं शकत नाहीं. ह्मणून तो कर्ता नाहीं ॥ ३८ ॥

## ॐअधिष्ठानानुपपत्तेश्चॐ ॥ ३९ ॥

**टीका**—इतश्चैवमित्याह ॥ अधिष्ठानानुपपत्तेरिति ॥ **च अधिष्ठानानुपपत्तेः** प्रलये सर्वेषां नंष्टत्वात्पुनः सृष्टिकाले पशुपतेः पृथिव्याद्याश्रयानुपपत्तेश्च न तस्य जगत्कर्तृत्वमित्यर्थः ॥ ३९ ॥

---

१ ते च सौरस्कांदपाशुपतगाणपत्यशाक्तेयाः ।

२ ह्या पादांतील सू० ३३ पाहावें.

**अर्थ**—[ आणखी ह्या पुढें असें आहे असें सांगतो. ] आणखी प्रळयकाळीं सर्वांचा नाश होत असल्यामुळें पुनः सृष्टि उत्पन्न करण्याचे वेळीं शिवाला पृथिवी इत्यादिकांचा आश्रय नसल्यामुळें त्याला कर्तृत्व नाहीं ॥ ३९ ॥

## ॐकरणवच्चेन्न भोगादिभ्यः ॐ ॥ ४० ॥

**टीका**—योगद्वयोक्तमाक्षिप्याह ॥ करणवदिति ॥ ननु यतः साधनजातं पशुपतेः **करणवत्** शरीरवत् शरीरेण तुल्यं अधिष्ठानतुल्यं च अतो नोक्तदोष इति **चेत् न** । कुतः । **भोगादिभ्यः** शरीरकृतसुखदुःखभोगोत्पत्तिमरणादिदोषेभ्य इत्यर्थः ॥ ४० ॥

**अर्थ**—[ मागील दोन सूत्रांत जें सांगितलें त्यावर शंका घेऊन सांगतो. ] जर कोणी असें ह्मणेल कीं, शरीराप्रमाणें व अधिष्ठानाप्रमाणें शिवाला साधनें आहेत ह्मणून पूर्वी सांगितलेला दोष येत नाहीं, तर असें ह्मणणें बरोबर नाहीं. कारण, शरीरापासून होणारें सुख दुःख भोगणें, जन्मणें, मरणें इत्यादि दोष त्याला येतील ॥ ४० ॥

## ॐअंतवत्त्वमसर्वज्ञता वा ॐ ॥ ४१ ॥

**टीका**—करणवच्चेदित्युक्तदेहवत्वपक्षं संबंधेत्युक्ततदभावपक्षं च दोषांतरेण निरस्यति ॥ अंतवत्त्वमिति ॥ यतः शिवस्य देहित्वतदभावपक्षयोः क्रमेण**अंतवत्त्वं**नाशवत्त्वं**वा** अथवा **असर्वज्ञता** न सर्वज्ञत्वं स्यात् अतो न तद्युक्तमित्यर्थः ॥ ४१ ॥ ११ ॥

**अर्थ**—[ "करणवच्चेत्[1]" ह्यांत सांगितल्याप्रमाणें शिवाला देह आहे हा पक्ष, आणि "संबंधानुपपत्तेः[2]" ह्यांत सांगितल्याप्रमाणें त्याला देह नाहीं हा पक्ष, ह्या दोहोंस दुसरा दोष सांगून त्यांचें खंडन

---

१ ह्या पादांतील सूत्र ४० पाहावें.

२ ह्या पदांतील सूत्र ३८ पाहावें.

करितो. ] शिवाला देह असल्यास त्याचा नाश होईल आणि देह नसल्यास तो सर्वज्ञ होणार नाहीं. ह्मणून शिव हा जगाचा कर्त्ता नाहीं ॥४१॥

### ॐउत्पत्त्यसंभवात्ॐ ॥ ४२ ॥

**टीका**—अत्र पूर्वन्यायेन निरस्तमपि शक्तिमतं विशेषदोषविवक्षया पुनर्निरस्यते ॥ उत्पत्त्यसंभवादिति ॥ न शक्तिर्जगत्कारणं । कुत : । **उत्पत्त्यसंभवात्** शक्तिशब्दितकेवलस्त्रीभ्यःअपत्योत्पत्त्योगादित्यर्थः॥४२।

**अर्थ**—[ मागें ३७ व्या सूत्रांत खंडन केलें आहे तथापि शक्तिमताला विशेष दोष देण्याच्या इच्छेनें त्याचें पुनः खंडन करितो. ] शक्ति ही जगाचें कारण नाहीं. कारण शक्ति ह्या शब्दानें नुसत्या स्त्रीचा बोध होतो, आणि नुसत्या स्त्रीपासून पोर होत नाहीं ॥ ४२ ॥

### ॐन च कर्तुः करणं ॐ ॥ ४३ ॥

**टीका**—शिवानुगृहीता शक्तिः कारणमिति मध्यमवाममतं निराह ॥ नेति ॥ च यतः **कर्तुः** शक्त्यनुग्राहकशिवस्यच **करणं** ज्ञानादिसाधनं **न** अतो ऽनुपपत्तिरुपपत्तेः ॥ ४३ ॥

**अर्थ**—[ शिवानें जिच्यावर कृपा केली आहे अशी शक्ति जगाचें कारण आहे असें जें मध्यम वाममत त्याचें निराकरण करितो. ] आणखी शक्तीवर कृपा करणाऱ्या शिवाला ज्ञान इत्यादि साधनें नाहींत. ह्मणून उत्पत्ति होणार नाहीं ॥ ४३ ॥

### ॐविज्ञानादिभावे वा तदप्रतिषेधः ॐ ॥४४॥

**टीका**—ज्ञानदेहादिकरणवाननुग्राहकः शिव इति अणुवाममतं निराह ॥ विज्ञानादिभाव इति ॥ **विज्ञानादिभावे** शक्त्यनुग्राहकेश्वरस्य विज्ञानादिसाधनभावे **तदप्रतिषेधः** विज्ञानादिकरणवता शक्त्यनुग्राहकेणैव जगदुदयसंभवेन शक्तिवैय्यर्थ्यात् । शक्तिपरित्यागेन तस्यैव कर्त्तृत्वे च प्रकृतपाशुपतमतस्य अप्रतिषेधःतत्पक्षांगीकार एवेति सूत्रार्थः ॥४४॥

**अर्थ**—[ शिवाला ज्ञानदेह इत्यादि साधनें असून तो कृपा करणा-

रा आहे असें जें अणुवाममत त्याचें खंडन करितो. ] शक्तीवर कृपा करणाऱ्या शिवाला विज्ञान इत्यादि साधनें असून शक्तीवर कृपा करून जगत् उत्पन्न करण्याचा संभव असल्यामुळें शक्ति ही व्यर्थ आहे. आणखी शक्तीला सोडून शिवच कर्त्ता आहे असें मानलें, तर येथें पाशुपत मताचें खंडन करायाचें नाहीं. त्याच्या मताचा पूर्वी विचार केला आहे ॥ ४४ ॥

ॐ विप्रतिषेधाच्च ॐ ॥ ४५ ॥

**टीका**—एवं शाक्तेयमतत्रयं पृथङ्निरस्य सामान्येनापि निराह ॥ विप्रतिषेधादिति ॥ **च विप्रतिषेधात्** सकलश्रुतिस्मृतिविरुद्धत्वाच्च शाक्तेयमतमसंमजसं अयुक्तमित्यर्थः ॥४५॥१२॥ इति द्वितीयःपादः ॥२॥

**अर्थ**—[ ह्याप्रमाणें शक्तिमताच्या तीन प्रकारांचें, पृथक् पृथक् खंडन करून त्यांचें सामान्य रीतीनें ही खंडन करितो. ] आणि सर्व श्रुति व स्मृति ह्यांच्या विरुद्ध असल्यामुळें शाक्तमत अयुक्तिक आहे ॥ ४५ ॥ १२ ॥ ह्याप्रमाणें दुसरा पाद संपला ॥ २ ॥

## द्वितीयाध्यायतृतीयपादप्रतिपाद्यविषयः ।

आकाशस्योत्पत्तिमत्वसाधनम् तथानादित्वश्रुतेर्गौणत्वं (सू.१–४)। ब्रह्मशब्दवदाकाशस्योभयविधत्वं तथा विकारित्वात्सादित्वमपि ( सू. ५–७ )। पूर्वोक्तप्रकारेण वायोरपि ज्ञातव्यम् (सू. ८)। परमात्मनउत्पत्तेरसंभवोऽनुपपत्तेः ( सू. ९ )। तेजोपि जायत इत्याह ( सू. १० )। आप उत्पद्यंत इत्याह ( सू. ११ )। पृथिवी जायतेऽधिकाररूपशब्दांतरादिभ्यः ( सू. १२ )। परमात्मैव संहारकर्ता यतः सोऽनादिमायायाः अपि संहर्तेति ( सू. १३ )। उत्पत्तिक्रमात् लयक्रमः वैपरीत्येन भवति ( सू. १४ )। विज्ञानमनसी विना व्युत्क्रमेण लयो भवति कुतस्तल्लिंगादिति चेन्नाविशेषात् ( सू. १५–१६ )।

परमात्मनः लयो न भवति तथाऽश्रुतेर्किंच श्रुतिभ्यो नित्यत्वं विद्यते ( सू. १७ )। जीवः परमात्मनः सकाशाज्जायते तथा मुक्तिश्चास्ति ( सू. १८–१९ )। जीवस्याणुत्वसाधनं तस्य व्यापकत्वनिषेधश्च ( सू. २०–२७ )। जीवः ब्रह्मणः सकाशात् भिन्नोऽस्ति तथापि तत्सादृश्यात् तच्छब्देन व्यपदिश्यते ( सू. २८–२९ )। जीवो यावदात्मभावी विद्यते तस्मात् दोषो नास्ति तथैव दृश्यते ( सू. ३० )। पुंस्त्वादिवत्त्वस्य यथाकाले ऽभिव्यक्तिस्तथाजीवे विद्यमानस्यैवानंदादेर्मुक्तावभिव्यक्तिः तथा न गृहीतं चेत् नित्योपलब्ध्यादीनां प्रसंगः स्यात् ( सू. ३१–३२ )। जीवस्य स्वतंत्रत्वेन कर्तृत्वशक्तिर्नास्ति किंतु परमात्मानमनुसृत्यैव तदधीनैवास्ति तथैव श्रुतिप्रामाण्यं विद्यते तथैव जीवशक्तेरीशाधीनत्वे अपि तस्यापेक्षितकृतिमत्त्वमस्त्येव ( सू. ३३–४१ )। जीवःपरमात्मनः विभिन्नांशो ऽस्ति मत्स्याद्यवतारास्तु स्वांशा एव ज्योतिरादिवत् जीवस्य देहसंबंधहेतुना तस्य बंधपरिहारौ परमात्मानुज्ञाधीनौ न तथा मत्स्यादीनां यतः जीवः परमात्मनः प्रतिबिंबोऽस्ति न तथा मत्स्यादिः ( सू. ४२–५० )। विद्याकर्मसंस्काराणां वैचित्र्यात् प्रतिबिंबभूतजीवानामपि देवदानवमानवादिवैचित्र्यं। कामक्रोधादिदोषेष्वपि अदृष्टादिवैचित्र्यादिना वैचित्र्यं। प्रदेशादिवैचित्र्यस्यापि तदंतर्भावात् ( सू. ५१–५३ )॥ ३ ॥

## दुसऱ्या अध्यायाच्या तिसऱ्या पादांतील विषय.

आकाश उत्पन्न झालें हें सिद्ध केलें तसें तें अनादि आहे असें ह्मणणें गौण आहे ( सू. १–४ ). ब्रह्मशब्दाप्रमाणें आकाश दोन प्रकारचें आहे. विकारी असल्यामुळें तें सादि ( उत्पत्तिमान ) आहे ( सू. ५७ ). पूर्वी सांगितल्याप्रमाणें वायूसही समजावें ( सू. ८ ). परमात्याची उत्पत्ति होत नाहीं, कारण तसें ह्मणण्यास श्रुतीची अडचण येते ( सू. ९ ). तेजही परमात्म्यापासून उत्पन्न होतें ( सू. १० ). पाणीही उत्पन्न होतें ( सू. ११ ). पृथ्वी उत्पन्न होते, कारण अधिकार, रूप आणि शब्द प्रमाण आहे ( सू. १२ ). परमात्माच संहार कर्ता आहे, कारण तो अनादि मायेचाही संहार करणारा आहे ( सू. १३ ). उत्पत्तीच्या क्रमाहून लयाचा क्रम उलट आहे ( सू. १४ ). विज्ञान व मन ह्यांशिवाय दुसऱ्यांचा लयाचा क्रम उलट आहे, कारण त्यास प्रमाण आहे अशी शंका करूं नये; कारण त्यास विशेष प्रमाण नाहीं ( सू. १५–१६ ). परमात्म्याचा लय होत नाहीं, कारण तशी श्रुति नाहीं, आणि उलट श्रुतीवरून नित्य आहे असें सिद्ध होतें ( सू. १७ ). जीव परमात्म्यापासून उत्पन्न होतो, व त्यास मुक्तिही आहे ( सू. १८–१९ ). जीव हा अणु आहे व तो व्यापक नाहीं ( सू. २०–२७ ). जीव ब्रह्माहून निराळा आहे, तथापि त्यासारखा असल्यामुळें त्याचा शब्द त्यास लावतात ( सू. २८–२९ ). परमात्मा आहे तोंपर्यंत जीव आहे म्हणून दोष नाहीं व तसेंच दिसत आहे ( सू. ३० ). जसें पुरुषाचें पुरुषत्व वयांत आल्यावर प्रकट होतें तसें जीवामधील आनंदादिकांचें प्रकटीकरण मुक्तीमध्यें होतें. तसें न घेतलें तर नित्य आनंद नित्य दुःख इत्यादि होतील ( सू. ३१–३२ ). जीवास स्वतंत्रपणानें कार्य करण्याची शक्ति नाहीं तर ती शक्ति परमात्म्याच्या अनुरोधानें त्याच्या अ-

धीन आहे आणि त्यास श्रुति प्रमाण आहे. जीवाची शक्ति ईश्वराच्या अधीन आहे तथापि त्याच्या आज्ञेनें करण्याची शक्ति आहे ( सू. ३३–४१ ). जीव परमात्म्याचा विभिन्न अंश आहे, आणि मत्स्यादि अवतार हे स्वांश आहेत. जीवाला देहसंबंध असल्या कारणानें त्याचे बंध व मोक्ष हे परमेश्वराच्या अधीन आहेत. तसें मत्स्यादि अवतारांचे नाहींत. जीव परमात्म्याचें प्रतिबिंब आहे, तसें मत्स्य इत्यादि अवतार नाहींत ( सू.४२–५० ). विद्या, कर्म, संस्कार ह्यांच्या विचित्रपणामुळें प्रतिबिंबरूप जीवांमध्यें देव, दैत्य व मनुष्य इत्यादि विचित्रपणा येतो. कामक्रोध इत्यादि दोषांमध्येंहीं अदृष्ट इत्यादिकांच्या वैचित्र्यामुळें विचित्रता येते. देशकाल इत्यादिकांच्या विचित्रपणाचाही अंतर्भाव अदृष्टादि वैचित्र्यांत होतो ( सू. ५१–५३ ) ॥ ३ ॥

## तिसरा पाद.

## ॐ न वियदश्रुतेःॐ ॥ १ ॥

**टीका**—विप्रतिषेधादित्युक्तदोषो वैदिकमतेपि स्यादिति शंकां व्युदसितुं अत्र पादे श्रुतिविरोधो निरस्यते । अत्र नये वियदुत्पत्त्यनुत्पत्तिश्रुत्यविरोध उच्यते ॥ नेति ॥ **वियत्** आकाशं अनुत्पत्तिमत् **न** । किं तूत्पत्तिमदेव । कुतः । **अश्रुतेः** वियदनुत्पत्तौ श्रुत्यभावादित्यर्थः ॥ १ ॥

**अर्थ**—[ दुसऱ्या पादाच्या शेवटल्या सूत्रांत श्रुतिविरोधाचा जो दोष सांगितला तो वेदांत सांगितलेल्या मतालाही लागू पडेल ह्या शंकेचें निवारण करण्याकरितां ह्या पादांत श्रुतीच्या विरोधाचा परिहार करितों. ह्या अधिकरणांत आकाश उत्पत्तिमान् आहे व उत्पत्तिमान नाहीं अशा अर्थांच्या दोन श्रुतींमध्यें विरोध नाहीं असें सांगतों. ] आकाश हें उत्पन्न झालेलें नाहीं असें नाहीं, तर तें ईश्वरापासून उत्पन्न झालें आहे. कारण आकाश हें उत्पन्न झालें नाहीं अशाविषयीं श्रुति नाहीं ॥ १ ॥

## ॐअस्ति तुॐ ॥ २ ॥

**टीका**—उत्पत्तौ मानाभावादेवानुत्पत्तिमत्त्वं सिध्यतीत्यत आह ॥ अस्तीति ॥ **तु**[1] आकाशोत्पत्तौ आत्मन आकाशः संभूत इति श्रुतिः **अस्ति** एवेत्यर्थः ॥ २ ॥

**अर्थ**—[ उत्पत्तीविषयीं प्रमाण नसल्यामुळेंच आकाश उत्पन्न झालेलें नाहीं असें होतें, असें कोणी ह्मणेल तर सांगतों. ] आकाश हें उत्पन्न झालें आहे ह्याविषयीं " आत्मन आकाशः संभूतः" ( ह्मणजे परमेश्वरापासून आकाश उत्पन्न झालें ) ही श्रुति आहे ॥ २ ॥

---

१ तुशब्दोऽवधारणे ।

## ॐगौण्यसंभवात् ॐ ॥ ३ ॥

**टीका**—अनादिर्वा अयमाकाश इति विरुद्धेयं श्रुतिः अश्रुतेरिति चासिद्धमित्यत आह ॥ गौणीति ॥ अनादिर्वा ऽयमाकाश इति श्रुतिः **गौणी** अमुख्यानादित्वपरा। कुतः। **असंभवात्** तस्याः मुख्यार्थत्वे बहुलोत्पत्तिश्रुत्ययोगादित्यर्थः ॥ ३ ॥

**अर्थ**—[ " अनादिर्वा अयमाकाशः " ( ह्मणजे हें आकाश अनादि आहे ) ही श्रुति विरुद्ध आहे, ह्मणून श्रुति आहे असें सिद्ध होतें, असें कोणी ह्मणेल तर सांगतों. ] " अनादिर्वायमाकाशः " ही श्रुति गैाण आहे. कारण आकाश उत्पत्तिमान आहे अशाविषयीं ज्या पुष्कळ श्रुती आहेत त्यांना बाध येतो ॥ ३ ॥

## ॐशब्दाच्च ॐ ॥ ४ ॥

**टीका**—इतश्च गौणीत्याह ॥ शब्दादिति ॥ **च शब्दात्** अथ हवावनित्यानीति श्रुतिबलात् अनादित्वश्रुतिर्गौणार्थेत्यर्थः ॥ ४ ॥

**अर्थ**—[ आणखी असें सांगतों कीं ती श्रुति गौण आहे. ] आणखी कारण " अथहवावानित्यानि " ( ह्मणजे पुरुष, प्रकृति, आत्मा व काल हीं नित्य आहेत व प्राण, श्रद्धा, भूतें इत्यादि अनित्य आहेत ) अशी श्रुति असल्यामुळें अनादित्व सांगणारी श्रुति गौण आहे ॥ ४ ॥

## ॐस्याच्चैकस्य ब्रह्मशब्दवत् ॐ ॥ ५ ॥

**टीका**–भवेदाकाशस्य गौणमनादित्वमुत्पत्तिर्मुख्यतइति व्यवस्था। यद्यनादित्वश्रुतिर्गौणी भवेन्नैतदस्ति। न जायते म्रियत इत्यादावनुत्पत्तिमच्छब्दस्य मुख्यार्थत्वदर्शनादित्याशंकां परिहरत्सूत्रमुपन्यस्य व्याचष्टे ॥ स्यादिति ॥ **ब्रह्मशब्दवत्** यथा एकस्यैव ब्रह्मशब्दस्य परब्रह्मणि मुख्यत्वं चतुर्मुखादावमुख्यत्वं तथा **एकस्य च**[1] अनादिशब्दस्य परब्रह्मणि मुख्यत्वं वियदादावमुख्यत्वं **स्यात्** भवेदित्यर्थः ॥ ५ ॥

**अर्थ**—[ जर आकाशाचा अनादिपणा सांगणारी श्रुति गौण असेल,

१ चो ऽवधारणे.

तर आकाशाची उत्पत्ति मुख्य असून त्याचा अनादिपणा गौण होईल; परंतु तसें नाहीं, कारण " न जायते म्रियते वा " ( ह्मणजे आत्मा हा उत्पन्न होत नाहीं किंवा मरत नाहीं ) ह्या वचनांत उत्पन्न न होणें ह्या अर्थाचा शब्द मुख्य अर्थाचा आहे असें आढळतें, अशी कोणी शंका घेईल तर तिचें निवारण करितों. ] जसा ब्रह्म हा एकच शब्द परमेश्वराला मुख्य अर्थानें लागतो व ब्रह्मदेव इत्यादिकांना गौण अर्थानें लागतो, तसा अनादि हा एकच शब्द परमेश्वराला मुख्य अर्थानें लागतो व आकाश इत्यादिकांना गौण अर्थानें लागेल ॥ ५ ॥

## ॐप्रतिज्ञाहानिरव्यतिरेकाच्छब्देभ्यः ॐ ॥ ६ ॥

**टीका**—अस्तु ब्रह्मशब्दो बाधादन्यत्रामुख्य इह तु कुत इत्यत आह ॥ प्रतिज्ञाहानिरिति ॥ आकाशस्य मुख्यानुत्पत्त्युक्तौ **प्रतिज्ञाहानिः** स इदं सर्वमसृजतेति ब्रह्मणः स्रष्टृत्वप्रतिज्ञाहानिः स्यात् । कुतः । **अव्यतिरेकात्** आकाशस्य सर्वशब्दार्थानतिरिक्तत्वात् । किंच यतः **शब्देभ्यः** आत्मा वा इदमित्यादिस्पष्टश्रुतिभ्यश्च ब्रह्मण एव मुख्यानुत्पत्तिः न त्वन्यस्येत्यवसीयते अत उक्तं युक्तमित्यर्थः ॥ ६ ॥

**अर्थ**—[ अर्थाला बाध येत असल्यामुळें ब्रह्म हा शब्द ब्रह्मदेव इत्यादिकांना गौण अर्थानें लागत असला, तथापि येथें ( अनादि शब्दाचा अर्थ तसा ) कां घ्यावा अशी शंका येईल तर सांगतों. ] अनादि हा शब्द आकाशाला मुख्य अर्थानें लाविला असतां " सइदं सर्वमसृजत " ( ह्मणजे त्यानें हें सर्व उत्पन्न केलें ) ह्या श्रुतींत परमेश्वरानें सृष्टि सर्व उत्पन्न केली असें जें सांगितलें आहे त्यास बाध येईल, कारण " सर्व " ह्या शब्दांत आकाशाचा समावेश होतो. आणखी " आत्मावा इदमग्र आसीत् " ( ह्मणजे ह्या जगाच्यापूर्वी परमात्मा होता ) इत्यादि श्रुतीवरून अनादि हा शब्द मुख्यत्वेंकरून परमेश्वराला लागतो, आणि दुसऱ्यास लागत नाहीं, असें ठरतें. ह्मणून जें सांगितलें तें बरोबर आहे ॥ ६ ॥

## ॐयावद्विकारं तु विभागो लोकवत् ॐ ॥ ७ ॥

**टीका**—आकाशादावनुत्पत्तिशब्दस्य शब्दतःसादित्वमुक्त्वानुमानतोपि तदाह ॥ यावदिति ॥ तु[1] **यावत् विभागः** अल्पशक्तियुक्तः तावद्वस्तुजातं **विकारं** विकारयुक्तं उत्पत्तिमदेव । **लोकवत्** लोके यथा घटादिवस्तुजातमल्पशक्तिमत् उत्पन्नं दृष्टं तथेति । अनेन वियत् उत्पत्तिमत् । अल्पशक्तित्वात् । घटवत् । ब्रह्म नोत्पत्तिमत् पूर्णशक्तित्वात् । व्यतिरेकेण घटवादित्यनुमानद्वयं सूचितामिति सूत्रार्थः ॥ ७ ॥ १ ॥

**अर्थ**—[ आकाश इत्यादिकांना उत्पत्तिरहित हा शब्द श्रुतीच्या आधारानें उत्पत्तिमान् अशा अर्थानें लावावा असें सांगून अनुमानानेंही तें सिद्ध करितों. ] जें जें अल्पशक्तियुक्त असतें तें तें उत्पत्तिमान् असतें. जगामध्यें जसे, घट इत्यादि पदार्थ अल्पशक्तियुक्त असल्यामुळें उत्पन्न झालेले आहेत असें समजतें, तसें आकाश अल्पशक्तिमान् असल्यामुळें उत्पन्न झालेलें आहे असें होतें. ह्यावरून आकाश उत्पत्तिमान् आहे, कारण तें अल्पशक्तिमान आहे, जसा घट; आणि परमेश्वर उत्पत्तिमान् नाहीं, कारण तो अल्पशक्तिमान् नाहीं ह्मणजे पूर्णशक्तिमान् आहे; ह्याप्रमाणें व्यतिरेकव्याप्ति घेऊन दोन अनुमानें दाखविलीं आहेत असा ह्या सूत्राचा अर्थ जाणावा ॥ ७ ॥ १॥

## ॐएतेन मातरिश्वा व्याख्यातः ॐ ॥ ८ ॥

**टीका**—अत्र मुख्यवायूत्पत्तिविषयश्रुतिविरोधः परिह्रियते ॥ एतेनेति ॥ **एतेन** अनुत्पत्तिशब्दस्य अमुख्यत्वप्रतिपादनेन **मातरिश्वा** वायुर्वावनित्य इति नित्यतया प्रतिपाद्यः वायुरपि **व्याख्यातः** प्राणाद्वायुरजायतेति उत्पत्तिश्रुतिसद्भावात् नित्यत्वश्रुतिराकाशानादित्वश्रुतिवत् गौणार्थतया व्याख्यातः ॥ ८ ॥ २ ॥

**अर्थ**—[ ह्या अधिकरणांत मुख्य वायूच्या उत्पत्तीविषयीं ज्या विरुद्ध श्रुती आहेत, त्यांचा विरोध नाहींसा करितों. ] अनुत्पत्ति हा

---

१ तु शब्दश्च शब्दार्थे ।

शब्द गौण अर्थानें आकाशाला लागतो असें सांगितल्यावरून, "वायुर्वावनित्यः" ( म्हणजे वायु नित्य आहे ) ह्यांत वायु नित्य आहे असें जें सांगितलें आहे, त्याचेंही प्रतिपादन केलें असें झालें. "प्राणाद्वायुरजायत" ( प्राणापासून वायु उत्पन्न झाला ) ह्या श्रुतींत वायूला उत्पत्ति सांगितली असल्यामुळें तो नित्य आहे असें सांगणारी श्रुति, आकाशाचें अनादित्व सांगणाऱ्या श्रुतीप्रमाणें गौण आहे असें जाणावें ॥ ८ ॥ २ ॥

## ॐ असंभवस्तु मतो ऽनुपपत्तेः ॐ ॥ ९ ॥

**टीका**—अत्र भगवदुत्पत्तिविषयश्रुतिविरोधः परिह्रियते ॥ असंभवस्त्विति ॥ असतः सदजायतेति श्रुत्या असतः सकाशात्सद्ब्रम्ह उत्पद्यत इति **असंभवः तु**[1] अयुक्त एव । कुतः । **सतः** असतः सकाशादुत्पत्तेरदृष्टत्वेन **अनुपपत्तेः** ॥ ९ ॥ ३ ॥

**अर्थ**—[ ह्या अधिकरणांत भगवंताच्या उत्पत्तीविषयीं जो श्रुतीमध्यें विरोध आहे त्याचा परिहार करितों. ] " असतः सदजायत " ( ह्मणजे असतापासून सत् ह्मणजे परमेश्वर उत्पन्न झाला ) ह्या श्रुतीवरून असतापासून परमेश्वर उत्पन्न झाला असें ह्मणणें अगदीं अयोग्य आहे. कारण असतापासून सत्पदार्थाची उत्पत्ति झाल्याचें आढळत नाहीं ॥ ९ ॥ ३ ॥

## ॐ तेजोतस्तथा ह्याह ॐ ॥ १० ॥

**टीका**—अत्र तेजोजनकश्रुत्याविरोध उच्यते ॥ तेज इति ॥ **तेजः** तेजोभूतं **अतः** ब्रह्मण एव जायते । हि यस्मात **तथा** साक्षाद्भगवज्जातत्वेन **आह** " तत्तेजो ऽसृजत " इति श्रुतिराहेति सूत्रार्थः ॥१०॥४॥

**अर्थ**—[ ह्या अधिकरणांत तेजाच्या उत्पत्तीसंबंधी ज्या श्रुती

---

१ तु शब्दो अवधारणे ।

आहेत त्यांत विरोध नाहीं असें सांगतो. ] तेज हें भूत परमेश्वरापासूनच उत्पन्न झालें आहे. कारण तें साक्षात् परमेश्वरापासून उत्पन्न झालें आहे असें "तत्तेजोऽसृजत" ( ह्मणजे ब्रह्मानें तेज उत्पन्न केलें)ह्या श्रुतींत सांगितलें आहे असा सूत्राचा अर्थ जाणावा ॥१०॥४॥

## ॐ आपः ॐ ॥ ११ ॥

**टीका**—अत्र अब्जनकश्रुत्याविरोध उच्यते ॥ आप इति ॥ **आपः** अब्भूतमपि तथा भगवज्जातत्वेन "ब्रम्हैवेदमग्र आसीत्तदपो ऽ सृजतेति श्रुतिराहेति सूत्रार्थः ॥ ११ ॥ ५ ॥

**अर्थ**—[ ह्या अधिकरणांत उदकाच्या उत्पत्तिसंबंधीं ज्या श्रुती आहेत त्यांत विरोध नाहीं असें सांगतो. ] उदक हें भूतही त्याचप्रमाणें भगवंतापासून उत्पन्न झालें असें " ब्रह्मैवेदमग्रआसीत्तदपोऽसृजत " ( म्हणजे पहिल्यानें परमेश्वर मात्र होता, त्यानें उदक उत्पन्न केलें आहे. ह्या श्रुतींत सांगितलें आहे ॥ ११ ॥ ५ ॥

## ॐपृथिव्यधिकाररूपशब्दान्तरादिभ्यः ॐ ॥ १२ ॥

**टीका**--अत्र ता अन्नमसृजंत अभ्द्यः पृथिवीति द्वार श्रुत्यविरोध उच्यते ॥ पृथिवीति **पृथिवी** " ता अन्नमसृजंते त्यत्र अन्नशब्देन पृथिवी भूतमुच्यते । **अधिकाररूपशब्दतरादिभ्यः** ' तत्तेजोऽसृजतेति भूताधिकारत्वात् कार्ष्ण्यप्रचुरापृथिवीति पृथिव्याः कृष्णरूपप्रतिपादनात् । आपश्च पृथिवी चान्नं पृथिवी वा अन्नमित्युक्तप्रकारेण अधिकाररूपशब्दांतरादिभ्य इति सूत्रार्थः ॥ १२ ॥ ६ ॥

**अर्थ**—[ ह्या अधिकरणांत " ता अन्नमसृजंत अद्भ्यः पृथिवी " ( म्हणजे उदकांनीं अन्न उत्पन्न केले व उदकापासून पृथिवी उत्पन्न झाली ) ह्या दोन श्रुतीमध्यें विरोध नाहीं असें सांगतो. ] " ता अन्नमसृजंत " म्हणजे उदकांनीं अन्न उत्पन्न केलें ) ह्या श्रुतींत

अन्न म्हणजे पृथिवी आहे. कारण “ तत्तेजोऽसृजत ” ( म्हणजे परमेश्वरानें तेज उत्पन्न केलें ) ह्या श्रुतींत पंचभूताविषयीं प्रकरण आहे, “ काष्र्ण्यप्रचुरा पृथिवी ” ( म्हणजे पुष्कळ काळी पृथिवी ) ह्या श्रुतींत पृथ्वीचें काळें रूप सांगितलें आहे, आणि “ आपश्च पृथिवी चान्नं पृथिवी वा अन्नं ” ( म्हणजे उदक व पृथिवी हीं अन्न आहेत अथवा पृथिवी अन्न आहे ) ह्या श्रुतींत अन्न शब्द पृथ्वीला लाविला आहे ॥ १२ ॥ ६ ॥

## ॐ तदभिध्यानादेव तु तल्लिंगात्सः ॐ ॥१३॥७॥

**टीका**--एवमधिभूताधिदेवजन्मश्रुत्यविरोधमुक्त्वा यत्प्रयंति रुद्रोमाविशांतक इति तत्संहारकश्रुत्यविरोध उच्यते ॥ तदभिध्यानादिति ॥ **सः** परमात्मा जगतः संहारकर्त्ता । **तदभिध्यानात् एव** तस्य परमात्मनः अभिध्यानात् इच्छायाः एव सकाशात् । **तल्लिंगात्** तस्याभिध्यानाद्योजनात्तत्वभावादिति श्रुतौ अनादिजीवबंधलयस्य भगवदिच्छाधीनत्वलिंगात् तु[1] ॥१३ ॥ ७ ॥

**अर्थ**—[ ह्या प्रमाणें भूतें व त्यांच्या देवता ह्यांच्या उत्पत्तिविषयींच्या श्रुतींत विरोध नाहीं असें सांगून “ यत्प्रयंति ” ( म्हणजे ज्यांत लय पावतात ) आणि “ रुद्रोमाविशांतकः ” ( म्हणजे हे नाश करणाऱ्या रुद्रा, माझ्यांत प्रवेश करूं नकोस ) ह्या त्यांचा संहार करण्याविषयीं ज्या श्रुती आहेत त्यांचा अविरोध सांगतो. ] परमात्मा जगाचा संहार करणारा आहे. कारण परमात्म्याची तशी इच्छा आहे, आणि “ तस्याभिध्यानाद्योजनात्तत्वभावात् ” ( म्हणजे परमेश्वराकडे मन लावून योग्य प्रकारें ध्यान करून नंतर त्यास झालेल्या इच्छेच्यायोगानें ) ह्या श्रुतींत अनादिकालापासून असलेल्या बंधापासून मुक्त होणें परमेश्वराच्या इच्छाधीन आहे ॥ १३ ॥ ७ ॥

---

१ तु शब्देन अनादिबंधलयस्यापि कर्त्ता किमु सादेर्जगत इति कैमुत्यं सूचयति ।

## ॐ विपर्ययेण तु क्रमोत उपपद्यते च ॐ॥१४॥८॥

टीका--अत्राधिभूतादिसंहारक्रमश्रुत्यविरोध उच्यते ॥ विपर्ययेणेति ॥ अतः उत्पत्तिक्रमात् **विपर्ययेण तु** वैपरीत्येनैव **क्रमः** लये क्रमः **उपपद्यते च** । पूर्वोत्पन्नानां उत्तरोत्पन्नेभ्यो ऽधिकसामर्थ्येन तेषां अधिककालावस्थानस्य युक्तत्वात् ॥ १४ ॥ ८ ॥

अर्थ--[ ह्या अधिकरणांत पंचभूतें इत्यादिकांच्या नाशांच्या क्रमाविषयीं ज्या श्रुती आहेत त्यांत विरोध नाहीं असें सांगतों. ] उत्पत्तीच्या क्रमाहून नाशाचा क्रम उलट असणें योग्य आहे. मागून उत्पन्न झालेल्यापेक्षां पूर्वीं उत्पन्न झालेल्यांना अधिक सामर्थ्य असल्यामुळें पूर्वीं उत्पन्न झालेले अधिक कालापर्यंत राहतात हें योग्य आहे ॥ १४ ॥ ८ ॥

## ॐ अंतरा विज्ञानमनसी क्रमेण तल्लिंगादिति चेन्नाविशेषात् ॥ १५ ॥

टीका--अत्रप्रागुक्तव्युत्क्रमलयस्य विज्ञानादावपवादशंकानिरासेन लयक्रमश्रुत्यविरोध उच्यते ॥ अंतरेति ॥ प्राणान्मनः मनसश्च विज्ञानमिति श्रुतौ पश्चादुत्पन्नस्य विज्ञानं तत्वस्य यच्छेद्वाङ्मनसि प्राज्ञ इति श्रुतौ पश्चादेव लयः श्रूयते पूर्वोत्पन्नस्य मनस्तत्वस्य पूर्वमेव लयः श्रूयते । कुतः । **तल्लिंगात्** श्रुत्युक्तत्वलिंगात् । **विज्ञानमनसी अंतरा** विज्ञानतत्वमनस्तत्वे विना अन्येषां व्युत्क्रमेणैव लयः । विज्ञानमनसी तु **क्रमेण** क्रमेणैव लीयेते **इति चेत् न । अविशेषात्** विज्ञानमनस्तत्वयोः उत्पत्तिक्रमानुसारेणैव लय इत्यत्र विशेषप्रमाणाभावादिति सूत्रार्थः॥१५॥

अर्थ--[ह्या सूत्रांत पूर्वीं सांगितलेल्या लयाच्या उलट क्रमाला विज्ञान इत्यादिकांच्या ठिकाणीं अपवाद येतो ही शंका दूर करून

---

१ कर्त्ता प्राणादिकस्याहं हता भूम्यादिकस्य स इति श्रुतः ।

लयाच्या क्रमासंबंधीं ज्या श्रुती आहेत त्यांत विरोध नाहीं असें सांगतो. ] " प्राणान्मनः मनसश्चविज्ञानं " ( म्हणजे प्राणापासून मन झालें व मनापासून विज्ञान झालें ) ह्या श्रुतींत मागून उत्पन्न झालेल्या विज्ञानतत्वाचा " यच्छेद्वाङ्मनसिप्राज्ञः " ( म्हणजे ज्ञान्यानें मनांमध्यें वाणीचा लय करावा ) ह्या श्रुतींत मागून लय होतो असें सांगितलें आहे, आणि पूर्वीं उत्पन्न झालेल्या मनतत्वाचा लय अगोदर होतो असें सांगितलें आहे. कारण तसें श्रुतींत ज्ञापित केलें आहे. विज्ञानतत्व व मनतत्व ह्या दोहोंशिवाय इतरांचा लय उलट क्रमाचा आहे, आणि विज्ञान व मन ह्यांचा लय उत्पतीच्या क्रमानेंच आहे, असें कोणी म्हणेल, तर तें बरोबर नाहीं. कारण विज्ञान व मन ह्या दोन तत्वांच्या उत्पत्तीच्या क्रमाला अनुसरूनच लय होतो अशाविषयीं विशेष प्रमाण नाहीं ॥ १९ ॥

## ॐ चराचरव्यपाश्रयस्तु स्यात्तव्द्यपदेशोभाक्तस्तद्भावभावित्वात् ॐ ॥१६॥

**टीका**—विज्ञानमनसोः क्रमेणेतिवाच्येंऽतरेत्येवंरूपोक्तिस्तद्वयादन्येषां व्युत्क्रमेण लय इत्यर्थानुमितिसूचनाय उक्तं लिंगमेव तत्र मानमित्यतआह ॥ चराचरेति ॥ **तव्द्यपदेशः** यद्यपि यच्छेद्वाङ्मनसीप्राज्ञस्तद्यच्छेत् ज्ञानआत्मनि इति श्रुतौ तन्मनस्तत्वं ज्ञाने विज्ञानतत्वे यच्छेदिति तत्वानां लयक्रमः । तथापि मनस्तत्वाद्विज्ञानतत्वस्योत्पत्तिः । विज्ञानतत्वात्तु मनोमनस्तत्वाच्चखादिकमिति तत्वोत्पत्तिक्रमस्योक्तत्वात् । मनसश्च विज्ञानं इत्यत्र मनोविज्ञानमितिव्यपदेशः **चराचरव्यपाश्रयः तु** चरेति चंचलत्वात् मनोरूपेंद्रियं तद्वृत्तिरूपविज्ञानं चोच्यते अचरेत्यचंचलत्वात् मनस्तत्वं विज्ञानतत्वं च स्यादिति इंद्रियअवबोधमनस्तत्वविज्ञानतत्वरूपाणां चतुर्णां साधारणोऽपि **भाक्तः** इंद्रियावबोधलक्षणयैक-

देशविषयय्यैव **स्यात्** ॥ कुतः । **तद्भावभावित्वात्** तद्भावे तस्य मनसः भावे तत्वाद्यर्थविषयत्वे भावित्वात् तद्विषयकज्ञानस्योत्पाद्यमानत्वात् । क्रमेण उत्पत्त्यनुसारेण लयाभावादितिसूत्रार्थः ॥ १६ ॥ ९ ॥

**अर्थ**--[ विज्ञान आणि मन ह्यांचा लय त्यांच्या उत्पतीच्या क्रमाप्रमाणें होतो असें न ह्मणतां त्या दोहोंशिवाय इतरांचा लय उलट क्रमानें होतो असें आर्थिक अनुमान सुचविण्याकरितां पूर्वी सांगितलेलें लिंग हेंच प्रमाण आहे, अशी कोणी शंका घेईल तर सांगतो. ] जरी " यच्छेद्वाङ्मनसिप्राज्ञस्तद्यच्छेत्ज्ञानआत्मनि " ( म्हणजे ज्ञान्यानें वाणीचा लय मनांत करावा व मनाचा लय विज्ञानांत करावा ) ह्या श्रुतींत मनाचा लय विज्ञानांत करावा, अशा प्रकारें तत्वांच्या लयाचा क्रम सांगितला आहे, तरी मनापासून विज्ञानाची उत्पत्ति आहे. " विज्ञानतत्वात्तुमनोमनस्तत्वाच्च खादिकं " ( म्हणजे विज्ञानतत्वापासूज मन व मनतत्वापासून आकाश इत्यादि ) असा तत्वांच्या उत्पत्तीचा क्रम सांगितला आहे, " मनसश्चविज्ञानं " ( म्हणजे मनापासून विज्ञान ) ह्या श्रुतींत मनापासून विज्ञान झालें आहे असें जें सांगितलें तें, चर म्हणजे चंचल असल्यामुळें मन इंद्रिय व त्यावर राहणारें विज्ञान आणि अचर म्हणजे चंचल नसल्याकारणानें मनतत्व आणि विज्ञानतत्व ह्या दोहोंवर साधारण रीतीनें अवलंबून आहे. तथापि इंद्रिय शब्दाची त्याच्या एका भागावर राहणाऱ्या ज्ञानावर लक्षणा करून तसें होईल; कारण मन असल्यास पदार्थाचें ज्ञान होतें. म्हणून उत्पत्तीच्या क्रमाप्रमाणें लय होत नाहीं असा सूत्राचा अर्थ आहे॥१६॥९॥

## ॐ नात्माश्रुतेर्नित्यत्वाच्चताभ्यः ॐ ॥ १७ ॥

**टीका**—अत्र लयालयश्रुत्यविरोधउच्यते ॥ नेति ॥ **आत्मा** परमात्मा स इदं सर्वं विलाप्य अंतस्तमसि निर्लीन इति **श्रुत्या न** लीयते ।

कुतः । अश्रुतेः ब्रम्हलयस्य कुत्राप्यश्रुतत्वात् । च ताभ्यः तुच्छेनाभ्यपिहितं यदासीदित्यादिश्रुतिभ्यः आच्छादितत्वेन नित्यत्वात् इति सूत्रार्थः ॥ १७ ॥ १० ॥

**अर्थ**—[ ह्या अधिकरणांत लय होणें व लय न होणें ह्याविषयींच्या श्रुतीमध्यें विरोध नाहीं असें सांगतो ] " स इदं सर्वं विलाप्यांतस्तमसिनिलीनः " ( म्हणजे परमात्मा ह्या सर्वांचा लय करून प्रकृतींत लय पावतो ) ह्या श्रुतीवरून परमात्मा लय पावत नाहीं, कारण परमात्म्याचा लय होतो अशाविषयीं श्रुति नाहीं, आणि " तुच्छेनाभ्यपिहितंयदासीत् " ( म्हणजे जें ब्रम्ह प्रकृतिरूप तमानें झाकलेलें होतें ) ह्या श्रुतीवरून परमात्मा नित्य असल्या कारणानें लय पावत नाहीं ॥ १७ ॥१०॥

## ॐ ज्ञोऽतएव ॐ ॥ १८ ॥

**टीका**—एवंभूताधिदैवब्रम्हविषयश्रुत्यविरोधमुक्त्वा ऽतःपरमापादसमाप्तिजीवश्रुत्यविरोधचिंता । अत्र नित्योनित्यानां आत्मानोव्युच्चरंतीतिजीवजन्माजन्मश्रुत्यविरोधउच्यते ॥ ज्ञइति॥ ज्ञः जानातीति ज्ञः जीवः **अतः एव** परमेश्वरादेव उत्पद्यते । अथवा **अतः एव** ते वा एते चिद्दात्मान इति शब्दादेवेति सूत्रार्थः ॥ १८ ॥

**अर्थ**—[ ह्याप्रमाणें पंचभूतें, देवता व परमात्मा ह्यांच्याविषयीं असलेल्या श्रुतींत विरोध नाहीं असें सांगून पुढें हा पाद संपेपर्यंत जीवाविषयीं असलेल्या श्रुतींत विरोध नाहीं ह्याचा विचार केला आहे. ह्या सूत्रांत " नित्योनित्यानां ( म्हणजे नित्यामध्यें नित्य ) आणि " आत्मानोव्युच्चरंति " ( म्हणजे जीव उत्पन्न होतात ) ह्या दोन श्रुतींत जीव जन्मणें व न जन्मणें असा विरोध येत नाहीं असें सांगतो. ] जीव परमेश्वरापासून उत्पन्न होतो. अथवा " तेवाएतेचिदात्मानः "

( म्हणजे ते हे ज्ञानरूप जीव उत्पन्न होतात ) ह्या श्रुतीवरून जीव उत्पन्न होतात ॥ १८ ॥

## ॐ युक्तेश्च ॐ ॥ १९ ॥

**टीका**—अनादिनित्यस्य जीवस्य जनिरयुक्तेत्यतआह ॥ युक्तेरिति॥ **च युक्तेः** नित्यस्यापि जीवस्य उपाध्यपेक्षया उत्पत्तिरिति युक्तेश्चेति सूत्रार्थः ॥ १९ ॥ ११ ॥

**अर्थ**—[ अनादि व नित्य जीवाला उत्पत्ति असणें योग्य नाहीं असें कोणी म्हणेल तर सांगतो.] आणखी नित्य अशाही जीवाच्या उपाधींच्या कारणानें उत्पत्ति होणें सयुक्तिक आहे ॥ १९ ॥ ११ ॥

## ॐ उत्क्रांतिगत्यागतीनां ॐ ॥ २० ॥

**टीका**—अत्रव्याप्ताह्यात्मानः अणुर्ह्येषआत्मेति जीवपरिमाणश्रुत्यविरोध उच्यते ॥ उत्क्रांतीति ॥ जीवो ऽणुरेव न व्याप्तः **उत्क्रांतिगत्यागतीनां** सो ऽस्माच्छरीरात् उत्क्रम्यामुंलोकमभिगच्छति अयुष्मादिमं लोकमागच्छतीति जीवस्य देहादुत्क्रांतस्य लोकगत्यागतीनां हेतूनां सकाशाज्जीवोऽणुरेवेति सूत्रार्थः ॥ २० ॥

**अर्थ**—[ ह्या सूत्रांत " व्याप्ताह्यात्मानः " ( ह्मणजे जीव व्यापक आहेत ) आणि " अणुर्ह्येषआत्मा " ( ह्मणजे हा जीव अणु आहे ) ह्या दोन श्रुतींत जीवाच्या परिमाणाविषयीं विरोध नाहीं असें सांगतो. ] जीव अणु आहे, तो व्यापक नाहीं. कारण " सो ऽस्माच्छरीरात्उत्क्रम्यामुंलोकमभिगच्छति अमुष्मादिमंलोकमभिगच्छति " ( ह्मणजे जीव ह्या शरीरांतून बाहेर पडून ह्या लोकांस जातो व त्या लोकाहून ह्या लोकीं येतो ) ह्या श्रुतींत जीव बाहेर पडतो, जातो व येतो असें सांगितलें आहे त्यावरून तो अणु आहे ॥ २० ॥

## ॐ स्वात्मनाचोत्तरयोः ॐ ॥ २१ ॥

**टीका**—प्रसंगादुत्क्रांत्यादेः परायत्ततामाह ॥ स्वात्मनेति ॥ **स्वात्मना चं**[1] स्वतंत्रपरमात्मनैव जीवस्य उत्क्रांत्यादयः । कुतः । **उत्तरयोः** स एतेनैव स्वात्मना परेणेमं गर्भमनुप्रविशति एषह्येनं जीवमभिजीवयतीत्युत्तरयोः वाक्ययोः भगवदधीनतायाः उक्तत्वात् न स्वातंत्र्येणेति- सूत्रार्थः ॥ २१ ॥

**अर्थ**—[ प्रसंग आल्यावरून जीवाचें बाहेर पडणें इत्यादि हें परमात्म्याचें आधीन आहे असें सांगतो. ] स्वतंत्र परमात्म्याच्यायोगानेंच जीवाचें शरीरांतून बाहेर निघणें इत्यादि व्यापार होतात. ह्यास प्रमाण " स एतेनैव स्वात्मनापरेणेमंगर्भमनुप्रविशति " ( ह्मणजे तो ह्या श्रेष्ठ परमात्म्याच्याचयोगानें गर्भांत जातो ) आणि " एषह्येनंजीवमभिजीवयति " ( ह्मणजे हा परमात्मा ह्या जीवाला जीवंत ठेवितो ) ह्याप्रमाणें पुढील दोन वाक्यांमध्यें जीव परमात्म्याच्या आधीन आहे असें सांगितलें आहे ॥ २१ ॥

## ॐ नाणुरतच्छ्रुतेरितिचेन्नेतराधिकारात् ॐ ॥ २२ ॥

**टीका**—प्रागुक्तमाक्षिप्याह ॥ नाणुरिति ॥ जीवः **अणुः न अतच्छ्रुतेः** व्याप्ताह्यात्मानश्चेतनानिर्गुणाश्चेति व्याप्तत्वप्रतिपादकश्रुतेः **इति चेत् न इतराधिकारात्** सआत्माइदंसृजतीत्यादिना व्याप्ताह्यात्मानइतिश्रुतेरितरस्य जीवादितरस्य परमात्मनः अधिकारात् भगवद्विषयत्वादिति सूत्रार्थः ॥ २२ ॥

**अर्थ**—[ पूर्वीं सांगितलें त्यावर शंका घेऊन सांगतो. ] जीव अणु नाहीं; कारण " व्याप्ताह्यात्मानश्चेतनानिर्गुणाश्च " ( ह्मणजे आत्मे व्यापक, चेतन व निर्गुण असे आहेत ) ह्या श्रुतीवरून जीव व्यापक

---

१ चोऽवधारणे.

आहेत असें ह्मणणें बरोबर नाहीं, कारण " स आत्माइदंसृजति " ( ह्मणजे तो परमात्मा हें जग उत्पन्न करितो ) इत्यादि श्रुतीवरून ती श्रुति जीवाहून निराळा असलेल्या परमात्म्याविषयींचें प्रकरण आहे ॥ २२ ॥

## ॐ स्वशब्दोन्मानाभ्यां च ॐ ॥ २३ ॥

**टीका**—अधिकारमात्रेण न बहुवचनश्रुतिबाधोयुक्त इत्यत आह ॥ स्वेति ॥ **स्वशब्दोन्मानाभ्यां च** एषह्यात्मात्ह्युद्रतोमानशक्तेः इति स्वशाब्दपर्यायात्मशब्दः । उद्गतोमानशक्तेरित्युन्मानत्वं च । एवं वाक्य-शेषोक्तस्वशब्दोन्मानाभ्यां च परमात्मैव व्याप्ताह्यात्मानइतिश्रुत्युक्त इति सूत्रार्थः ॥२३ ॥

**अर्थ**—श्रुतींत " आत्मानः " असें बहुवचन असल्यानें तिला नुसत्या प्रकरणानें बाध येतो असें ह्मणणें सयुक्तिक नाहीं असें कोणी ह्मणेल तर सांगतो. ] " एषह्यात्मात्ह्युद्रतोमानशक्तेः " ( ह्मणजे हा परमात्मा मोजण्याच्या शक्तीच्यापलीकडे आहे ह्मणजे त्यास कोणी मोजूं शकत नाहीं ) ह्या श्रुतींत " स्व " ह्या शब्दाचा पर्याय शब्द " आत्मा " हा आहे, आणि मोजण्याच्या शक्तीबाहेर आहे अशा अर्थाचा " उन्मान " शब्द आहे. ह्याप्रमाणें श्रुतीच्या शेवटीं स्व शब्द व उन्मानत्व असल्यामुळें त्या श्रुतींत परमात्माच घेतला पाहिजे ॥ २३ ॥

## ॐ अविरोधश्चंदनवत् ॐ ॥ २४ ॥

**टीका**—अणोर्देहव्याप्त्ययोगेन तत्र तत्र परिज्ञानायोग इत्यत आह ॥ अविरोध इति ॥ **अविरोधः** अणोरपि जीवस्य सर्वशरीरव्याप्त्यवि-रोधो युज्यते । **चंदनवत्** यथा एकदेशपातितायाहरिचंदनविप्लुषः कटाहादिसर्वव्याप्तत्वं तद्वज्जीवस्यापीति सूत्रार्थः ॥ २४ ॥

**अर्थ**—[ अणुरूप जीव सर्व देह व्यापू शकत नसल्यामुळें देहाच्या निरनिराळ्या ठिकाणीं जीवाचें ज्ञान होणार नाहीं असें कोणी ह्मणेल तर सांगतो. ] जसा चंदनाचा एक कण एका भागांत असला तरी त्याचा वास सर्व ठिकाणीं पसरतो. तसा जीव अणु असूनही सर्व शरीरास व्यापून राहण्यास अडचण नाहीं ॥ २४ ॥

## ॐ अवस्थितिवैशेष्यादिति चेन्नाभ्युपगमाद्धृदि हि ॐ ॥ २५ ॥

**टीका**—उक्तमाक्षिप्याह ॥ अवस्थितीति ॥ **अवस्थितिवैशेष्यात्** चंदनबिंदोरेकदेशे सम्यगवस्थानस्य अन्यत्रासम्यगवस्थानस्य च अनुभवसिद्धत्वेनावस्थितिवैशेष्यात् तद्वत् जीवस्य स्वरूपतदंशाभ्यामवस्थित्यभावात् न शरीरव्याप्तत्वं **इति चेत् न** हृदिह्येषआत्मेतिश्रुत्या हरिचंदनबिंदुवत् जीवस्यापि **हृदि** सम्यगवस्थानं अन्यत्रासम्यगवस्थानतया **अभ्युपगमात्** शरीरव्याप्तत्वसंभवात् हि स्मृतिसूचकः[1] ॥ २५ ॥

**अर्थ**—[ पूर्वीं सांगितलें त्यावर शंका घेऊन सांगतो. ] ज्याप्रमाणें चंदनाचा कण एका भागांत असतो व दुसऱ्या सर्व भागांत नसतो, हें अनुभवसिद्ध आहे, त्याप्रमाणें जीवांचें स्वरूप व त्यांचे अंश हे कोठें असतात ह्याचा अनुभव नसल्यामुळें जीव सर्व शरीर व्यापून राहतात हें ह्मणणें बरोबर नाहीं असें नाहीं, कारण "हृदिह्येषआत्मा" ( ह्मणजे हृदयांत जीव राहतो ) ह्या श्रुतीवरून चंदनाच्या कणाप्रमाणें जीवाचें राहण्याचें स्थान हृदय हा एक भाग असून दुसरे ठिकाणीं त्याचें स्थान नसून त्याची सर्व शरीरांत व्याप्ति आहे असें संभवत आहे ॥ २५ ॥

---

१ असम्यक्सम्यगितिचह्यवस्थाभेदतःसुराः ॥ व्याप्त्यव्याप्तियुतास्त्वन्योचिद्गुणेनैवनान्यथा ॥ चिद्गुणस्यस्वरूपत्वात्तत्व्याप्तिश्चेतियुज्यते ॥ शक्तियोगात्सुराणांतुविविधाचव्यवस्थितिः ॥

...८८७



## ॐ गुणाद्वा लोकवत् ॐ ॥ २६ ॥

**टीका**—सुराणामंशतस्तत्वेप्यनेषां तदभावात्प्रकारांतरेण देहव्याप्ति-माह ॥ गुणादिति ॥ देवानामंशतः शरीरव्याप्तिः। इतरजीवानां गुणत इति। **आलोकवत्** यथा आलोकस्य ज्योतीरूपेण कचिदवस्थानं प्रकाशगुणेन व्याप्तिः। तद्वत् अणोरपि जीवस्य हृदि सम्यगवस्थानं **गुणात्** स्वरूपचिद्गुणेन शरीरव्याप्तिरिति सूत्रार्थः ॥ २६ ॥

**अर्थ**—[ देवांची व्याप्ति त्यांच्या अंशानें असली तरी दुसऱ्यांची तशी व्याप्ति नसल्यामुळें त्यांची व्याप्ति दुसऱ्या प्रकारानें देहांत आहे असें सांगतो. ] देवांची व्याप्ति अंशानें असते, आणि दुसऱ्या जीवांची व्याप्ति गुणानें असते. जशी दिव्याची जोत एक भागीं असून ती प्रकाशरूपानें चोहोंकडे व्यापून राहते, तशी जीवाची राहण्याची जागा हृदयांत असून तो आपल्या चैतन्यगुणानें सर्व शरीरास व्यापून असतो ॥ २६ ॥

## ॐ व्यतिरेको गंधवत्तथा च दर्शयति ॐ॥ २७॥

**टीका**—अत्र ज्ञस्यैकरूपत्वानेकरूपत्वश्रुत्याविरोधउच्यते ॥ व्यतिरेकइति ॥ **गंधवत्** यथा पुष्पाद्गंधः पृथग्गच्छति तद्वत् **व्यतिरेकः** व्यतिरेकेण विभागेन अंशिनं विहाय व्यतिरेकः तदंशः पृथग्गच्छति। **तथा च दर्शयति** अथ एकीभवत्यथबव्हीं भवति। यथा अंशिनं विहाय अंशाः पृथग्गच्छंति तथा प्रतिपादयतीति सूत्रार्थः ॥ २७ ॥ १३ ॥

**अर्थ**—[ ह्या सूत्रांत जीवास एक रूप आहे किंवा अनेक रूपें आहेत, ह्याविषयीं असलेल्या श्रुतीमध्यें विरोध नाहीं असें सांगतो. ] ज्याप्रमाणें फुलापासून वास पृथक् होतो त्याप्रमाणें अंशीला सोडून त्याचे अंश पृथक् होऊन जातात. " अथएकीभवत्यथबव्हीभवति " ( ह्मणजे नंतर जीव एकरूपीं होतो आणि बहुरूपीं होतो ) ह्या श्रुतींत तसें सांगितलें आहे ॥ २७ ॥ १३ ॥

## ॐ पृथगुपदेशात् ॐ ॥ २८ ॥

**टीका**—अत्र जीवेशभेदाभेदश्रुत्याविरोध उच्यते ॥ पृथगिति ॥ **पृथक्** परमात्मनः सकाशात् जीवः पृथगेव । कुतः । **उपदेशात्** भिन्नोऽचिंत्यः परमोजीवसंघादिति प्रतिपादनादिति सूत्रार्थः ॥ २८ ॥

**अर्थ**—[ ह्या सूत्रांत जीव आणि ईश्वर ह्या दोहोंचा भेद व अभेद ह्याविषयीं असलेल्या श्रुतींमध्यें विरोध नाहीं असें सांगतो. ] जीव परमात्म्याहून निराळा आहे. कारण " भिन्नोऽचिंत्यःपरमोजीवसंघात् " ( ह्मणजे जीवसमुदायापासून परमात्मा निराळा अचिंत्य व श्रेष्ठ असा आहे ) ह्या श्रुतींत तसें सांगितलें आहे ॥ २८ ॥

## ॐ तद्गुणसारत्वात्तुतद्व्यपदेशः प्राज्ञवत् ॐ ॥ २९ ॥

**टीका**—एवं तर्ह्यद्वैतश्रुतिर्निर्विषयास्यादित्यत आह ॥ तद्गुणसारत्वादिति ॥ **तद्गुणसारत्वात्** तस्य परमात्मनः गुणाः ज्ञानानंदाद्याः तत्सदृशज्ञानानंदाद्याः सारं स्वरूपं यस्य जीवस्य सः जीवः तद्गुणसारस्तस्य भावस्तत्वं तस्मात् **तद्व्यपदेशः** जीवे तत्वमसीति गौणवृत्या अभेदव्यपदेशः । **प्राज्ञवत्** । यथा सकलजगद्गतगुणसदृशगुणात्मकत्वेन प्राज्ञः परमात्मा सर्वंखल्विदंब्रह्मेतिश्रुतौ गौणवृत्या जगदभिन्नतया व्यपदिश्यते तद्वदिति सूत्रार्थः ॥ २९ ॥ १४ ॥

**अर्थ**—[ असें आहे तर अभेद सांगणाऱ्या श्रुती व्यर्थ होतील असें कोणी ह्मणेल तर सांगतो. ] परमात्म्याचें जें ज्ञान, आनंद इत्यादि गुण आहेत त्यासारखेच ज्ञान, आनंद इत्यादि गुण जीवाचे ठिकाणीं आहेत, ह्मणून गौणरूपानें दोघांचा अभेद आहे असा व्यवहार होतो. ज्याप्रमाणें " सर्वंखल्विदंब्रह्म " ( ह्मणजे हें सर्व जग ब्रह्म आहे ) ह्या श्रुतींत जगांत असलेल्या गुणासारखे गुण प्राज्ञनामक परमेश्वरांत

असल्यामुळें परमात्मा जग आहे असा गौणरूपानें अभेद सांगितला, त्याप्रमाणें परमेश्वराचा जीवाबरोबर अभेद सांगितला आहे ॥२९॥१४॥

## ॐ यावदात्मभावित्वाच्च न दोषस्तद्दर्शनात् ॐ ॥ ३० ॥

टीका — अत्र जीवस्वरूपानुत्पत्तितदुपाध्युत्पत्तिश्रुत्योरुपाध्युत्पत्तौ जीवानुत्पत्त्ययोगादिति प्राप्तविरोधो निरस्यते ॥ यावदिति ॥ **यावदात्मभावित्वात्** आत्मा बिंबभूतः परमात्मा अनाद्यनंततया यावत्तिष्ठति जीवस्यापि तावद्भावित्वात् स्वरूपोपाधेरपि यावद्बिंबभावित्वात् । **दोषः** बिंबोपाधिनाशनिमित्तकजीवस्य उत्पत्तिविनाशरूपदोषः **न तद्दर्शनात् च** [1] तस्य बिंबोपाधिनिमित्तकदोषाभावस्य नित्यः परोनित्योजीवइतिश्रुतिसिद्धत्वादिति सूत्रार्थः ॥ ३० ॥ १९ ॥

**अर्थ**—[ ह्या अधिकरणांत जीवाचे स्वरूपाची उत्पत्ति नाहीं, आणि उपाधीच्या कारणानें त्याची उत्पत्ति होते, अशा दोन श्रुतींवरून उपाधीमुळें उत्पत्ति झाली असून जीवाला उत्पत्ति नाहीं ह्या अर्थाच्या श्रुतीला येणारा विरोध नाहीं असें सांगतो. ] बिंबभूत परमात्मा अनादि अनंत स्वरूपानें जोंपर्यंत आहे तोंपर्यंत जीव आहे. जीवाचा स्वरूपोपाधि हा बिंबरूप परमात्मा आहे तोंपर्यंत असल्या कारणानें उपाधीच्या नाशानें जीवाचा नाश होईल असा दोष येत नाहीं. कारण " नित्यःपरोनित्योजीवः" ( ह्मणजे जीव निराळा व नित्य आहे) ह्या श्रुतींत उपाधीमुळें दोष नाहीं असें सांगितलें आहे ॥३०॥१९॥

## ॐ पुंस्त्वादिवत्त्वस्य सतो ऽभिव्यक्तियोगात् ॐ ॥ ३१ ॥

टीका—अत्र ज्ञस्य सुखादिरूपत्वतदभावश्रुत्यविरोध उच्यते ॥

---

१ चः समुच्चये । आत्मा नित्यः सुखदुःखत्वनित्य इति स्मृतेः समुच्चयः ।

पुंस्त्वादिवदिति ॥ **अस्य** जीवस्य **पुंस्त्वादिवत् तु**[१] यथा बाल्ये विद्यमानमेव पुंस्त्वं यौवने अभिव्यज्यते तद्वत् **सतः** विद्यमानस्यैव ज्ञानानंदादेरुपासनाप्राप्तभगवत्प्रसादलक्षणयोगादुपायात् **अभिव्यक्तियोगात्** मोक्षे अभिव्यज्यते ॥ ३१ ॥

**अर्थ**—[ ह्या सूत्रांत जीवाला सुखादिस्वरूपत्व आहे किंवा त्याचा अभाव आहे ह्या दोन श्रुतींमध्यें विरोध नाहीं असें सांगतो. ] जसें बाल्यावस्थेंत असलेलेंच पुरुषत्व इत्यादि धर्म तारुण्यावस्थेंत प्रकट होतात, तसें जीवामध्यें असलेलेंच ज्ञान, आनंद इत्यादि गुण, उपासनेपासून प्रसन्न झालेल्या परमात्म्याच्या प्रसादापासून मोक्षामध्यें प्रकट होतात ॥ ३१ ॥

## ॐ नित्योपलब्ध्यनुपलब्धिप्रसंगोऽन्यतरनियमोवान्यथा ॐ ॥ ३२ ॥

**टीका**—तथा ऽप्यावरणं नोपेयमित्यत आह ॥ नित्येति ॥ **अन्यथा** जीवानां मोक्षे आवरणनिवृत्त्या तत्तत्स्वरूपाभिव्यक्तिमनंगीकृत्य आवरणमेव नास्तीत्यंगीकारे **नित्योपलब्ध्यनुपलब्धिप्रसंगः** देवपदवाच्यमोक्षयोग्यजीवानां स्वरूपानंदादीनां नित्योपलब्धिः।संसारदशायामपि उपलब्धिप्रसंगः । असुरपदोदिततमोयोग्यानां वृत्तिसुखानुपलब्धिः । संसारदशायामावरणाभावेन वृत्तिसुखानुभवो न स्यात् । स्वरूपदुःखानुभव एव सदा स्यात् । मनुष्यपदोदितानां नित्यसंसारिणां नित्यं **वा अन्यतरनियमः** । सुखदुःखयोरन्यतरस्य सुखस्य सदा प्रतीतिः स्यात् । दुःखप्रतीतिर्नस्यात् । दुःखस्य वा सदा प्रतीतिः स्यात् । सुखप्रतीतिर्न स्यात् । सुखदुःखयोः समतया तत्स्वरूपप्रतीतिः स्यादिति सूत्रार्थः ॥ ३२ ॥ १६ ॥

---

१ तु शब्देन बलमानंदओजश्च सहोज्ञानमनाकुलम् । स्वरूपाण्येवहि जीवस्य व्यज्यंते परमाद्विभोरिति श्रुतिप्रसिद्धिं सूचयति ।

**अर्थ**—[ तथापि आवरण घेण्याची जरूरी नाहीं असें कोणी ह्मणेल तर सांगतो. ] मोक्षाचे वेळेस जीवांचें आवरण नाहींसें होऊन त्यांचें मूळचें स्वरूपप्रकट होतें असें न घेतां आवरणच नाहीं असें मानलें, तर देवपदास योग्य असलेल्या मुमुक्षु जीवांना आपलें स्वरूप आनंदादिकांची प्राप्ति नेहमीं होईल आणि संसारअवस्थेंतही आनंदादिक होतील. दैत्यपदास योग्य असलेल्या व नरकास जाणाऱ्या जीवांना आवरणांत राहून होणाऱ्या सुखाचा अनुभव होणार नाहीं. ह्मणजे संसारांत राहून आवरण नसल्यामुळें विषयसुख होणार नाहीं, तर त्यांना आपलें मूळचें स्वरूप दुःखाचाच अनुभव नेहमीं होईल. मनुष्यपदास योग्य अशा नित्य संसारी जीवांना सुख किंवा दुःख ह्यांपैकीं एकच नेहमीं प्राप्त होईल. ह्मणजे, दुःखच होईल व सुख होणार नाहीं, अथवा सुखच होईल व दुःख होणार नाहीं. सुख व दुःख ह्याविषयीं सारखें असल्यामुळें जीवाच्या स्वरूपाचा अनुभव होईल ॥ ३२ ॥ १६ ॥

## ॐ कर्त्ता शास्त्रार्थवत्वात् ॐ ॥ ३३ ॥

**टीका**—अत्र यत्कर्म कुरुते तदभिसंपद्यते नान्यः कर्तेति जीवकर्तृत्वाकर्तृत्वश्रुत्यविरोध उच्यते ॥ कर्त्तेति ॥ कर्त्ता जीवोऽपि कर्त्ता । जीवस्य कर्तृत्वाभावे विधिनिषेधशास्त्रस्य जडेशयोर्विषयत्वासंभवे न शास्त्रस्य वैयर्थ्यापत्या जीवकर्तृत्वे च अदुःखमितरत्सर्वं जीवा एव तु दुःखिनः तेषां दुःखप्रहाणाय श्रुतिरेषा प्रवर्तत इति श्रुत्युक्तरीत्या **शास्त्रार्थवत्वात्** विधिनिषेधशास्त्रस्य अर्थवत्वादिति सूत्रार्थः ॥ ३३ ॥

**अर्थ**—ह्या सूत्रांत " यत्कर्मकुरुतेतदभिसंपद्यते " ( ह्मणजे जसें कर्म करतो तसें त्याला मिळतें ) आणि " नान्यःकर्ता " ( ह्मणजे दुसरा कर्ता नाहीं तर ईश्वरच कर्ता आहे ) ह्या दोन श्रुतींमध्यें

जीवांचे कर्तृत्व व अकर्तृत्व असा विरोध नाहीं असें सांगतो. ] जीव, हाही कर्त्ता आहे, कारण जीव कर्ता नाहीं असें मानलें तर शास्त्रांत सांगितलेले विधि व निषेध हे व्यर्थ होतील, कारण जड व ईश्वर हीं दोन्हीं विधि आणि निषेध ह्यांचे विषय होऊं शकत नाहींत; आणि जीव कर्ता आहे असें घेतलें तर अदुःखमितरत्सर्वंजीवाएव-तुदुःखिनः तेषांदुःखप्रहाणायश्रुतिरेषाप्रवर्त्तते ( ह्मणजे दुसरे सर्व दुःखरहित आहेत, परंतु जीवच दुःखी आहेत, त्यांचें दुःख नाहींसें करण्यास्तव हा वेद प्रवृत्त झाला आहे ) ह्या श्रुतींत सांगितल्याप्रमाणें सर्व विधि व निषेध शास्त्र सफळ होतें ॥ ३३ ॥

## ॐ विहारोपदेशात् ॐ ॥ ३४ ॥

**टीका**—ज्ञस्याकर्तृत्वे ऽपि काल्पनिककर्तृत्वेन शास्त्रसार्थक्यमस्त्वित्यत आह ॥ विहारोपदेशादिति ॥ **विहारोपदेशात्** स्त्रीभिर्वायानैर्वेति[१] मोक्षे ऽपि विहारकर्तृत्वोपदेशादितिसूत्रार्थः ॥ ३४ ॥

**अर्थ**-- [ जीव कर्ता नसूनही तो कल्पित कर्ता आहे असें घेऊन शास्त्रें सफळ होतील असें कोणी ह्मणेल तर सांगतो. ] " स्त्रीभिर्वा-यानैर्वा " ( ह्मणजे स्त्रियांबरोबर किंवा वाहनाबरोबर ) ह्या श्रुतींत मोक्षांतही जीव क्रीडा करतो असें सांगितलें आहे ॥ ३४ ॥

## ॐ उपादानात् ॐ ॥ ३५ ॥

**टीका**—अस्त्वेवं मुक्तौ संसारे तु काल्पनिकमस्तु कर्तृत्वं तावता शास्त्रसार्थक्यादित्यत आह ॥ उपादानादिति ॥ **उपादानात्** जीवस्य संसारे मोक्षार्थं साधनाद्युपादानादितिसूत्रार्थः ॥ ३५ ॥

**अर्थ**—[ मोक्षांत खरें कर्तृत्व असो, परंतु संसारांत काल्पनिक कर्तृत्व घेतल्यानें शास्त्र सार्थक होईल असें कोणी ह्मणेल तर सांगतो. ] मोक्ष मिळविण्याकरितां जीवाला संसारांत साधनें आहेत ॥ ३५ ॥

---

१ जक्षन्क्रीडन्रममाणःस्त्रीभिर्वायानैर्वेत्यादिश्रुतेः ।

## ॐ व्यपदेशाच्च क्रियायां न चेन्निर्देश-विपर्ययः ॐ ॥ ३६ ॥

टीका—एवं शास्त्रसार्थक्यान्यथानुपपत्या प्रत्यक्षेण च कर्तृत्वं प्रसाध्य श्रुत्याप्याह ॥ व्यपदेशादिति ॥ **क्रियायां** आत्मानमेव लोक-मुपासीतेत्याद्युपासनादिक्रियायांआत्मनःजीवस्य **व्यपदेशात्** उपासनाक-र्तृत्वेन प्रतिपादनात् जीवस्य कर्तृत्वमस्त्येव जीवस्य कर्तृत्वं **न चेत् नि-र्देशविपर्ययः** आत्मानमेवेति निर्देशस्य विपर्ययः आत्मैवलोकमुपासि-तेति निर्देशः स्यादिति सूत्रार्थः ॥ ३६ ॥

अर्थ—[ ह्याप्रमाणें जीव कर्त्ता नाहीं असें मानिलें असतां शास्त्राला सार्थकता येत नाहीं ह्या कारणानें व प्रत्यक्ष प्रमाणानें जीव कर्त्ता आहे असें सिद्ध करून श्रुतीच्या आधारानेंही सांगतो. ] “ आत्मा-नमेवलोकमुपासीत ” ( ह्मणजे ( जीवानें ) परमात्मा हा लोकांचा आश्रय आहे असें जाणून त्याची उपासना करावी ) ह्या श्रुतींत जीवानें उपासना करावी असें सांगितलें असल्यामुळें जीवाला कर्तृत्व आहे, जर जीव कर्त्ता नसता तर ‘ आत्मानं ’ असें न ह्मणतां ‘ आत्मैव ’ असें ह्मटलें असतें ॥ ३६ ॥

## ॐ उपलब्धिवदनियमः ॐ ॥ ३७ ॥

टीका—एवमक्षयुक्तिश्रुतिभ्यो ज्ञः कर्त्ता चेत्कथं नान्यःकर्त्तेति श्रुतिः इतरेति सूत्रे कर्तृत्वनिरासश्चेत्यतः तदाशयमाह ॥ उपलब्धि-वदिति ॥ **उपलब्धिवत्** । यथा इदं वस्तु अहं ज्ञास्यामीत्येवं निरूपिते ऽपि जीवस्य नियमो न स्वेच्छानुसारेण ज्ञानलाभो नास्ति तद्वत् कर्म करिष्यामीति निरूपितेऽपि कर्मण्यपि जीवस्य **अनियमः** नियमाभाव इति सूत्रार्थः ॥ ३७ ॥

अर्थ—[ अशा रीतीनें प्रत्यक्षप्रमाण, युक्ति आणि श्रुती ह्यांवरून

जीव कर्ता असेल, तर " नान्यःकर्त्ता " ( ह्मणजे परमेश्वराशिवाय दुसरा कर्त्ता नाहीं ) ही श्रुति कशी आणि 'इतरपरेति[1]' ह्या सूत्रांत जीवाचें कर्तृत्वाचा निरास कसा ? असें कोणी ह्मणेल तर त्यांचा अभिप्राय सांगतो. ] जसें ही वस्तु मी जाणीन असें सांगितलें तरीही जीव आपल्या इच्छेप्रमाणें नियमानें ती वस्तु जाणत नाहीं, तसें कर्म करीन असें सांगितलें तरीही तो नियमानें कर्म करीत नाहीं ॥ ३७ ॥

## ॐ शक्तिविपर्ययात् ॐ ॥ ३८ ॥

**टीका**—कुतो ज्ञस्यानियमः क्रियादावित्यतो ऽस्वतंत्रत्वादिति भावेनास्वातंत्र्ये हेतुमाह ॥ शक्तिविपर्ययादिति ॥ ईश्वरस्य पूर्णशक्तित्वात् स्वातंत्र्येण नियतकर्त्तृत्वं जीवस्य **शक्तिविपर्ययात्** भगवच्छक्तिविपर्ययाल्पशक्तित्वेनास्वातंत्र्यात्क्रियादिष्वनियतकर्तृत्वमिति सूत्रार्थः ॥ ३८ ॥

**अर्थ**—[ जीवाला कर्म करण्याविषयीं नियम कां नाहीं असें कोणी ह्मणेल तर तो अस्वतंत्र आहे असें सांगण्याच्या उद्देशानें तो अस्वतंत्र असण्याचें कारण सांगतो. ] ईश्वर पूर्ण शक्तिमान् असल्या कारणानें तो स्वतंत्रपणानें नियमानें कार्य करूं शकतो, आणि जीवाला ईश्वराच्या शक्तीच्या उलट अल्पशक्ति असल्यामुळें तो पराधीन असल्या कारणानें नियमानें कर्म करूं शकत नाहीं ॥ ३८ ॥

## ॐ समाध्यभावाच्च ॐ ॥ ३९ ॥

**टीका**—इतश्चास्वातंत्र्यमित्याह ॥ समाधीति ॥ समाधिःसमाधानं अलंबुद्धिः आप्तकामत्वादस्तीश्वरस्यालंबुद्धिः अतस्तस्य स्वातंत्र्यं जीवस्य **समाध्यभावात्** अलंबुद्धेरभावादस्वातंत्र्यमिति सूत्रार्थः ॥ ३९ ॥

**अर्थ**—[ आणखी ह्यापुढें तो कसा स्वतंत्र नाहीं हें सांगतो. ] ईश्वराची इच्छा तृप्त आहे, कारण त्याला जें पाहिजे तें आहे,

---

१ अ० १ पा० ३ सू० १८.

ह्मणून तो स्वतंत्र आहे, आणि जीवाचें मन तृप्त नसल्यामुळें तो स्वतंत्र नाहीं ॥ ३९ ॥

## ॐ यथा च तक्षोभयथा ॐ ॥ ४० ॥

**टीका**—ननु ज्ञस्यास्वतंत्रकर्तृत्वे कथं कर्तेत्युक्तिः स्वतंत्रः खलु कर्तेत्यत आह ॥ यथेति ॥ **यथा च**[1] **तक्षा** राजाधीनतया प्रासादादिकर्त्तापि लोके **उभयथा** राजादिनियुक्तकर्ता स्वयमपि प्रासादादिकर्तेत्युच्यते इति सूत्रार्थः ॥ ४० ॥

**अर्थ**—[ जर अशी शंका येईल कीं, जीवाचें कर्तृत्व पराधीन असल्यास जीव कर्त्ता असें कसें ह्मणतां येईल ? कारण कीं जो स्वतंत्र कर्त्ता असतो त्यालाच कर्त्ता असें ह्मणतात. तर ह्यांचें उत्तर सांगतो. ] जसा राजाच्या कामावरील सुतार त्याच्या आज्ञेनें वाडा इत्यादिं करितो तथापि त्याला राजाच्या आज्ञेनें कर्त्ता व स्वतःही कर्त्ता असें दोन प्रकारें समजतात तसें जीवाविषयीं समजावें ॥ ४० ॥

## ॐ परात्तु तच्छ्रुतेः ॐ ॥ ४१ ॥

**टीका**—किं तक्षवत् ज्ञस्य कर्तृत्वशक्तिः स्वाधीना नेत्याह ॥ परादिति ॥ सा जीवनिष्ठा कर्त्तृत्वशक्तिः **परात् तु**[2] परमात्मनः सकाशादेव भवति । **तच्छ्रुतेः** तस्य भगवदधीनकर्तृत्वस्य कर्तृत्वंकारणत्वं[3] चेतिश्रुत्युक्तत्वादिति सूत्रार्थः ॥ ४१ ॥

**अर्थ**—[ सुताराप्रमाणें जीवाची कर्त्तृत्वशक्ति स्वाधीनची आहे की काय ? तर नाहीं असें सांगतो. ] जीवाची कर्म करण्याची शक्ति परमात्म्यापासूनच आहे, कारण " कर्तृत्वंकारणत्वंच[3] " ( ह्मणजे कर्तृत्व

---

१ दार्ष्टांतिक समुच्चये चशब्दः ।

२ तुशब्दोऽवधारणे ।

३ कर्तृत्वं कारणत्वंच स्वभावश्चेतनाधृतिः यत्प्रसादादिमे संतिनसंतियदुपेक्षयेति पैंगिश्रुतिः ।

शक्ति, कारणत्वशक्ति इत्यादि परमात्म्यापासूनच आहेत ) ह्या श्रुतींत जीवाची कर्तृत्वशक्ति परमात्म्याच्या स्वाधीन आहे असें सांगितलें आहे ॥ ४१ ॥

## ॐ कृतप्रयत्नापेक्षस्तु विहितप्रतिषेधा-वैयर्थ्यादिभ्यः ॐ ॥ ४२ ॥

टीका—एवं तर्हीशस्यैव कर्तृत्वं न ज्ञस्येति पुनः शास्त्रवैयर्थ्यमित्यत आह ॥ कृतप्रयत्नापेक्षइति ॥ **विहितप्रतिषेधावैयर्थ्यादिभ्यः** विहितप्रतिषेधयोः विधिनिषेधशास्त्रयोः अवैयर्थ्यं वैयर्थ्यपरिहारः आदिपदोदितवैषम्यनैर्घृण्येभ्यः येन तद्दोषपरिहारार्थं तु[1] एव **कृतप्रयत्नापेक्षः** जीवकृतानादिकर्मप्रयत्नानादियोग्यतामपेक्षयतीति कृतप्रयत्नापेक्षः ईश्वरः जीवं प्रेरयति फलं च ददातीति जीवशक्तेरीशाधीनत्वे ऽपि न तस्य वैषम्यादिदोष इति सूत्रार्थः ॥ ४२ ॥ १७ ॥

अर्थ—[ असें आहे तर परमेश्वर कर्ता असेल आणि जीव कर्ता नसेल तर पुनः शास्त्र व्यर्थ होतें असें कोणी ह्मणेल तर सांगतो. ] शास्त्रांत सांगितलेले विधि व निषेध ह्यांना व्यर्थपणा न येण्याकरितां आणि परमेश्वराकडे विषमपणा व निर्दयपणा न येण्यास्तव परमेश्वर हा जीवाचें अनादिकर्म प्रयत्न व अनादियोग्यता हीं पाहून त्याप्रमाणें जीवाला प्रेरणा करितो व फळ देतो. ह्मणून जीवशक्ति ईश्वराचे अधीन असली तरी ईश्वराकडे विषमपणा व निर्दयपणा हे दोष येत नाहींत ॥ ४२ ॥ १७ ॥

## ॐ अंशो नानाव्यपदेशादन्यथा चापि दाश-कितवादित्वमधीयत एके ॥ ४३ ॥

टीका—अत्र ज्ञस्येशांशत्वानंशत्वश्रुत्यविरोध उच्यते ॥ अंश

---

१ तुशब्दोऽवधारणे

इति ॥ **अंशः** जीवः परमात्मनः अंशो भवत्येव । कुतः । **नानाव्यपदेशात्** मां रक्षतु विभुर्नित्यमित्यादिस्मृतिश्रुतिवाक्यैः नानाप्रकारेण जीवस्य ईश्वरसंबंधित्वव्यपदेशात् । **एके** शाखिनः **अन्यथा च अपि** भेदव्यपदेशादन्यथा अभेदेन **दाशकितवादित्वं** ब्रह्मदाशा ब्रह्मकितवा इति दाशकितवादित्वं **अधीयते** इति सूत्रार्थः ॥ ४३ ॥

**अर्थ**—[ ह्या सूत्रांत जीव अंश आहे किंवा अंश नाहीं ह्याविषयींच्या श्रुतींमध्यें विरोध नाहीं असें सांगतो. ] जीव हा परमात्म्याचा अंश आहे. कारण " मांरक्षतुविभुर्नित्यं " ( ह्मणजे परमात्मा नित्य माझें रक्षण करो ) इत्यादि श्रुतिस्मृतींवरून नानाप्रकारांनीं जीवांचा ईश्वराशीं संबंध दाखविला आहे. कोणी निराळ्या शाखेचे ऋषी, जीव व ईश्वर ह्यांचा भेद न मानतां अभेद आहे अशा रीतीनें " ब्रह्मदाशाब्रह्म कितवाः " ( ह्मणजे मासे धरणारा ब्रह्म आहे, ठक हा ब्रह्म आहे ) ह्या श्रुतींत असें ह्मणतात ॥ ४३ ॥

## ॐ मंत्रवर्णात् ॐ ॥ ४४ ॥

**टीका**—इतश्चैवमित्याह ॥ मंत्रवर्णादिति ॥ **मंत्रवर्णात्** पादोऽस्य विश्वाभूतानीति मंत्रवर्णे पादशब्देन जीवानामंशताया उक्तत्वादिति सूत्रार्थः ॥ ४४ ॥

**अर्थ**—[ ह्यापुढें असेंच आहे असें सांगतो. ] "पादोऽस्य विश्वाभूतानि " ( ह्मणजे सर्व जग परमात्म्याचा अंश आहे ) ह्या श्रुतींत ' पाद ' शब्दानें जीव हे अंश आहेत असें सांगितलें आहे ॥ ४४ ॥

## ॐ अपि स्मर्यते ॐ ॥ ४५ ॥

---

१ मांरक्षतुविभुर्नित्यंपुत्रोहंपरमात्मनः । अवःपरेणपितरंयोअस्यानुवेद परएनावरेणेत्यादि ।

२ काषायणश्रुतिः । ब्रह्मदाशा ब्रह्मकितवा ब्रह्मैवेमेदाशा इत्यभेदेनाप्येके ऽधीयते ।

**टीका**—इतश्चैवमित्याह ॥ अपीति ॥ **स्मर्यते अपि** ममैवांशोजीव-लोके इति जीवानां भगवदंशत्वस्य स्मृत्युक्तत्वाच्चेति सूत्रार्थः ॥ ४५ ॥

**अर्थ**—[ ह्यापुढें असेंच आहे असें सांगतो. ] " ममैवांशो जीव-लोके " ( ह्मणजे ह्या जीवलोकीं जीव हा माझाच अंश आहे ) ह्या स्मृतींत परमेश्वराचा अंश जीव आहे असें सांगितलें आहे ॥ ४५ ॥

## ॐ प्रकाशादिवन्नैवं परः ॐ ॥ ४६ ॥

**टीका**—ज्ञस्य परांशत्वे मत्स्यादेर्ज्ञस्य च साम्यं स्यादनंशश्रुतिवि-रोधश्चेत्यत आह ॥ प्रकाशादिवदिति ॥ **परः** अंशत्वेऽपि मत्स्यादि-रूपीपरमात्मा **एवं** जीववत् **न प्रकाशादिवत्** यथा तेजोंशस्यैव कालाग्नेः खद्योतस्य च अभिमानिदेवतायाः स्वरूपांशत्वं भिन्नांशत्वं तद्वदित्यर्थः ॥ ४६ ॥

**अर्थ**—[ जीव परमात्म्याचा अंश झाला असतां मत्स्य इत्यादि अवतार व जीव हे दोघे सारखे होतील, व अंश नाहीं असें सांगणा-ऱ्या श्रुतीला विरोध येईल असें कोणी ह्मणेल तर सांगतो. मत्स्य इत्यादि रूपीं परमात्मा अंश असला तथापि तो जीवाप्रमाणें नाहीं. जसा तेजाचा अंश कालाग्नि आहे व काजवाही आहे, तथापि त्या दोघांच्या अभिमानी देवतांच्या क्रमानें पहिला स्वरूपांश आहे व दुसरा भिन्नांश आहे ॥ ४६ ॥

## ॐ स्मरंति च ॐ ॥ ४७ ॥

**टीका**—मत्स्यादेर्जीवस्य चाभिन्नांशत्वं किं न स्यात् दृष्टांतमा-त्रस्यासाधकत्वादत आह ॥ स्मरंतीति ॥ **स्मरंति च** मत्स्यादीनां स्वरूपांशत्वस्य जीवानां भिन्नांशत्वस्य च एते स्वांशकलाः पुंसः कृष्ण स्तु भगवान् स्वयं इत्यादिस्मृतिसिद्धत्वाच्चेति सूत्रार्थः ॥ ४७ ॥

---

१ ममैवांशोजीवलोकेजीवभूतः सनातनः । मनः षष्ठानींद्रियाणिप्रकृतिस्थानि-कर्षति ।

२ तथाचभागवतेदशमस्कंधे । एते स्वांशकलाःपुंसःकृष्णस्तुभगवान्स्वयमिति ।

**अर्थ**—[ मत्स्य इत्यादि अवतार व जीव ह्यांचे अंश एकसारखे कां होऊं नयेत? कारण नुसत्या दृष्टांतानें सिद्ध होत नाहीं, असें कोणी ह्मणेल तर सांगतो. ] " एतेस्वांशकलाःपुंसःकृष्णस्तुभगवान्स्वयम् " ( ह्मणजे हे सर्व मत्स्यादि अवतार परमात्म्याचे अंश आहेत व कृष्ण स्वतः तर भगवान् आहे ) ह्या स्मृतीवरून सिद्ध होतें ॥ ४७ ॥

## ॐ अनुज्ञापरिहारौ देहसंबंधाज्ज्योतिरादिवत् ॐ ॥ ४८ ॥

**टीका**—इतश्चनैवमित्याह ॥ अनुज्ञापरिहाराविति॥ **अनुज्ञापरिहारौ** जीवस्य **देहसंबंधात्** परानुज्ञया प्रवृत्तिः परतोदेहबंधनिवृत्तिश्चेत्यनुज्ञापरिहारौ प्रतीयेते । न मत्स्यादीनां **ज्योतिरादिवत्** यथा ऽऽदित्योवियद्गतः तत्प्रकाशाभिमानी च एकप्रकारःअनुज्ञादिरहितः । न तदंशस्याप्यक्ष्णः। तस्यदेहसंबंधात्तदभिमान्यपभ्रष्टस्य तदधीनप्रवृत्त्यादिमत्वं ॥४८॥

**अर्थ**—[ आणखी ह्यापुढें असें नाहीं असें सांगतो. ] जीवांनां देहांचा संबंध झाल्यामुळें त्यांची प्रवृत्ति परमात्म्याच्या प्रेरणेनें होते, आणि त्यांच्या देहांच्या बंधाचा नाश परमात्म्याच्या प्रेरणेनें होतो. अशी मत्स्य इत्यादि अवतारांची स्थिति नाहीं. ह्यास उदाहरण, आकाशांतील सूर्य आणि त्याच्या प्रकाशाची अभिमानी देवता हीं एक प्रकारची असून त्यांना कोणाची प्रेरणा इत्यादि लागत नाहींत, परंतु त्याच सूर्याचा अंश असलेल्या डोळ्यास तसें नाहीं. कारण त्याला देहाचा संबंध झाल्यामुळें त्या अभिमानी देवतेपासून भ्रष्ट झालेल्या डोळ्याची प्रवृत्ति व निवृत्ति त्या अभिमानी देवतेच्या अधीन आहे ॥ ४८ ॥

## ॐ असंततेश्चाऽव्यतिकरः ॐ ॥ ४९ ॥

**टीका**—इतश्च न साम्यं तयोरित्याह॥ असंततेरिति ॥ **अव्यतिकरः** मत्स्यादीनां स्वरूपांशत्वं जीवानां भिन्नांशत्वमित्युक्तस्य अव्यतिकरः

व्यत्यासाभावः **असंततेः** जीवस्य शक्त्या सम्यक्त्वाभावात् **च** मत्स्यादीनां शक्त्या सम्यक्त्वभावादिति सूत्रार्थः ॥ ४९ ॥

**अर्थ**—[ ह्यापुढें मत्स्यादिक अवतार व जीव हे सारखे नाहींत असें सांगतो. ] मत्स्यादि अवतार हे **स्वरूप** अंश आहेत, व जीव हे निराळे अंश आहेत. कारण जीवाची शक्ति उत्तम नाहीं, व मत्स्यादिक अवतारांना उत्तम शक्ति आहे ॥ ४९ ॥

## ॐ आभास एव च ॐ ॥ ५० ॥

**टीका**—इतश्चैवमित्याह ॥ आभासइति ॥ अंशत्वाविशेषेऽपि जीवः **आभासः एव च** भगवदाभास एव प्रतिबिंबरूप एव जीवानां भगवत्प्रतिबिंबत्वाद्भिन्नांशत्वं । मत्स्यादीनां प्रतिबिंबत्वाभावात्स्वरूपांशत्वमिति सूत्रार्थः ॥ ५० ॥ १८ ॥

**अर्थ**—[ ह्यापुढें असेंच आहे असें सांगतो ] जरी अंशपणा हा धर्म मत्स्यादिक अवतार व जीव ह्यांना सारखा आहे, तरी जीव परमात्म्याचें प्रतिबिंब आहे. जीव परमात्म्याचें प्रतिबिंब असल्यामुळें ते भिन्न अंश आहेत. मत्स्य इत्यादि अवतार प्रतिबिंब नसल्यामुळें ते स्वरूपांश आहेत ॥ ५० ॥ १८ ॥

## ॐ अदृष्टानियमात् ॐ ॥ ५१ ॥

**टीका**—अत्र ह्यस्येशाभासाभासत्वपरयोः रूपं रूपं प्रतिरूपो बभूवेति नैवांशो न संबंध इतिश्रुत्योरविरोध उच्यते ॥ अदृष्टानियमादिति ॥ अशेषजीवानां भगवत्प्रतिबिंबत्वाविशेषेऽपि **अदृष्टानियमात्** अनाद्यविद्याकर्मादिवैचित्र्येण अदृष्टस्य अनियमात् । एकप्रकारत्वाभावात् । देवदानववैचित्र्योपपत्तिरिति सूत्रार्थः ॥ ५१ ॥

**अर्थ**—[ ह्या सूत्रांत जीव हा ईश्वराचें प्रतिबिंब आहे किंवा नाहीं ह्या विषयीं " रूपंरूपं प्रतिरूपोबभूव " ( ह्मणजे प्रत्येक जीव हा

परमात्म्याचें प्रतिबिंब आहे ) आणि " नैवांशोनसंबंधःपरस्य " ( ह्मणजे जीव परमात्म्याचा अंश नाहीं व त्याचा परमात्म्याशीं कांहीं संबंध नाहीं ) ह्या दोन श्रुतींमध्यें विरोध नाहीं असें सांगतों. ] सर्व जीवामध्यें परमात्म्याचें प्रतिबिंबत्व हा धर्म जरी सारखा आहे, तरी अनादि अविद्या, कर्म, इत्यादि विचित्र असल्या कारणानें व ते एक प्रकारचें नसल्यामुळें देव व दैत्य हे विचित्र असणें सयुक्तिक आहे ॥ ५१ ॥

## ॐ अभिसंध्यादिष्वपि चैवं ॐ ॥ ५२ ॥

टीका--रागादिवैचित्र्यादेव प्रतिबिंबवैचित्र्यमस्त्वित्यत आह ॥ अभिसंध्यादिष्विति ॥ अभिसंध्यादिषु अपि इच्छाद्वेषसुखदुःखादिवैचित्र्येष्वपि एवं उक्तप्रकारेण अदृष्टादिवैचित्र्यमेवनिमित्तं च[1] अस्ति॥५२॥

अर्थ--[ राग, लोभ इत्यादिकांच्या विचित्रपणामुळें प्रतिबिंबामध्यें विचित्रपणा आहे असें कोणी ह्मणेल तर सांगतो. ] इच्छा, द्वेष, सुख, दुःख, इत्यादि हे अनेक प्रकारचे असण्यास सुद्धां पूर्वीं सांगितल्याप्रमाणें अविद्या, कर्म, इत्यादि हींच कारण आहेत ॥ ५२ ॥

## ॐ प्रदेशादिति चेन्नांतर्भावात् ॐ ॥ ५३ ॥

टीका --तर्हि स्वर्भूम्यादिस्थानवैचित्र्येणासुरनरवैचित्र्यमस्त्वित्याशंक्याह ॥ प्रदेशादिति ॥ प्रदेशात् स्वर्गभूम्यादिस्थानवैचित्र्यादेव सुरनरादिजनवैचित्र्यमस्तु नादृष्टवैचित्र्यात् इति चेत् न। कुतः। अंतर्भावात् स्थानवैचित्र्ये किं कारणमिति कारणान्वेषणे तत्कारणस्यादृष्टवैचित्र्यएवांतर्भावात् ॥ ५३ ॥ १९ ॥ इति तृतीयः पादः ॥ ३ ॥

अर्थ--[ स्वर्ग, भूमि इत्यादि स्थानें अनेक प्रकारचीं असल्यामुळें दैत्य, मनुष्य, इत्यादि अनेक प्रकार झाले आहेत, अशी शंका घेऊन

---

१ चशब्देन प्रतिक्षणं च वैचित्र्यं गृह्यत इतिसूत्रार्थः ।

समाधान सांगतो. ] स्वर्ग, भूमि इत्यादि स्थानें अनेक प्रकारचीं असल्यामुळेंच देव, मनुष्य, इत्यादि अनेक प्रकार झाले आहेत, आणि त्याला अविद्या इत्यादि अनेक प्रकार कारण नाहींत अशी कोणी शंका करील तर तें बरोबर नाहीं. कारण कीं, स्थानें नानाप्रकारचीं होण्यास काय कारण आहे ह्याविषयीं शोध करूं लागल्यास अविद्या इत्यादिकांचें नानाप्रकार हेच स्वर्ग इत्यादि नानाप्रकाराचें कारण मानणें योग्य आहे ॥ ५३ ॥ १९ ॥ ह्याप्रमाणें तिसरा पाद संपला ॥ ३ ॥

# द्वितीयाध्यायचतुर्थपादप्रतिपाद्यविषयः ।

प्राणाः परमात्मनः सकाशादुत्पद्यंते अनादित्वश्रुतिर्गौणीयतः असंभवोऽस्ति तथा चेत् प्रतिज्ञानुरोधोभवति ( सू. १–३ ) । सर्वेभ्यः प्राक्मनसउत्पत्तिः ( सू ४ ) । मनः पूर्वकत्वाद्वागुत्पत्तिमती ( सू. ५ ) । ज्ञानस्य जनकानि सप्तसंख्याकानींद्रियाणि । हस्तादीनि पंच कर्मेंद्रियाणि ( सू. ६–७ ) । प्राणाः अणव एव ( सू. ८ ) । परमात्मनः मुख्यप्राणस्य जन्म ( सू. ९–१० ) । मुख्यप्राणश्चक्षुरादिवत्परमात्मवशः तस्य अकरणत्वाद्दोषोन ( सू. ११–१२ ) । मनोवत्प्राणोऽपि पंचवृत्तिरस्ति ( सू. १३ ) । मुख्यप्राणः व्याप्तोप्यणुर्विद्यते ( सू. १४ ) । ब्रह्मैव चक्षुरादिभिः करणैर्दर्शयति ( सू. १५ ) । परमात्मैव जीवेनकारयति ( सू. १६ ) । जीवतत्करणसंबंधस्य नित्यत्वं ( सू. १७ ) । मुख्यप्राणस्य अनिंद्रियत्वमन्येषामिंद्रियत्वं च ( सू. १८ ) । मुख्यस्य ईश्वराधीनत्वेन कारयितृत्वमन्येषांतदभावः ( सू. १९–२० ) । नामरूपात्मकप्रपंचकर्ता परमात्मैवास्ति तथैव वेदे प्रतिपादितत्वात् ( सू. २१ ) । शरीरे मांसादिकं यथाशब्दं पार्थिवादिज्ञेयम् विशेषात्तत्तव्द्यवहारः ( सू. २२–२३ ) ॥ इतिचतुर्थःपादः ॥ ४ ॥

# दुसऱ्या अध्यायाच्या चवथ्या पादांतील विषय.

प्राण परमात्म्यापासून उत्पन्न होतात. ते अनादि आहेत अशी श्रुति गौण आहे. कारण त्याचा संभव नाहीं. तसें असेल तरच प्रतिज्ञा सुसंगत होते ( सू. १–३ ). सर्वांपेक्षां पूर्वीं मन उत्पन्न झालें ( सू. ४ ). वाणीचें पूर्वीं मन उत्पन्न झालें ह्मणून वाणीही उत्पन्न होते असें झालें ( सू. ५ ). ज्ञान करून देणारीं सात इंद्रियें आहेत. हात इत्यादिक पांच कर्म करणारीं इंद्रियें आहेत ( सू. ६–७ ). प्राण अणु आहेत ( सू. ८ ). मुख्यप्राण परमात्म्यापासून उत्पन्न होतो ( सू. ९–१० ). चक्षु इत्यादिकांप्रमाणेंच मुख्यप्राणही परमात्म्याच्या स्वाधीन आहे. तो अकरण आहे ह्मणून त्यास दोष नाहीं ( सू. ११–१२ ). मनाप्रमाणें प्राणही पांच प्रकारचा आहे ( सू. १३ ). मुख्य प्राण व्यापक असूनही अणु आहे ( सू. १४ ). परमात्माच चक्षु इत्यादि इंद्रियांकडून आप आपले व्यापार करवितो ( सू. १५ ). परमात्माच जीवाकडून क्रिया करवितो ( सू. १६ ). जीव व त्याचीं कारणें ह्यांचा संबंध नित्य आहे ( सू. १७ ). मुख्यप्राण हा इंद्रिय नसून दुसरे सर्व इंद्रियें आहेत ( सू. १८ ). मुख्यप्राणच ईश्वराच्या आज्ञेनें करवितो तसें दुसरें करवूं शकत नाहींत ( सू. १९–२० ). नामरूपात्मक प्रपंचाचा कर्ता परमात्माच आहे व तसेंच वेदांत सांगितलें आहे ( सू. २१ ). शरीरामध्यें मांस इत्यादिक पृथिवी इत्यादिकांचे विकार असून ते वेदांत सांगितल्याप्रमाणें कमजास्त भागानें आहेत. तथापि जो भाग अधिक असतो त्याचा व्यवहार तसा होतो ( सू. २२–२३ ). ह्याप्रमाणें चवथा पाद संपला ॥ ४ ॥

# चतुर्थःपादः

## ॐ तथा प्राणाः ॐ ॥ १ ॥

**टीका**— यावद्विकारंत्वित्युक्तयुक्त्युपेतया आकाशादेरुत्पत्तिश्रुत्या अनुत्पत्तिश्रुतिर्गौणी चेत्तर्ह्युपादानाभावादियुक्त्युपेतया प्राणाद्यनुत्पत्तिश्रुत्या तदनित्यत्वश्रुतिर्गौणीति शंकां व्युदसितुं अत्र पादे सयुक्तिकश्रुत्यविरोध उच्यते । अत्र नये एतस्माज्जायते प्राण इतींद्रियजन्मश्रुतेः प्राणाएवानादयइति तदजन्मश्रुत्या नोपादानं हींद्रियाणामिति युक्त्युपेतया विरोध उच्यते ॥ तथेति ॥ यथा आकाशादयः परमात्मन उत्पद्यंते **तथा प्राणाः** अपि तत्रोक्तयुक्तिसमुदायादेव परमात्मनः उत्पद्यंते इति सूत्रार्थः ॥ १ ॥

**अर्थ**—[ " यावद्विकारंतुविभागोलोकवत् " ( जें जें अल्पशक्तियुक्त असतें तें तें उत्पन्न झालेलें असतें ) ह्या युक्तीस अनुसरून असलेली जी आकाशोत्पादक श्रुति आहे तिच्या बलानें जर त्याची उत्पत्ति नाहीं असें सांगणारी श्रुति गौण आहे, तर उपादान इत्यादि कारण नसल्यास उत्पत्ति होत नाहीं ह्या युक्तीस अनुसरून असलेली प्राणास उत्पत्ति नाहीं असें सांगणारी जी श्रुति आहे तिच्या योगानें प्राण अनित्य आहेत असें सांगणारी श्रुति गौण होईल, ही शंका दूर करण्याकरितां ह्या पादांत सयुक्तिक श्रुतींचा विरोध येत नाहीं असें सांगतो त्यांत ह्या अधिकरणांत " एतस्माज्जायतेप्राणः " ( ह्मणजे ह्यापासून प्राण उत्पन्न होतो ) ह्या श्रुतींत प्राणाची उत्पत्ति सांगितली आहे. " प्राणाएवानादयः " ( ह्मणजे प्राण हे अनादि

---

१ अ० २ पा० ३ सू० ७।

आहेत ) ह्या श्रुतींत प्राण अनादि आहेत असें सांगितलें आहे. " नोपादानंहींद्रियाणां " ( ह्मणजे इंद्रियांना उपादान कारण नाहीं ) ही सयुक्तिक श्रुति अनादित्व सांगणाऱ्या श्रुतीला अनुसरून आहे. ह्या दोन प्रकारच्या श्रुतींमध्यें विरोध नाहीं असें सांगतो. ] जसें आकाश इत्यादि हीं परमात्म्यापासून उत्पन्न होतात तसे प्राणही परमात्म्यापासून उत्पन्न होतात. त्या श्रुतींमध्यें सांगितलेल्या युक्तींच्या योगानेंच तसें सिद्ध होतें ॥ १ ॥

## ॐ गौण्यसंभवात् ॐ ॥ २ ॥

**टीका**—ननु प्राणा एवेति श्रुतेरिति कथमत आह ॥ गौणीति ॥ प्राणाएवानादयइतिश्रुतिः **गौणी** गौणानादित्वापेक्षया अनुत्पत्तिवादिनी ॥ **असंभवात्** एतस्माज्जायतेप्राणइति श्रुत्या मुख्यानुत्पत्तेरसंभवादिति सूत्रार्थः ॥ २ ॥

**अर्थ**—[ जर अशी शंका येईल कीं " प्राणाएवानादायः " ( ह्मणजे प्राण अनादि आहेत ) ह्या श्रुतीची व्यवस्था काय करावी? तर तिचें समाधान सांगतो. ] " प्राणाएवानादयः " ह्मणजे प्राण हे अनादि आहेत ही श्रुति गौण आहे, कारण "एतस्माज्जायतेप्राणः " ( ह्मणजे ह्यापासून प्राण उत्पन्न होतो ) अशी श्रुति असल्या कारणानें वस्तुतः अनादित्व संभवत नाहीं ॥ २ ॥

## ॐ प्रतिज्ञानुपरोधाच्च ॐ ॥ ३ ॥

**टीका**—इतश्चैवमित्याह ॥ प्रतिज्ञेति ॥ **प्रतिज्ञानुपरोधात्** इदंसर्वमसृजतेतिश्रुत्युक्तप्रतिज्ञानुगुण्यात् **च** प्राणा उत्पद्यंते इत्यंगीकार्यम् ॥ ३ ॥ १ ॥

**अर्थ**—[ ह्यापुढें असेंच आहे असें सांगतो. ] " इदंसर्वमसृजत " ( ह्मणजे हें सर्व जग उत्पन्न केलें ) ह्या श्रुतींत जें सांगितलें तें योग्य होण्याकरितां प्राण उत्पन्न होतात असें ह्मटलें पाहिजे ॥ ३ ॥ १ ॥

## ॐ तत्प्राक्श्रुतेश्च ॐ ॥ ४ ॥

**टीका**—अत्र मनः सर्वेंद्रियाणि च नित्यं मनोऽनादित्वादितित्वनयोर्मनोजन्माजन्मश्रुत्योरविरोधउच्यते ॥ तदिति ॥ **तत्प्राक्श्रुतेः च** मनः सर्वेंद्रियाणि चेति तस्य मनसः प्राक्श्रुतेः पूर्वोत्पन्नत्वप्रतिपादकश्रुतेः ॥ ४ ॥ २ ॥

**अर्थ** [ ह्या अधिकरणांत " मनःसर्वेंद्रियाणिच " ( ह्मणजे मन आणि सर्व इंद्रियें उत्पन्न होतात ) आणि " नित्यंमनोऽनादित्वात् " ( ह्मणजे मन हें नित्य आहे कारण तें अनादि आहे ) ह्या दोन श्रुतींमध्यें विरोध नाहीं असें सांगतो. ] " मनः सर्वेंद्रियाणिच " ह्या श्रुतींत मनाची उत्पत्ति प्रथम झाली आहे असें सांगितलें आहे, ह्मणून मन अनादि नाहीं ॥ ४ ॥

## ॐ तत्पूर्वकत्वाद्वाचः ॐ ॥ ५ ॥

**टीका.**—अत्र वाक्जन्माजन्मश्रुत्यविरोध उच्यते ॥ तदिति ॥ **वाचः** वागिंद्रियस्य **तत्पूर्वकत्वात्** मनःपूर्वरूपं वागुत्तररूपमिति मनःपूर्वकत्वात् तस्य मनसः कारणत्वात् । कारणवतश्च कार्यतानियमाद्वाचो नानुत्पत्तिरिति सूत्रार्थः ॥ ५ ॥ ३ ॥

**अर्थ.**—[ ह्या अधिकरणांत वागिंद्रियाला उत्पत्ति आहे किंवा नाहीं ह्याविषयीं असलेल्या श्रुतींमध्यें विरोध नाहीं असें सांगतो. ] " मनःपूर्वरूपंवागुत्तररूपं " ( ह्मणजे मन हें पूर्वस्वरूप आहे आणि वागिंद्रिय हें उत्तर रूप आहे ) ह्या श्रुतींत मन हे कारण असून वागिंद्रिय हें कार्य आहे, आणि ज्यास कारण असतें तें कार्य असलेंच पाहिजे असा नियम आहे, ह्मणून वागिंद्रियाला उत्पत्ति नाहीं असें नाहीं ॥ ५ ॥ ३ ॥

---

१ चशब्देन अनुत्पत्तिवचनमल्पोपचयापेक्षया उक्तमितिवावायुप्रोक्तवचनं संगृहीतमिति ।

## ॐ सप्तगतेर्विशेषितत्वाच्च ॐ ॥ ६ ॥

**टीका**—अत्र प्राणसंख्याश्रुत्यविरोध उच्यते ॥ सप्तेति ॥ प्राणइंद्रियाणि **सप्त** सप्तसंख्याकानि । द्वादशेंद्रियेषु **गतेः** ज्ञानेंद्रियस्य सप्तेति **विशेषितत्वात् च**[1] इति सूत्रार्थः ॥ ६ ॥

**अर्थ**—[ ह्या सूत्रांत प्राणांच्या संख्येविषयीं ज्या श्रुती आहेत त्यांत विरोध नाहीं असें सांगतो. ] इंद्रियें सात आहेत; कारण बारा इंद्रियांपैकीं ज्ञानेंद्रियांना सात असें विशेषण दिलें आहे ॥ ६ ॥

## ॐ हस्तादयस्तु स्थितेऽतो नैवम् ॐ ॥ ७ ॥

**टीका**—ननु सप्तभ्यो ऽन्येषां प्राणानां सप्तसप्तेतिश्रुतौ[2] तैःसह पाठः स्यादित्यत आह ॥ हस्तादय इति ॥ **हस्तादयः तु** हस्तपादपायुगुह्यवाचस्तु **स्थिते**[3] संसारस्थितिनिमित्तत्वात् कर्मेंद्रियाणि स्थितिशब्दवाच्यानि । **अतः** संसारात् उद्गतिहेतुत्वेन ज्ञानेंद्रियाणि गतिशब्दवाच्यानि । **एवं** विशेषात् **न** ज्ञानेंद्रियैः सह पाठोनेति सूत्रार्थः ॥ ७ ॥ ४ ॥

**अर्थ**—[ जर अशी शंका येईल कीं, सात ज्ञानेंद्रियांशिवाय दुसरे पाच प्राण " सप्तसप्त " ( ह्मणजे सात सात आहेत ) ह्या श्रुतींत सांगितलेल्या सात ज्ञानेंद्रियाबरोबर सांगितलें आहेत, असें कोणी ह्मणेल तर सांगतो. ] हात, पाय, पायु, गुह्येंद्रिय, वाचा, हीं पांच इंद्रियें संसारांतील कर्में करण्यासाठीं आहेत, ह्मणून ह्यांस कर्मेंद्रियें ह्मणतात. ह्याशिवाय संसारांतून मुक्त होण्यासाठीं सात ज्ञानेंद्रियें आहेत, असा दोहोंमध्यें विशेष असल्यामुळें ज्ञानेंद्रियांबरोबर कर्मेंद्रियें सांगितलीं आहेत असें होत नाहीं ॥ ७ ॥ ४ ॥

---

१ चशब्देन सप्तप्राणास्त्ववगतेः पंचप्राणाश्च कर्मण इतिवचनं संगृहीतं ।

२ गुहाशयां निहिताः सप्तसप्तेति श्रुतेः ।

३ स्थिते इति निमित्तसप्तमी ।

## ॐ अणवश्च ॐ ॥ ८ ॥

**टीका**—अत्र प्राणाणुत्वानणुत्वश्रुत्यविरोध उच्यते ॥ अणव इति ॥ अणवः **च** प्राणा अणव एव तद्यथा अणुश्चक्षुषः इतिश्रुत्यादिसिद्धत्वादिति सूत्रार्थः ॥ ८ ॥ ९ ॥

**अर्थ**—[ ह्या अधिकरणांत प्राण अणु आहेत किंवा अणु नाहींत ह्याविषयीं असलेल्या श्रुतीमध्यें विरोध नाहीं असें सांगतो. ] प्राण अणु च आहेत. " तद्यथाअणुनश्चक्षसः " ( ह्मणजे जसा अणु डोळ्याचा प्रकाश व्याप्त आहे ) ह्या श्रुतींत तसें सांगितलें आहे ह्मणून तसें सिद्ध आहे ॥ ८ ॥ ९ ॥

## ॐ श्रेष्ठश्च ॐ ॥ ९ ॥

**टीका**—अत्र मुख्यप्राणजन्माजन्मश्रुत्याविरोध उच्यते ॥ श्रेष्ठ इति ॥ यथेतरेप्राणा उत्पद्यंते एवं **श्रेष्ठः च** श्रेष्ठोऽपि मुख्यप्राणोऽपि परमात्मनः सकाशादुत्पद्यते[२] नत्वनुत्पत्तिमानित्यर्थः ॥ ९ ॥

**अर्थ**—[ ह्या सूत्रांत मुख्यप्राणास जन्म आहे व जन्म नाहीं ह्याविषयीं ज्या श्रुतीं आहेत त्यामध्यें विरोध नाहीं असें सांगतो. ] जसें दुसरे प्राण उत्पन्न होतात तसाच मुख्यप्राणही परमात्म्यापासून उत्पन्न होतो. त्याला उत्पत्ति नाहीं असें नाहीं ॥ ९ ॥

## ॐ न वायुक्रिये पृथगुपदेशात् ॐ ॥ १० ॥

**टीका**—प्राणजन्मश्रुतिश्रेष्ठादिपरा किं न स्यादित्यत आह ॥ नेति ॥ **वायुक्रिये** चेष्टायां बाह्यवायौ च प्राणशब्दस्य प्रवृत्युक्तेः प्राणोत्पत्तिश्रुतिः चेष्टाप्राणयोरुत्पत्तिवादिनी स्यादिति **न** उपपद्यते। **पृथ-**

---

१ तद्यथाह्यणुनश्चक्षसःप्रकाशोव्याततएवमेवास्यपुरुषस्यप्रकाशोव्यततोऽणुर्ह्यैवैष पुरुषोमवतीतिशांडिल्यश्रुतिः ।

२ आत्मतएषप्राणोजायतइतिश्रुतेः ।

गुपदेशात् सप्राणमसृजतेति प्राणोत्पत्तिमुक्त्वा खंवायुरित्यादिना वायुकर्मणोः सृष्टौ पृथगुक्तत्वादिति सूत्रार्थः ॥ १० ॥ ६ ॥

**अर्थ**—[ प्राण उत्पन्न होतो ह्याविषयींची श्रुति, वायूच्या व्यापारास का लावूं नये ह्या शंकेचें समाधान सांगतो. ] व्यापार करणें व बाहेरील वायु ह्या दोहोंनांही प्राण शब्द लागतो. ह्मणून प्राणाच्या उत्पत्तिविषयींची श्रुति ह्या दोहोंसही लागेल असें ह्मणणें सयुक्तिक नाहीं; कारण " सप्राणमसृजत " ( ह्मणजे त्यानें प्राण उत्पन्न केला ) ह्या श्रुतीनें प्राणाची उत्पत्ति सांगून " खंवायुर्ज्योति " ( ह्मणजे आकाश, वायू, ज्योति उत्पन्न केले ) ह्या श्रुतींत वायु व त्याचा व्यापार ह्याविषयीं निराळे सांगितलें आहे ॥ १० ॥ ६ ॥

## ॐ चक्षुरादिवत्तु तत्सहशिष्ट्यादिभ्यः ॐ ॥११॥

**टीका**–अत्र श्रेष्ठस्वातंत्र्यास्वातंत्र्यश्रुत्यविरोध उच्यते ॥ चक्षुरिति ॥ **चक्षुरादिवत् तु** चक्षुरादींद्रियवदेव मुख्यप्राणः परमात्माधीनएव । नतु स्वतंत्रः। **तत्सहशिष्ट्यादिभ्यः** सर्वंह्येतत्परमेअवतिष्ठतइतिश्रुत्या चक्षुरादिवदेव सर्वात्मना चक्षुरादिभिःसहपरमात्मवशत्वप्रतिपादनात् ॥ ११ ॥

**अर्थ**—[ ह्या सूत्रांत मुख्यप्राणाचा स्वतंत्रपणा आहे किंवा अस्वतंत्रपणा आहे ह्याविषयीं ज्या श्रुतीं आहेत त्यामध्यें विरोध नाहीं असें सांगतो. ] चक्षुरादि इंद्रियांप्रमाणें मुख्यप्राणही परमात्म्याच्या अधीन आहे, स्वतंत्र नाहीं; कारण " सर्वंह्येवैतत्परमेऽवतिष्ठते " ( ह्मणजे हें सर्व परमात्म्याच्या आज्ञेंत राहते. ) ह्या श्रुतींत चक्षुरादि इंद्रियांप्रमाणें मुख्यप्राणही परमात्म्याच्या अधीन आहे असें सांगितलें आहे ॥ ११ ॥

---

१ आदिपदेनसर्वंकर्तापिसन्प्राणइत्यादिवचनंयुक्तयश्चसूचिताः ।

# ॐअकरणत्वाच्च न दोषस्तथा हि दर्शयति ॐ॥ १२॥

**टीका**—श्रेष्ठस्येशायत्तत्वं चक्षुरादिवदवांतरेश्वरत्वं च न स्यादित्यत आह ॥ अकरणत्वादिति ॥ मुख्यप्राणस्य चक्षुरादीनां च ईशवशत्वसाम्येऽपि चक्षुरादीनां कर्तृप्रयोज्यत्वरूपकरणत्वात् मुख्यप्राणस्य **अकरणत्वात्** कर्तृप्रयोज्यत्वाभावेन **न दोषः**। द्वयोरीश्वराधीनत्वेऽपि करणत्वाकरणत्ववैलक्षण्येन अतिशयोपपत्तेः। अवांतरेशत्वसंभवेन स्वातंत्र्यश्रुतिवैयर्थ्यदोषो न। **हि तथा दर्शयति** तानि ह वा एतानि इतिश्रुतिः यथा न दोषस्तथा प्रतिपादयतीति सूत्रार्थः ॥ १२ ॥ ७ ॥

**अर्थ**—[ मुख्यप्राण हा चक्षुरादिकांप्रमाणें परमात्म्याच्या अधीन आहे आणि परमेश्वराशिवाय बाकीच्यांचा स्वामी आहे असे होणार नाहीं अशी शंका येईल तर सांगतो. ] मुख्यप्राण आणि चक्षुरादि इंद्रियें हीं दोन्हीं परमेश्वराच्या अधीन असल्यामुळें स्वाधीनपणा ह्या धर्मानें ते दोघे सारखे आहेत, तथापि चक्षुरादिक ह्यांची योजना करण्याला कर्त्ता लागत असल्यामुळें ते करण आहेत, आणि मुख्यप्राणाची योजना करण्याला कर्त्ता लागत नसल्यामुळें तो करण नाहीं, ह्मणून कांहीं दोष नाहीं. कारण मुख्यप्राण व चुक्षुरादिक इंद्रियें हे परमेश्वराच्या अधीन आहेत, तथापि इतर इंद्रियें करण असल्यामुळें व मुख्यप्राण करण नसल्यामुळें तो श्रेष्ठ असणें योग्य आहे. मुख्यप्राण हा परमात्म्याशिवाय इतरांचा स्वामी असल्यामुळें तो स्वतंत्र आहे असें सांगणाऱ्या श्रुतीस बाध येत नाहीं. "तानिहवाएतानि" ( ह्मणजे तीं हीं सर्व इंद्रियें करण आहेत ) ह्या श्रुतींत तसें सांगितलें आहे ॥ १२ ॥ ७ ॥

---

१ तानि ह वा एतानि सर्वाणि करणान्यथ प्राण एवाकरणस्तस्मान्मुख्यस्तस्मान्मुख्य इत्याचक्षत इति मांडव्यश्रुतिः।

## ॐ पंचवृत्तिर्मनोवत् व्यपदिश्यते ॐ ॥ १३ ॥

**टीका**—अथ प्राणापानादेः श्रेष्ठस्वरूपत्वतद्दासत्वश्रुत्यविरोध उच्यते ॥ पंचवृत्तिरिति ॥ **मनोवत्**[1] यथा मनसः मनोबुध्यहंकाराचित्त-चेतनाख्यपंचप्रकारोपेतत्वं तथा प्राणापानादिदासपंचकयुक्तोऽपि मुख्य-प्राणः **पंचवृत्तिः** प्राणादिपंचवृत्तिवान् **व्यपदिश्यते** ॥ १३ ॥ ८ ॥

**अर्थ**—[ आतां प्राण, अपान इत्यादि हे मुख्यप्राणाचीं रूपें आहेत व ते त्याचे चाकर आहेत ह्याविषयीं ज्या श्रुतीं आहेत त्यांमध्यें विरोध नाहीं असें सांगतो. ] जसें मन, बुद्धि, अहंकार, चित्त व चेतन असे मनाचे पांच प्रकार आहेत, तसें प्राण अपान इत्यादि हे मुख्यप्राणाचे पांच चाकर असले, तथापि ते त्याचीं पांच स्वरूपें आहेत असें समजावें ॥ १३ ॥ ८ ॥

## ॐ अणुश्च ॐ ॥ १४ ॥

**टीका**—अत्र श्रेष्ठस्याणुत्वानणुत्वश्रुत्यविरोध उच्यते ॥ अणुरिति ॥ सवाएष[2]इतिश्रुत्या अष्टौ प्राणाः बहिर्वर्तमानमुख्यवायुरूपेण व्याप्तोऽपि **अणुः च** अणुरप्यस्तीति सूत्रार्थः ॥ १४ ॥ ९ ॥

**अर्थ**—[ ह्या अधिकरणांत मुख्यप्राण अणु आहे किंवा नाहीं ह्याविषयीं ज्या श्रुती आहेत त्यांमध्यें विरोध नाहीं असें सांगतो. ] " सवाएषः " ( ह्मणजे तो हा मुख्यप्राण अणु आहे ) ह्या श्रुतीनें, आठ प्राण हे बाहेर असलेल्या मुख्य वायूच्या रूपानें व्याप्त असून मुख्यप्राण अणु ही आहे ॥ १४ ॥ ९ ॥

---

१ यथा इ वै मन पंचधा व्यपादिश्यते । मनोबुद्धिरहंकारश्चित्तंचेतनेति तेभ्यो वा एतेभ्यःपंचदासाप्रजायंते । मनसो वाव मनोबुद्धेर्बुद्धिरहंकारादहंकारश्चित्ताश्चित्तं चेतनाया एव चेतनैवमिति ।

२ स वा एष प्राणो ऽणुर्महान्नामांतर्वा अणुर्बहिर्महान् प्राणो वा ईशितव्ये-शईशोह्यसौ सर्वस्येशितव्यश्च परस्येति कौंडिन्यश्रुतिः ।

## ॐ ज्योतिराद्यधिष्ठानं तु तदामननात् ॐ ॥ १५॥

**टीका**—अत्र चक्षुरादेर्जीवेशकरणश्रुत्यविरोध उच्यते ॥ ज्योतिरिति ॥ **ज्योतिराद्यधिष्ठानं तु** ब्रह्मैव ज्योतिराद्यधिष्ठानं ब्रह्मैव चक्षुरादिभिः करणैर्दर्शनादिकारयति[1] **तदामननात्** यःप्राणेतिष्ठनूइत्यादिना तत्प्रतिपादनादिति सूत्रार्थः ॥ १९ ॥

**अर्थ**—[ह्या सूत्रांत चक्षुरादिक इंद्रियें हीं जीवाचे व परमात्म्याचे करण आहेत ह्याविषयी श्रुतीमध्यें विरोध नाहीं असें सांगतो ] ज्योति इत्यादिकांचे ठिकाणीं असलेला परमात्मा हाच चक्षुरादिसाधनांच्या द्वारानें जीवांकडून पाहाणें इत्यादि व्यापार करवितो. कारण " यःप्राणेतिष्ठन् " ( ह्मणजे जो प्राणामध्यें राहून ) ह्या श्रुतींत तसें सांगितलें आहे ॥ १९ ॥

## ॐप्राणवता शब्दात् ॐ ॥ १६ ॥

**टीका**—नन्वेवंजीवस्यकरणान्याहुरितिश्रुतिः कथमित्यतआह ॥ प्राणवतेति ॥ ब्रम्हैव स्वकरणैः **प्राणवता** प्राणाः इंद्रियाणि संत्यस्येति प्राणवान् जिवः तेन चक्षुरादिना दर्शनादि कारयति । **शब्दात्** एषह्येतेनात्मनाचक्षुषादर्शयतीति श्रुतेरिति सूत्रार्थः ॥ १६ ॥

**अर्थ**— [ जर कोणी असे ह्मणेल कीं " जीवस्यकरणान्याहुः " ( ह्मणजे जीवाचीं साधनें चक्षुरादिक आहेत असें ह्मणतात ) ह्या श्रुतीची वाट काय? तर त्या शंकेचें समाधान सांगतो. ] परमात्मा हाच ज्यास इंद्रियें हीं साधनें आहेत त्याकडून ह्मणजे जीवाकडून चक्षुरादिकांच्या द्वारानें पहाणें इत्यादि व्यापार करवितो. कारण " एषह्येतेनात्मनाचक्षुषादर्शयति " ( ह्मणजे परमात्मा ह्या जीवाकडून डोळ्याच्या

---

१ एषह्यनेनात्मना कारयति चक्षुषा दर्शयति श्रोत्रेण श्रावयति मनसा मनयति बुध्या बोधयति तस्मादेतावाहुः स्वतिरस्वतिरितीतिभाल्लवेयश्रुतिः ।

द्वारानें पाहण्याचा व्यापार करवितो ) ह्या श्रुतींत तसें सांगितलें आहे ॥ १६ ॥

## ॐ तस्य च नित्यत्वात् ॐ ॥ १७ ॥

**टीका**—श्रुतेरर्थांतरमाह ॥ तस्येति ॥ प्राणानां ब्रह्मकरणत्वेऽपि जीवकरणत्वश्रुतिर्युज्यते ॥ **तस्य च**[1] जीवतत्करणतत्संबंधस्य च **नित्यत्वात्** बहुकालीनत्वात् बहुकालसंबंधेन तदीयव्यवहारदर्शनादिति सूत्रार्थः ॥१७॥ १० ॥

**अर्थ**—[ श्रुतीचा दुसरा अर्थ सांगतो. ] इंद्रियें परमात्म्याचीं करणें आहेत, तथापि तीं जीवाचीं करणें आहेत असे सांगणारी श्रुति सयुक्तिक आहे. कारण जीव, त्याचीं करणें व त्यांचा संबंध नित्य ह्मणजे फार दिवसापासून चालत आला आहे असा व्यवहार आढळतो ॥ १७ ॥ १० ॥

## ॐ तइंद्रियाणि तद्व्यपदेशादन्यत्र-श्रेष्ठात् ॐ ॥ १८ ॥

**टीका**—अत्र श्रेष्ठस्येंद्रियत्वानिंद्रियत्वश्रुत्याविरोधउच्यते ॥तइति॥ ते प्राणाः द्वादशैव **इंद्रियाणि** । **श्रेष्ठात्** मुख्यप्राणात् **अन्यत्र** मुख्यप्राणमृतेऽन्यत्रचक्षुरादौ इंद्रियत्वं मुख्यप्राणस्य अनिंद्रियत्वं।**तद्व्यपदेशात्**[2] तेषां चक्षुरादीनां विशेषप्रतिपादकद्वादशैवेंद्रियाण्याहुरिति श्रुतेरिति सूत्रार्थः ॥ १८ ॥

**अर्थ**—[ ह्या सूत्रांत मुख्यप्राण हा इंद्रिय आहे किंवा नाहीं ह्याविषयीं ज्या श्रुती आहेत त्यांमध्यें विरोध नाहीं असें सांगतो. ] इंद्रिये

---

१ चशब्दः जीवकरणतत्संबंधग्राही ।

२ द्वादशैवेंद्रियाण्याहुः प्राणोमुख्यस्त्वनिंद्रियं । द्रवतानिंद्रियाणां हि नियंता प्राणएकराडिति पौत्रायणश्रुतिः ।

बाराच आहेत. कारण, मुख्यप्राणावाचून बाकींचे चक्षुरादिकहीं इंद्रियें आहेत, आणि मुख्यप्राण हा इंद्रिय नाहीं. कारण " द्वादशैवेंद्रियाण्याहुः " ( ह्मणजे इंद्रिये बाराच आहेत असें ह्मणतात ) ह्या श्रुतींत तसें प्रतिपादन केलें आहे ॥ १८ ॥

## ॐ भेदश्रुतेः ॐ ॥ १९ ॥

**टीका**—एवं श्रेष्ठोऽनिंद्रियं चेच्चक्षुरादेरपि तन्नस्यादीशवशत्वाविशेषादित्यत आह ॥ भेदश्रुतेरिति ॥ **भेदश्रुतेः** मुख्यप्राणस्य सर्वकर्तुरीश्वराधीनतया कारयितृत्वेन अन्येंद्रियाणां तदभावलक्षणभेदप्रतिपादकस्थितंएवहीदंमुख्यप्राणःकरोतीतिश्रुतेरितिसूत्रार्थः ॥ १९ ॥

**अर्थ**–[जर अशा रीतीनें मुख्यप्राण हा इंद्रिय नसेळ, तर चक्षु इत्यादि हीं इंद्रिये होणार नाहींत. कारण, तीं दोन्हीही परमात्म्याचे अधीन असल्यामुळें कांहीं विशेष नाहीं, असें कोणी ह्मणेळ तर सांगतो ] मुख्यप्राण हा, सर्व कर्ता अशा परमात्म्याच्या अधीन असल्यामुळें तो करविणारा आहे आणि दुसरीं इंद्रियें करविणारीं नसल्यामुळें त्या दोघांमध्यें भेद आहे. कारण " स्थितएवेदंमुख्यप्राणःकरोति " ( म्हणजे तेथें राहून मुख्यप्राणच हें करवितो ) ह्या श्रुतींत तसें सांगितलें आहे ॥ १९ ॥

## ॐ वैलक्षण्याच्च ॐ ॥ २० ॥

**टीका**—प्राणानां श्रेष्ठस्य च केवलश्रुत्याभेदमुक्त्वा प्रत्यक्षश्रुतिभ्यां तमाह ॥ वैलक्षण्यादिति ॥ **वैलक्षण्यात् च** इंद्रियाणामीशाधीन-

---

१ स्थितएवहीदं मुख्यप्राणः करोति कारयति बलति बालयति धत्ते धारयति प्रभुंवा एनमाहुरथेंद्रियाणि न स्थितानि न कुर्वंति न कारयंति न बलंति न बालयंति न धत्तें न धारयति तानि ह वा एतान्यबलानि तस्मादाहुरिंद्रियाणि करणानीति पैत्रायणश्रुतिः ।

त्वे ऽपि जीवप्रयत्नापेक्षया जाग्रदवस्थायामेव प्रवृत्तिः। मुख्यप्राणस्य तु जीवप्रयत्नापेक्षां विना सुप्त्यवस्थायामपि केवलेशेच्छाधीनतयैव प्रवृत्तिरिति वैलक्षण्यादिति सूत्रार्थः ॥ २० ॥ ११ ॥

**अर्थ**—[ नुसत्या श्रुतीवरून मुख्यप्राण व दुसरीं इंद्रियें भिन्न आहेत असें सांगून प्रत्यक्ष प्रमाण व श्रुतिप्रमाण ह्यांनीं ते भिन्न आहेत असें सांगतों. ] इंद्रियें परमात्म्याच्या अधीन असलीं तरी त्यांना जीवाच्या प्रयत्नाची अपेक्षा असल्यामुळें जागृत अवस्थेमध्येंच तो जीवाला प्रवृत्ति करतो, आणि मुख्यप्राण हा केवळ परमात्म्याच्या इच्छेच्या अधीन असल्यामुळेंच जीवाच्या प्रयत्नांवाचून गाढ झोंपेंतसुद्धां प्रवृत्ति करतो हा विलक्षण विशेष आहे ॥ २१ ॥ ११ ॥

## ॐ संज्ञामूर्तिक्लृप्तिस्तु त्रिवृत्कुर्वत उपदेशात् ॐ ॥ २१ ॥

**टीका**—अत्र नामरूपयोर्विरिंचेशसृष्टत्वश्रुत्यविरोध उच्यते ॥ संज्ञेति ॥ **संज्ञामूर्तिक्लृप्तिः** नामरूपात्मकदेहादिप्रपंचस्य क्लृप्तिः उत्पत्तिः। **त्रिवृत्कुर्वतः** त्रिवृत्करणकुर्वतः परमात्मनएव भवति । कुतः। **उपदेशात्** सर्वाणि रूपाणि विचित्य धीराः नामानिकृत्वेतिपुरुषसूक्तमंत्रोक्तत्वादित्यर्थः ॥ २१ ॥ १२ ॥

**अर्थ**— [ ह्या सूत्रांत नाम व रूप ह्यांनीं उत्पन्न करणारा ब्रह्मदेव आहे किंवा परमात्मा आहे अशा विषयीं असलेल्या श्रुतींचा विरोध नाहीं असें सांगतो. ] नामरूपात्मक देह इत्यादि प्रपंचाची उत्पत्ति, पृथिवी, आप, आणि तेज ह्यांचे मिश्रण करणाऱ्या परमात्म्यापासूनच आहे. कारण, " सर्वाणिरूपाणि विचित्यधीरानामानिकृत्वा "

---

१ प्राणाग्नयएवैतस्मिन्पुरेजाग्रतीतिचश्रुतेः ।

२ तासांत्रिवृतंत्रिवृतमेकैकामकरोदित्यादिश्रुतेः ।

( म्हणजे परमात्मा सर्व नामें व रूपें विचार करून उत्पन्न करतो ) असें पुरुषसूक्तांतील मंत्रांत सांगितलें आहे ॥ २१ ॥ १२ ॥

## ॐ मांसादिभौमं यथा शब्दमितरयोश्च ॐ ॥२२॥

**टीका**—अत्र प्रस्तुतदेहकारणश्रुत्यविरोध उच्यते ॥ मांसादीति ॥ **मांसादिभौमं**[1] शरीरे यत्कठिणं मांसादितद्भौमं पार्थिवं ॥ **इतरयोः च** अप्तेजसोः कार्यं । **यथा शब्दं** श्रुतिः यथा वक्ति तथा ऽवगंतव्यमिति सूत्रार्थः ॥ २२ ॥

**अर्थ**—[ ह्या सूत्रांत चालू असलेल्या देहाला कारण सांगणाऱ्या श्रुतीमध्यें असलेला विरोध नाहीं असें सांगतो. ] शरीरामध्यें जो कठिण भाग आहे, तो पृथिवीचा भाग आहे, दुसरे जे पाणी आणि तेज आहे त्यापासून शरीररूप कार्य झालें. त्यामध्यें श्रुतींत सांगितल्याप्रमाणें पाण्याचा व तेजाचा भाग आहे असें जाणावें ॥ २२ ॥

## ॐ वैशेष्यात्तु तद्वादस्तद्वादः ॐ ॥ २३ ॥

**टीका**—कथं तर्हि विशिष्याप्यत्वाद्युक्तिरत आह । वैशेष्यादिति । शरीरस्य पांचभौतिकत्वेऽपि । **वैशेष्यात्**[2] । पार्थिवानां शरीराणामित्युक्तप्रकारेण पार्थिवशरीरे अविभागेषु अर्धं पृथ्वी इतरे अर्धे चतुर्भागे त्रिभागः आप्यः एकोभागः तैजसः एवं पृथिव्यादिभूतानां विशेषयोगात् **तद्वादः**[3] **तद्वादः** पार्थिवशरीरत्वादिव्यवहार इति सूत्रार्थः ॥ २३ ॥ १३ ॥ इति चतुर्थः पादः ॥ ४ ॥ इति द्वितीयोध्यायः ॥ २ ॥

---

१ यत्काठिणं सा पृथिवी यद्द्रवं तदापो यदुष्णं तत्तेज इतिश्रुतेः ।

२ पार्थिवानां शरीराणामर्धेव पृथिवीस्मृता । इतरेर्धे त्रिभागिन्यः आपस्तेजस्तुभागतः । इति सामान्यतोज्ञेयं भेदश्च प्रतिपूरुषं । स्वर्गस्थानां शरीराणामर्धेतेज उदाहृतमिति बृहत्संहितायां ।

३ एतदध्यायोक्तसर्वस्यार्थस्यावधारणार्थमध्यायांते द्विरुक्तिः ।

**अर्थ**— [ असें आहे तर विशेषकरून पाण्याचा भाग आहे असें कां म्हटलें तर ह्या शंकेचें समाधान सांगतो. ] हें शरीर पृथिवी, आप, तेज, वायु, आकाश ह्या पांच भूतांनीं झालें आहे, तथापि विशेषेंकरून " पार्थिवानांशरीराणां " ( ह्मणजे पार्थिव शरीरामध्यें अर्धा भाग पृथिवीचा व अर्ध्या भागांत तीन भाग पाण्याचे व एक भाग तेजाचा आहे. अशा रीतीनें पृथिवी इत्यादि भूतांच्या विशेष योगानें त्या त्या भूताच्या नांवानें व्यवहार होतो ॥ २३ ॥ १३ ॥ अशा रीतीनें चवथा पाद संपला ॥ ४ ॥ ह्याप्रमाणें दुसरा अध्याय संपळा ॥ २ ॥

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ ब नारायण
दा. नों:

४३७ ब नीरायण
दा. नों.

# सूत्राणांसूची


| सूत्राणि | पादः | सूत्रांकः | पृष्ठं |
|---|---|---|---|
| **अ** | | | |
| अकरणत्वाच्च न दोषस्तथा हि दर्शयति | ४ | १२ | ९६ |
| अणवश्च .... .... .... .... .... | ४ | ८ | ९४ |
| अणुश्च .... .... .... .... .... | ४ | १४ | ९७ |
| अदृष्टानियमात् .... .... .... .... | ३ | ५१ | ८५ |
| अधिष्ठानानुपपत्तेश्च .... .... .... | २ | ३९ | ४९ |
| अधिकं तु भेदनिर्देशात् .... .... .... | १ | २३ | १४ |
| अनुस्मृतेश्च .... .... .... .... .... | २ | २५ | ४३ |
| अनुज्ञापरिहारौ देहसंबंधाज्ज्योतिरादिवत् | ३ | ४८ | ८४ |
| अन्यथानुमितौ च ज्ञशक्तिवियोगात् .... | २ | ९ | ३३ |
| अन्यत्राभावाच्च न तृणादिवत् .... .... | २ | ५ | ३२ |
| अपरिग्रहाच्चात्यंतमनपेक्षा .... .... .... | २ | १७ | ३८ |
| अपिस्मर्यते .... .... .... .... .... | ३ | ४५ | ८२ |
| अपीतौ तद्वत्प्रसंगादसमंजसम् .... .... | १ | ९ | ६ |
| अभिमानिव्यपदेशस्तु विशेषानुगतिभ्याम् | १ | ६ | ४ |
| अभिसंध्यादिष्वपि चैवं .... .... .... | ३ | ५२ | ८३ |
| अभ्युपगमे प्यर्थाभावात् .... .... .... | २ | ६ | ३२ |
| अवस्थितिवैशेष्यादिति चेन्नाभ्युपगमात्धृदिहि .... | ३ | २५ | ७१ |
| अविरोधश्चंदनवत् .... .... .... .... | ३ | २४ | ७० |
| अश्मादिवच्चतदनुपपत्तिः .... .... .... | १ | २४ | १४ |
| असति प्रतिज्ञोपरोधो यौगपद्यमन्यथा .... | २ | २१ | ४१ |
| असदिति चेन्न प्रतिषेधमात्रत्वात् .... .... | १ | ८ | ६ |
| असद्व्यपदेशान्नेति चेन्न धर्मांतरेण वाक्यशेषात् .... | १ | १८ | ११ |

| सूत्राणि | पादः | सूत्रांकः | पृष्ठं |
|---|---|---|---|
| असंततेश्चाव्यतिकरः .... .... .... | ३ | ४९ | ८४ |
| असंभवस्तु सतोऽनुपपत्तेः........ ... | ३ | ९ | ६१ |
| अस्तितु.... .... ....... .... .... | ३ | २ | ५७ |
| आकाशेचाविशेषात........ .... .... | २ | २४ | ४३ |
| आत्मनि चैवं विचित्राश्चहि .... .... | १ | २९ | १८ |
| आभास एवच.... ....... .... .... | ३ | ५० | ८५ |
| आंगित्वानुपपत्तेश्च ....... .... .... | २ | ८ | ३३ |
| अंतवत्वमसर्वज्ञतावा........ .... .... | २ | ४१ | ५० |
| अंतरा विज्ञानमनसी क्रमेण त-ल्लिंगादितिचेन्नाविशेषात् .... | ३ | १४ | ६४ |
| अंत्यावस्थितेश्चोभयनित्यत्वादविशेषात् | २ | ३६ | ४८ |
| अंशो नानाव्यपदेशादन्यथा चा-पि दार्शाकतवादित्वमधीयतएके .... | ३ | ४३ | ८१ |
| **आ** | | | |
| आपः .... .... .... .... .... | ३ | ११ | ६२ |
| **इ** | | | |
| इतरव्यपदेशाद्धिताकरणादिदोषप्रसक्तिः | १ | २२ | १३ |
| इतरेतरप्रत्ययत्वादितिचेन्नोत्पत्ति-मात्रनिमित्तत्वात् .... | २ | १९ | ३९ |
| इतरेषांचानुपलब्धेः .... .... .... | १ | २ | २ |
| **उ** | | | |
| उत्क्रांतिगत्यागतीनां .... .... .... | ३ | २० | ६८ |
| उत्तरोत्पादे च पूर्वनिराधोत् .... .... | २ | २० | ४० |
| उत्पत्त्यसंभवात् .... .... .... .... | २ | ४२ | ५१ |
| उदासीनानामपि चैवंसिद्धिः .... .... | २ | २७ | ४४ |
| उपपद्यते चाप्युपलभ्यते च .... .... | १ | ३७ | २२ |
| उपलब्धिवदनियमः .... .... .... | ३ | ३७ | ७८ |
| उपसंहारदर्शनान्नेतिचेत्क्षीरवाद्धि.... .... | १ | २५ | १५ |

| सूत्राणि | पादः | सूत्रांकः | पृष्ठं |
|---|---|---|---|
| उपादानात् | ३ | ३५ | ७७ |
| उभयथा चदोषात् | २ | १६ | ३७ |
| उभयथा चदोषात् | २ | २३ | ४२ |
| उभयथापि नकर्मातस्तदभावः | २ | १२ | ३६ |
| **ए** | | | |
| एतेन मातरिश्वा व्याख्यातः | ३ | ८ | ६० |
| एतेन योगः प्रत्युक्तः | १ | ३ | ३ |
| एतेन शिष्टाअपरिग्रहा अपि व्याख्याताः | १ | १३ | ८ |
| एवंचात्माऽकात्स्न्यँ | २ | ३४ | ४७ |
| **क** | | | |
| करणवच्चेन्न भोगादिभ्यः | २ | ४० | ५० |
| कर्त्ता शास्त्रार्थवत्वात् | ३ | ३३ | ७६ |
| कृतप्रयत्नापेक्षस्तु विहितप्रतिषेधावैयर्थ्यादिभ्यः | ३ | ४२ | ८१ |
| कृत्स्नप्रसक्तिर्निरवयवत्वशब्दकोपोवा | १ | २७ | १६ |
| **ग** | | | |
| गुणाद्वा लोकवत् | ३ | २६ | ७२ |
| गौण्यसंभवात् | ३ | ३ | ५८ |
| गौण्यसंभवात् | ४ | २ | ९१ |
| **च** | | | |
| चराचरव्यपाश्रयस्तु स्यात्तद्व्यपदेशो भाक्तस्तद्भावभावित्वात् | ३ | १६ | ६५ |
| चक्षुरादिवत्तु तत्सहाशिष्ट्यादिभ्यः | ४ | ११ | ९५ |
| **ज** | | | |
| ज्योतिराद्यधिष्ठानं तु तदा मननात् | ४ | १५ | ९८ |
| **त** | | | |
| तइंद्रियाणि तद्व्यपदेशादन्यत्रश्रेष्टात् | ४ | १८ | ९९ |

| सूत्राणि | पादः | सूत्रांकः | पृष्ठं |
|---|---|---|---|
| तर्काप्रतिष्ठानादन्यथाप्यनुमेय मिति-चेदेवमप्यनिर्मोक्षप्रसंगः .... | १ | १२ | ७ |
| तथाप्राणाः .... .... .... .... .... | ४ | १ | ९० |
| तदन्यत्वमारंभणशब्दादिभ्यः.... .... | १ | १५ | ९ |
| तदभिध्यानादेव तु तल्लिंगात्सः .... | ३ | १३ | ६३ |
| तद्गुणसारत्वात्तुतव्द्यपदेशःप्राज्ञवत् .... | ३ | २९ | ७३ |
| तत्पूर्वकत्वाद्वाचः .... .... .... .... | ४ | ५ | ९२ |
| तत्प्राक्श्रुतेश्च .... .... .... .... | ४ | ४ | ९२ |
| तस्यच नित्यत्वात् ........ .... .... | ४ | १७ | ९९ |
| तेजोतस्तथा ह्याह .... .... .... | ३ | १० | ६१ |
| **न** | | | |
| नकर्माविभागादिति चेन्नानादित्वात् .... | १ | ३६ | २२ |
| नच कर्तुःकरणं.... .... .... .... | २ | ४३ | ५१ |
| नच पर्यायादप्यविरोधो विकारादिभ्यः | २ | ३५ | ४७ |
| नतुदृष्टांतभावात्.... .... .... .... | १ | १० | ६ |
| न प्रयोजनवत्वात् ... .... .... .... | १ | ३३ | २० |
| न भावोऽनुपलब्धेः .... .... .... | २ | ३० | ४५ |
| न वायुक्रिये पृथगुपदेशात् .... .... | ४ | १० | ९४ |
| न वियदश्रुतेः.... .... .... .... | ३ | १ | ५६ |
| न विलक्षणत्वादस्य तथात्वं च शब्दात् | १ | ४ | ३ |
| नाणुरतच्छ्रुतेरितिचेन्नेतराधिकारात् .... | ३ | २२ | ६९ |
| नाभावउपलब्धेः.... .... .... .... | २ | २८ | ४५ |
| नात्माश्रुतेर्नित्यत्वाच्चताभ्यः .... .... | ३ | १७ | ६६ |
| नासतो दृष्टत्वात्.... .... .... .... | २ | २६ | ४४ |
| नित्यमेवच भावात्.... .... .... | २ | १४ | ३७ |
| नित्योपलब्ध्यनुपलब्धिप्रसंगोऽन्यतरनियमोवान्यथा .... | ३ | ३२ | ७५ |

| सूत्राणि | पादः | सूत्रांकः | पृष्ठं |
|---|---|---|---|
| नैकस्मिन्न संभवात् .... .... .... | २ | ३३ | ४६ |
| **प** | | | |
| पटवच्च .... .... .... .... | १ | २० | ११ |
| पत्युरसामंजस्यात् .... .... .... | २ | ३७ | ४९ |
| पयोंबुवच्चेत्तत्रापि .... .... .... | २ | ३ | ३० |
| परात्तु तच्छ्रुतेः .... .... .... | ३ | ४१ | ८० |
| पुरुषाश्मवदिति चेत्तत्रापि .... .... | २ | ७ | ३३ |
| पंचवृत्तिर्मनोवत् व्यपदिश्यते .... .... | ४ | १३ | ९७ |
| पुंस्त्वादिवत्त्वस्य सतोऽभिव्यक्तियोगात् | ३ | ३१ | ७४ |
| पृथगुपदेशात् .... .... .... .... | ३ | २८ | ७३ |
| पृथिव्यधिकाररूपशब्दांतरादिभ्यः .... | ३ | १२ | ६२ |
| प्रकाशादिवन्नैवंपरः .... .... .... | ३ | ४६ | ८३ |
| प्रतिज्ञानपरोधाच्च .... .... .... | ४ | ३ | ९१ |
| प्रतिज्ञाहानिरव्यतिरेकाच्छब्देभ्यः .... | ३ | ६ | ५९ |
| प्रतिसंख्याप्रतिसंख्यानिरोधा- प्राप्तिरविच्छेदात् .... | २ | २२ | ४१ |
| प्रदेशादिति चेन्नांतर्भावात् .... .... | ३ | ५३ | ८६ |
| प्रवृत्तेश्च .... .... .... .... | २ | २ | ३० |
| प्राणवता शब्दात् .... .... .... | ४ | १६ | ९८ |
| **भ** | | | |
| भावे चोपलब्धेः .... .... .... | १ | १६ | १० |
| भेदश्रुतेः .... .... .... .... | ४ | १९ | १०० |
| भोक्त्रापत्तेरविभागश्चेत्स्याल्लोकवत् .... | १ | १४ | ९ |
| **म** | | | |
| महद्दीर्घवद्वा ह्रस्वपरिमंडलाभ्यां .... | २ | ११ | ३५ |
| मंत्रवर्णात् .... .... .... .... | ३ | ४५ | ८२ |

| सूत्राणि | पादः | सूत्रांकः | पृष्ठं |
|---|---|---|---|
| मांसादिभौमं यथा शब्दमितरयोश्च .... | ४ | २२ | १०२ |
| य | | | |
| यथा च तक्षोभयथा .... .... .... | ३ | ४० | ८० |
| यथा प्राणादिः .... .... .... .... | १ | २१ | १३ |
| यावदात्मभावित्वाच्च न दोषस्तद्दर्शनात् | ३ | ३० | ७४ |
| यावद्विकारंतु विभागो लोकवत्.... .... | ३ | ७ | ६० |
| युक्तेश्च........ ........ .... .... | ३ | १९ | ६८ |
| युक्तेःशब्दांतराच्च .... .... .... | १ | १९ | १२ |
| र | | | |
| रूपादिमत्वाच्च विपर्ययो दर्शनात् .... | २ | १५ | ३७ |
| ल | | | |
| लोकवत्तु लीलाकैवल्यं.... .... .... | १ | ३४ | २० |
| व | | | |
| विकरणत्वान्नेति चेत्तदुक्तं........ .... | १ | ३२ | १९ |
| विपर्ययेण तु क्रमोत उपपद्यतेच .... | ३ | १४ | ६४ |
| विप्रतिषेधाच्च.... .... .... .... | २ | ४५ | ५२ |
| विप्रतिषेधाच्चाऽसमंजसं.... .... .... | २ | १० | ३५ |
| विहारोपदेशात्.... .... .... .... | ३ | ३४ | ७७ |
| विज्ञानादिभावे वा तदप्रतिषेधः .... | २ | ४४ | ५१ |
| वैधर्म्याच्च न स्वप्नादिवत्........ .... | २ | २९ | ४५ |
| वैलक्षण्याच्च.... .... .... .... | ४ | २० | १०० |
| वैशेष्यात्तु तद्वादस्तद्वादः .... .... | ४ | २३ | १०२ |
| वैषम्यनैर्घृण्ये न सापेक्षत्वात्तथाहिदर्शयाति .... | १ | ३५ | २१ |
| व्यतिरेकानवस्थितेश्चानपेक्षत्वात् .... | २ | ४ | ३१ |
| व्यतिरेको गंधवत्तथा च दर्शयति........ | ३ | २७ | ७२ |
| व्यपदेशाच्च क्रियायां न चेन्निर्देशविपर्ययः .... | ३ | ३६ | ७८ |

| सूत्राणि | पादः | सूत्रांकः | पृष्ठं |
|---|---|---|---|
| **श** | | | |
| शक्तिविपर्ययात्.... .... .... .... | ३ | ३८ | ७९ |
| शब्दाच्च.... .... .... .... .... | ३ | ४ | ५८ |
| श्रुतेस्तुशब्दमूलत्वात्.... .... .... | १ | २८ | १७ |
| श्रेष्ठश्च.... .... .... .... .... | ४ | ९ | ९४ |
| **स** | | | |
| सत्वाच्चावरस्य.... .... .... .... | १ | १७ | ११ |
| समवायाभ्युपगमाच्च साम्यादनवास्थितेः | २ | १३ | ३६ |
| समाध्यभावाच्च.... .... .... .... | ३ | ३९ | ७९ |
| सप्तगतेर्विशेषितत्वाच्च.... .... .... | ४ | ६ | ९३ |
| समुदाय उभयहेतुकेपि तदप्राप्तिः.... | २ | १८ | ३८ |
| सर्वथानुपपत्तेश्च .... .... .... | २ | ३२ | ४६ |
| सर्वधर्मोपपत्तेश्च........ .... .... .... | १ | ३८ | २३ |
| सर्वोपेताच तद्दर्शनात्........ .... .... | १ | ३१ | १९ |
| संबंधानुपपत्तेश्च........ .... .... | २ | ३८ | ४९ |
| संज्ञामूर्तिक्लृप्तिस्तु त्रिवृत्कुर्वत उपदेशात् .... | ४ | २१ | १०१ |
| स्याच्चैकस्य ब्रह्मशब्दवत्........ .... | ३ | ५ | ५८ |
| स्मरंतिच .... .... .... .... | ३ | ४७ | ८३ |
| स्मृत्यनवकाशदोषप्रसंग इतिचेन्नान्यस्मृत्यनवकाशदोषप्रसंगात् .... | १ | १ | १ |
| स्वनानुपपत्तेश्च नानुमानं........ .... | २ | १ | ३० |
| स्वपक्षदोषाच्च.... .... .... .... | १ | ११ | ७ |
| स्वपक्षदोषाच्च.... .... .... .... | १ | ३० | १८ |
| स्वशब्दोन्मानाभ्यां च.... .... .... | ३ | २३ | ७० |
| स्वात्मनाचोत्तरयोः .... .... .... | ३ | २१ | ६९ |
| **ह** | | | |
| हस्तादयस्तु स्थिते तो नैवम्.... .... | ४ | ७ | ९३ |

| सूत्राणि | पादः | सूत्रांकः | पृष्ठं |
|---|---|---|---|
| क्ष | | | |
| क्षणिकत्वाच्च.... .... .... .... | २ | ३१ | ४६ |
| ज्ञ | | | |
| ज्ञोऽतएव .... .... .... .... | ३ | १८ | ६७ |


पुणे मराठी ग्रंथालय
४३७ ब नारायण
दा. नों.

PLEASE CIRCULATE THIS AMONG YOUR FRIENDS AND OTHERS.)

*BY THE SAME AUTHOR*

**COMMENTARIES**

**ON THE**

## SPECIFIC RELIEF ACT, 1877.

Containing ample Annotations founded on eminent English and American works on Equity Jurisprudence and on the English Law Reports; together with notes from the Indian Decisions, and with Table of Cases and copious Index. Covers a little soiled. Price (reduced) Rs. 5, postage 8 As.

" Mr. Venkatrao Ramchandra in his "Commentaries on the Specific Relief Act" has brought out a most useful book, and one to which we are glad to accord considerable praise. He has taken each section of the Act separately, and after an exhaustive note upon each, in which he refers to the various English cases in support of his text, he collects the decisions of the Courts in India which refer to the subject-matter with which he is dealing under a separate heading. This arrangement is clear and of the greatest assistance to those who most refer to his work. We would refer specially to the author's notes upon the sections which deal with the subject of *mandamus* and injunctions. . With regard to each of these matters we are happy to observe that he has not omitted to refer to the corresponding section of the Judicature Act in England. Similarly, he introduces into his work the sections of the Civil Procedure Code which relate to temporary injunctions. And to render the book as complete as possible, we find in it the rules which have been published by the Judges of Calcutta and Bombay under the Act (section 51). A complete table of the cases referred to, as also a complete and trustworthy index to the contents at the end of the book, make the volume as useful a publication as possible to every legal practitioner."—*The Times of India.*

---

## THE BOMBAY HEREDITARY OFFICES ACT.

Being (Bombay Act III of 1874.) Together with the amending Act (Bombay Act V of 1886) and the Matadars Act (Bombay Act VI of 1887), with copious explanatory and critical notes and notes from the decisions of the High Court of Bombay, and with full Index. Price Rs. 3 and postage As. 4.

---

## THE MAMLATDARS' COURTS ACT.

Being Bombay Act No. III of 1876, with explanatory and critical notes, and notes from the decisions of the High Court of Bombay, 3rd Ed. (1894.) Price 1½ Rupee and postage 2 As.

## THE INDIAN STAMP ACT, 1879.

With Explanatory and Critical Notes, and notes from the Decisions of the Superior Courts in England and India. Price Rs. 3, now reduced to Rs. 1-8, postage 4 As.

---

## THE PENSIONS' ACT, 1871.

With Explanatory and Critical Notes, and notes from the decisions of the Superior Courts in India and England. Price Rupee 1, now reduced to 8 As. and postage 2 As.

---

## THE BOMBAY DISTRICT MUNICIPAL ACT.

Being (Bombay Acts VI of 1873 and II of 1884,). With copious notes and Index. (*In preparation.*)

---

## ELEMENTARY MECHANICS.

For the use of students preparing for the Matriculation Examination of the Bombay University, with numerous examples and their solutions, and with the past examination-papers and hints for their solution. Seventh Edition. Price Rupee 1, now reduced to 8 As. and Postage 1 Anna.

---

☞ For copies of the above-mentioned books apply to Mr. Venkatrao Ramchandra at Poona, Peth Shukrawar, House No. 596. Books can be sent only by value payable post. A postage stamp should be sent if any answer is required.

1*st December*, 1896.

( ही जाहिरात मेहेरबानीनें आपल्या मित्रमंडळींत प्रसिद्ध करावी. )

# जाहिरात.

## वेदान्तशास्त्र.

**परमेश्वराचें ज्ञान करून घेण्याची ज्यांस इच्छा आहे अशा योग्य ब्राह्मणांकरितां खालीं लिहिलेले ग्रंथ,**
संस्कृत टीका व मराठी अर्थ व समजुतीच्या टिपा ह्यांसाहित,
**रा० सा० त्र्यंबकराव रामचंद्र ह्यांनीं तयार केलेले.**

| | | |
|---|---|---|
| ईशोपनिषत् ........................................ | ०८ | ०१. |
| केनोपनिषत् ........................................ | ०८ | ०१. |
| काठकोपनिषत् ( अध्याय १ व २ ) प्रत्येकास ......... | ०१२ | ०१. |
| प्रश्नोपनिषत् ........................................ | ०१२ | ०१. |
| मुंडकोपनिषत् ........................................ | ०१२ | ०१. |
| मांडुक्योपनिषत् ........................................ | १ | ०२. |
| तैत्तिरीयोपनिषत् ( शिक्षावल्ली ) ...................... | १ | ०२. |
| तैत्तिरीयोपनिषत् ( ब्रह्मानंदवल्ली ) ...................... | ०१२ | ०१. |
| तैत्तिरीयोपनिषत् ( भृगुवल्ली ) ...................... | ०८ | ०१. |
| ऐतरेयोपनिषत् ........................................ | ०१२ | ०१. |
| छांदोग्योपनिषत् ( प्रपाठक ५,६,७ व ८ ) ............ | ०१२ | ०१. |
| छांदोग्योपनिषत् ( प्रपाठक ४ ) ...................... | छापत आहे. | |
| बृहदारण्यकोपनिषत् ( अध्याय ५ व ६ ) प्रत्येकांस..... | ०१२ | ०१. |
| बृहदारण्यकोपनिषत् ( अध्याय ४ ) .................. | छापत आहे. | |
| नारायणोपनिषत् भाग १ ................................ | १०८ | ०२. |
| नारायणोपनिषत् भाग २ ................................ | छापत आहे. | |

सर्वदर्शनसंग्रह ( चार्वाकदर्शनम् ) ........................०८ ०१.
योगसूत्र ( समाधिपाद, साधनपाद, विभूतिपाद व कैवल्यपाद ). } प्रत्येकास .... ०१२ ०१.
ब्रह्मसूत्र ( अध्याय १ ला ) .........................१०८ ०१.
ह्मसूत्र ( अध्याय २ रा ) ........................तयार होत आहे.
ब्रह्मसूत्र ( अध्याय ४ था ) ........छापून तयार होत आला आहे.
गीता ........................................तरजुमा चालला आहे.
वेदान्तसार............................................१०८ ०२.
अपरोक्षानुभूति.........................................१ ०२.

## वैद्यशास्त्र.

### रा० रा० व्यंकटराव रामचंद्र ह्यांनीं केलेले ग्रंथ.

**नाडीप्रकरण.**—भाग १, हृदय–रक्त–रक्त शरीरांत फिरणें–नाडी.............................तयार होत आहे.
भाग २, नाडीप्रकाश ( संस्कृत टीका व मराठींत अर्थ ) ०१२ ०२.
भाग ३, नाडीप्रबोध ( संस्कृत टीका व मराठींत अर्थ ) तयार होत आहे.
भाग ४, नाडीविज्ञान ( संस्कृत टीका व मराठींत अर्थ ) तयार होत आहे.

**प्रसूतिविद्या.**—इंग्लिश व संस्कृत ग्रंथांच्या आधारांवरून तयार होत आहे.

## कायद्यासंबंधी ग्रंथ.

### मराठी भाषेंत.

**मुसलमानी कायदा.**—ह्मणजे, दायभाग व करार, ह्यांत सुनी व शिया ह्या दोन्ही पंथांचीं मतें सांगितलीं आहेत, व हिंदुस्थानांतील वरिष्ठ कोर्टांनीं व प्रिव्हिकौन्सिलानें ह्या कायद्यासंबंधी केलेल्या,

निवाड्यांच्या सारांशाची जंत्री, व्यंकटराव रामचंद्र ह्यांनीं केलेली, आवृत्ति १ ली, किंमत १ रुपये, शिवाय टपाल खर्च ०८.

**हिंदुधर्मशास्त्र.**—ह्मणजे, ब्रिटिश सरकारच्या कोर्टांत न्याय करण्यास उपयोगी पडणारी धर्मशास्त्रसंबंधी माहिती, वरिष्ठ कोर्टाच्या निवाड्यांबाबद टिपा व हवाले ह्यांसुद्धां, व्यंकटराव रामचंद्र ह्यांनीं केलें आहे; त्यांपैकीं,

दत्तकप्रकरण...........................................छापत आहे.

**कायद्यासंबंधी नियम.**—खंड १, हा ग्रंथ ब्रूम् साहेबानें इंग्रजींत केलेल्या ग्रंथाच्या आधारावरून व्यंकटराव रामचंद्र यांणीं मराठींत तयार केलेला, पूर्वींची किंमत रुपये ४ होती, ती हल्लीं रुपये २ केली आहे.

**मुंबई हायकोर्टाचे वटहुकूम.**—फौजदारी, इंग्लिशसरकारचे कामाकरितां घेतल्यास किंमत रुपये १०१४, इतरांस किंमत रुपये २०६, शिवाय टपालखर्च ०५.

**मुंबई हायकोर्टाचे वटहुकूम.**—दिवाणी, इंग्लिशसरकारचे कामाकरितां घेतल्यास किंमत रुपये ४०३, इतरांस किंमत रुपये ४०११, शिवाय टपालखर्च वगैरे ०७.

**नोंदण्याचा कायदा.**—ह्मणजे, सन १८७७ चा आक्ट ३ ह्याजवर समजुतीच्या व वरिष्ठ कोर्टाच्या निवाड्यांच्या टिपांसुद्धां, सन १८७७ त छापिलेली आवृत्ति, किंमत रु. १॥ होती ती हल्लीं ०१२ आणे केली आहे ट० ख० ०८.

## सर्वोत्तम औषधें.

व्यंकटराव रामचंद्र ह्यांनीं तयार केलेलीं.

सूतशेखर ( पित्त वगैरेंवर ) तोळा...........................रुपये. १९
प्रवाळ ( प्रमेह, शक्ति वगैरे ) तोळा........................... २
आनंदभैरव ( ज्वर वगैरे ) तोळा........................... २

अग्निकुमार ( अग्निमांद्य, शैत्य वगैरे ) तोळा............ २

खदिरसाराच्या गोळ्या ( खोकल्यावर ) तोळा............ १

नारायणतेल ( सर्व वायूंवर ) पांच तोळ्यांस............ १

लाक्षातेल ( कित्ता ) नऊ तोळ्यांस............ १

बदामपाक ( पौष्टिक ) एक शेरास............ ५

कोहोळ्याचा पाक ( सदर ) एक शेरास............ ४

हिंगाष्टक ( पाचक ) तोळा............ ०४

रक्तपितीवर औषध ( रोगी समक्ष भेटला पाहिजे ) रुपये २५०

इच्छाभेदीरस ( इच्छेप्रमाणें जुलाब होण्यास ) १२ गोळ्यांस १

सुवर्णमालिनीवसंत ( जीर्णज्वर, क्षय, इ. ) दर तोळ्यास.... १५

अश्विनीकुमार ( सर्व रोगांवर ) दर तोळ्यास............ ४

केंस निघण्याचें औषध दर तोळा............ ०४

परम्याचें व चट्टयाचें औषध ( रोगी समक्ष भेटला पाहिजे )

अर्धशिशीचें औषध ( कित्ता. )

विंचवाचें औषध ( कित्ता. )

दिनेशभैरव ( अतिसारावर ) दर तोळ्यास............ ३

वातारि ( वायूवर ) दर तोळ्यास............ ३

## सावधगिरीच्या सूचना.

१. सदरीं लिहिलेल्या हरएक बुकाच्या टैटल पेजवर ग्रंथकर्त्याच्या नांवाचा शिक्का मारून विकण्याची वहिवाट आहे. सबब शिक्का नसल्यास पिनलकोडचें कलम ४११ अन्वयें बुक चोरीचें आहे, असें समजलें जाईल.

२. ज्यांस सदरीं लिहिल्यापैकीं बुक किंवा औषध पाहिजे असेल त्यांनीं ग्रंथकर्त्याच्या नांवानें “ पुणें, पेठ शुक्रवार घर नंबर ५९६ येथें देणें ” असा पत्ता लिहून पाठवावें. उत्तर मागविणें असल्यास ट. ख. पाठवावा.

मंगळवार तारीख १ माहे डिसेंबर सन १८९६.